# जनमाध्यम

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

एक प्रतिष्ठित सवय

स्वातंत्र्य दिन चिरायू होवो...

✦ अमरावती, शनिवार १५ ऑगस्ट २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४

Epaper www.janmadhyam.com


# 200 कोटींच्या जमीन घोटाळा प्रकरणात पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल

**बनावट कागदपत्रे आणि नोंदींद्वारे जमीन हडपल्याचा 'रिलायन्स प्रोग्रेसिव्ह'चा आरोप**

**महसुल विभागातील काही अधिका-यांना हाताशी धरुन खोट्या नोंदी**

अमरावती/प्रतिनिधी :

**अमरावती येथील मौजे निंभोरा खुर्द परिसरातील कोट्यवधी रुपयांच्या बहुचर्चित जमीन घोटाळा प्रकरणात कनिष्ठ नायब तहसीलदार टीना चव्हाण यांच्या निलंबनानंतर, आता रिलायन्स प्रोग्रेसिव्ह ट्रेडर्स प्रा.लि. कंपनीच्या वतीने अमरावती पोलीस आयुक्तांकडे रीतसर लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.**

शासकीय दस्ताऐवजांमध्ये फेरफार करून, बनावट कागदपत्रांच्या आधारे कोट्यवधींची जमीन हडपल्याचा आणि आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

**नेमके प्रकरण काय आहे?-** रिलायन्स प्रोग्रेसिव्ह ट्रेडर्स प्रा.लि. या कंपनीने मौजे निंभोरा खुर्द (ता. जि. अमरावती) येथील सर्व्हे नं. ५६/१/ब मधील १ हेक्टर २१ आर (१२,१४१ चौ. मी.) जागा ३० डिसेंबर २०१४ रोजी रु. २१ कोटी २१ लाख रुपयांना रीतसर खरेदी खताद्वारे खरेदी केली होती. या जमिनीची ७/१२ उताऱ्यावर नोंद होऊन ताबा कंपनीकडेच होता.तक्रारीनुसार, गैरअर्जदार शेषराव बापूराव गोयटे (रा. बडनेरा रोड, अमरावती) यांनी या जमिनीवर बेकायदेशीर डोळा ठेवून बनावट व खोटे 'दानपत्र' तयार केले. यापूर्वी २०१६ मध्येही याप्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात आर्थिक गुन्हे शाखेकडून गुन्हा दाखल झालेला असून तो न्यायालयात प्रलंबित आहे.



असे असतानाही, गैरअर्जदार शेषराव गोयटे याने राजेंद्र महादेवराव कुरळकर व एआर रियल्टीतर्फे रामदास कोल्हाजी हेकडे यांच्याशी संगनमत करून तसेच महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांना हाताशी धरून खोट्या नोंदी करून घेतल्या. त्याआधारे २९ मार्च २०२५ आणि २ एप्रिल २०२६ रोजी सदर जमिनीचे तुकडे बेकायदेशीररीत्या खरेदीखताद्वारे विक्री करण्यात आले.

## मुख्य सूत्रधार अद्याप पडद्यामागेच!

या प्रकरणी तक्रारदार रिलायन्स प्रोग्रेसिव्ह ट्रेडर्स प्रा.लि. कंपनीच्या वतीने दि.१३ ऑगष्ट रोजी कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी प्रशांत मधुकरराव ज्ञानवल यांनी बडनेरा पोलीसांच्या नावे पोलीस आयुक्तांकडे दिलेल्या तक्रार अर्जात स्पष्ट केले आहे की, सर्व आरोपींनी संगनमत करून कंपनीची मोठी आर्थिक फसवणूक केली आहे. दरम्यान केवळ दिवाणी (सिव्हिल) दावे आणि प्रशासकीय निलंबनाची कारवाई पुरेशी नसून, या घोटाळ्यामागील खरे मुख्य सूत्रधार आणि भू-माफिया यांच्यावर कठोर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना जेरबंद करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.त्यामुळे आता पोलिस या प्रकरणात काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




### सुट्टीची सूचना


आज दिनांक १५ ऑगस्ट २०२६ शनिवार रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त जनमाध्यम कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या रविवार १६ ऑगस्ट २०२६ रोजी अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.


■ **व्यवस्थापक**

# सिंधू जल करार निलंबित करणे योग्य पाउल-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू



**नवी दिल्ली-**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ८० व्या स्वातंर्त्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशाला संबोधित केले. त्या म्हणाल्या- दहशतवादाला आश्रय देणा-या देशासोबत सिंधू जल करार निलंबित करणे शेतक-यांसाठी एक निर्णायक पाउल आहे.आपण २०२७ पर्यंत विकसित भारताचे लक्ष्य घेउन पुढे जात आहोत. नागरिकांनी राष्ट्रासाठी नेहमी जागरूक राहावे.त्या पुढे म्हणाल्या की, आजचा दिवस आपण फाळणी विभीषिका दिवस म्हणून साजरा करतो. जातीय हिंसाचारामुळे लाखो लोकांना निर्वासित व्हावे लागले. तरीही त्यांनी आपली ओळख सोडली नाही. राष्ट्रपती म्हणाल्या- आजचा दिवस आपण फाळणी वेदना स्मृती दिन म्हणून साजरा करतो. जातीय हिंसाचारामुळे लाखो लोकांना निर्वासित व्हावे लागले. तरीही त्यांनी आपली ओळख सोडली नाही. आपले संविधान ⇨(पान २ वर)




■ जाहिरात संकलन - हरीश पुरोहित, तालुका प्रतिनिधी, दादी माँ अँड, अचलपूर.

# जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुरेश निमकर यांचे अपघाती निधन

## धामणगाव परिसरावर शोककळा; आज मंगळदस्तगीर येथून अंत्ययात्रा

**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** धामणगाव तालुक्यातील ज्येष्ठ सामाजिक व राजकीय व्यक्तिमत्त्व तसेच जिल्हा परिषदेचे माजी सभापती सुरेश निमकर यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाच्या वृत्ताने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगरूळ दस्तगीर मार्गावर चारचाकी वाहनाच्या अपघातात सुरेश निमकर गंभीर जखमी झाले. अपघातानंतर त्यांना तातडीने धामणगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली.



सुरेश निमकर यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विविध जबाबदाऱ्या सांभाळताना आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता. सर्वसामान्य नागरिकांशी जिव्हाळ्याचे संबंध असलेले, सामाजिक कार्यात सक्रिय असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील सहकाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. सुरेश निमकर यांची अंतिम यात्रा शनिवार, दिनांक १५ ऑगस्ट रोजी त्यांच्या मंगरुळ दस्तगीर येथील निवास स्थानावरून निघणार आहे.

# अमरावती पोलिस दलातील २१ अधिकारी-कर्मचाऱ्यांना महासंचालक पदकाचा सन्मान

**-पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते होणार गौरव**
**-उत्कृष्ट सेवेसह नक्षलग्रस्त भागातील कामगिरीची दखल**

**अमरावती/प्रतिनिधीः-** कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि प्रदीर्घ सेवेतून अमरावती शहर पोलिस दलाची मान उंचावणाऱ्या २१ अधिकारी व अंमलदारांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेण्यात आली आहे. पोलिस महासंचालकांकडून त्यांना विविध श्रेणीतील पदकांनी गौरविण्यात येणार असून, स्वातंत्र्यदिनाच्या औचित्यावर त्यांच्या सेवेला विशेष सलाम करण्यात येणार आहे.

१५ वर्षांची उत्कृष्ट सेवा, २५ वर्षांची अति उत्कृष्ट सेवा तसेच नक्षलग्रस्त भागात खडतर सेवा बजावल्याबद्दल या अधिकारी-कर्मचाऱ्यांची पदकासाठी निवड झाली आहे. शनिवारी, १५ ऑगस्ट रोजी पोलिस आयुक्त कार्यालयात ध्वजारोहणानंतर सकाळी ७ वाजता आयोजित कार्यक्रमात पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या हस्ते पदकप्राप्त अधिकारी व अंमलदारांचा सन्मान करण्यात येणार आहे. पोलिस महासंचालक पदक हे पोलिस दलातील दीर्घकाळ केलेल्या उल्लेखनीय आणि गुणवत्तापूर्ण सेवेची पावती मानले जाते. गुन्हेगारीविरोधातील कारवाई, कायदा व सुव्यवस्था राखताना बजावलेली जबाबदारी तसेच प्रतिकूल परिस्थितीत केलेल्या सेवेमुळे या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली आहे.

पदकप्राप्त अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये पोलिस उपायुक्त शाम घुगे, यशवंत सोळंके, पोलिस निरीक्षक सीमा दाताळकर, रवि राजुलवार, निलेश गावंडे, बाबाराव अवचार, दिप्ती ब्राम्हणे, श्रीपतराव गुलसुंदरे, सहायक पोलिस निरीक्षक इम्रान नाईकवाडे, पोलिस उपनिरीक्षक विलास जामनेरकर, विजय शेंदरकर, ज्योती देवकते, सहायक पोलिस उपनिरीक्षक प्रविण बुंदेले, अशोक वाटाणे आणि संजय पतिंगे यांचा समावेश आहे. तसेच पोलिस हवालदार नंदकिशोर अंबुलकर, निखिल माहुरे, प्रविण आखरे, झाकीर हुसैन, राजू जायभाये आणि संजय केतकर यांनाही त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी पदक प्रदान करण्यात येणार आहे. १५ आणि २५ वर्षांची प्रदीर्घ सेवा तसेच नक्षलग्रस्त भागातील खडतर कर्तव्य बजावणाऱ्या या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव म्हणजे त्यांच्या वर्षानुवर्षांच्या समर्पित सेवेला मिळालेली पावती आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर होणाऱ्या या सन्मानामुळे अमरावती शहर पोलिस दलात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# वर्षभरापासून बेपत्ता वृद्धाचा आढळला मृतदेह

## -शुक्रवार बाजार परिसरात खळबळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीतील शुक्रवार बाजार परिसरात गुरुवारी मध्यरात्री २ वाजता सुमारे ५० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली आहे.घटनास्थळी रक्ताचे डाग आढळून आल्याने परिसरात विविध चर्चा सुरू आहेत.ही हत्या आहे की अपघाती मृत्यू याबाबत अद्याप स्पष्टता नाही. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टमसाठी पाठवला आहे. पोस्टमार्टम अहवालानंतरच मृत्यूचे खरे कारण समोर येईल. देवेंद्र आनंदराव ठाकरे (वय ५०, एकता नगर, बिच्छू टेकडी) असे मृतक वृद्धाचे नाव आहे. गेल्या १ वर्षापासून तो घरापासून दूर होता. माहितीनुसार गुरुवारी रात्री २ वाजता फ्रेजरपुरा पोलिस गस्त घालत असताना शुक्रवार बाजारात मृतदेह आढळला.



घटनास्थळी रक्ताचे डाग दिसल्याने पोलिसांना सुरुवातीला हत्येचा संशय होता. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी पाठवला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी घटनास्थळाची पाहणी केली.पोलिस उपायुक्त श्याम घुगे यांच्या माहिती नुसार, रक्ताचे डाग हे हत्येमुळे नसून मृतकाच्या लघवीच्या जागेवरून रक्त येत असल्याने झाले होते. त्यामुळे डॉक्टरांनी हीं हत्या नसून आकस्मिक मृत्यूचे प्रकरण असल्याचे सांगितले. सध्या आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करून तपास सुरू आहे. पोस्टमार्टम अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल. पोलिस या प्रकरणाची सर्व बाजूने चौकशी करत आहेत.

# कर्मचाऱ्याचा मालकावर प्राणघातक हल्ला

## सिटीलॅण्ड व्यापारी संकुल येथील घटना

**अमरावती/ प्रतिनिधीः-** दुकानातील कामावरून झालेल्या वादातून एका कर्मचाऱ्याने मालकावर चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना आज शुक्रवार १४ ऑगस्ट दुपारी नांदगाव पेठ येथील सिटीलॅंड व्यापारी संकुल येथे समोर आली आहे.ट



ा हल्ल्यात श्रीचंद मोटवाणी (वय ६२,लुल्ला लाईन, रामपुरी कॅम्प ) जखमी झाले आहे.त्यांच्यावर रिम्स रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

सध्या त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगण्यात येत आहे. माहितीनुसार शुक्रवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास सिमरन गारमेंट्सचे संचालक श्रीचंद मोटवाणी नेहमीप्रमाणे दुकानात उपस्थित होते. ते कर्मचाऱ्यांना कामकाजाबाबत सूचना देत असतानाच एका कर्मचाऱ्याशी कोणत्यातरी कारणावरून त्यांचा वाद झाला. वाद वाढताच संतापलेल्या कर्मचाऱ्याने चाकूने मोटवाणी यांच्यावर वार केले. घटनेच्या वेळी दुकानात उपस्थित असलेल्या इतर लोकांनी मध्यस्थी करून वाद सोडवला.

जखमी श्रीचंद मोटवाणी यांना तातडीने उपचारासाठी रिम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले.

सध्या त्यांची प्रकृती स्थिर असून धोक्याबाहेर आहे. आरोपी घटनास्थळा वरून फरार झाला होता.पण नांदगाव पेठ पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून काही तासामध्ये त्याला अटक केली आहे.

# शासकीय माल वाहतूक करणाऱ्या वाहनांना 'नो एन्ट्री'मध्ये सूट द्या



## -जिल्हाधिकाऱ्यांकडे संघटनेची मागणी

**अमरावती/ प्रतिनिधीः-** धामणगाव शहरात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने जड वाहनांसाठी 'नो एन्ट्री' लागू करण्यात आली आहे. मात्र त्यामुळे शासकीय जीवनावश्यक वस्तूंच्या वाहतुकीला अडचण होत असल्याने माल वाहतूक ट्रक मालक संघटने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन शासकीय वाहनांना 'नो एन्ट्री' मधून सूट देण्याची मागणी आज शुक्रवार १४ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, शहरात 'नो एन्ट्री' लागू झाल्यामुळे अन्न व नागरी पुरवठा विभाग आणि कृषी विभागांतर्गत येणारा शासकीय माल वेळेत पोहोचवणे कठीण झाले आहे. गहू, तांदूळ, साखर, मीठ आणि रासायनिक खत यांसारख्या अत्यावश्यक वस्तूंची वाहतूक ठराविक वेळेत करणे आवश्यक असते. नो एन्ट्रीमुळे मोठी अडचण येत आहे. धामणगावातील शास्त्री चौक ते सेफला हायस्कूल परिसरात 'नो एन्ट्री' लागू असल्यामुळे शासकीय लोडिंग ट्रक अनेकदा अडकून पडतात. त्यामुळे शासकीय कामात विलंब होत आहे. गहू, तांदूळ, साखर, मीठ यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांना सूट द्या. शेतीसाठी आवश्यक असणारे साहित्य आणि रासायनिक खत पोहोचवणारे वाहनाना सवलत देण्यात यावी. यावेळी विलास सहारे, राजेंद्र घोल, अब्दुल सादिक, दीपक व्यास, संजय अजबले, विठ्ठल मिर्चापुरे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# अमरावती मध्यवर्ती कारागृहात दोन गटांत हाणामारी; सहा बंदींविरुद्ध गुन्हा दाखल

अमरावती/प्रतिनिधीः-अमरावती मध्यवर्ती कारागृहातील न्यू बॅरेक क्रमांक १३ मध्ये दोन बंदीगटांत जोरदार हाणामारी झाल्याची घटना १३ ऑगस्ट रोजी रात्री घडली. या मारहाणीत दोघे बंदी जखमी झाले असून, त्यांच्यावर कारागृहातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले आले. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी सहा बंदींविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. कारागृह प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, १३ ऑगस्ट रोजी रात्री न्यू बॅरेक क्रमांक १३ येथे रात्रपाळीचा बंदोबस्त सुरू असताना दोन गटांतील बंदी आपसात मारामारी करत असल्याचे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आले. यावेळी एका गटातील बंदी गंभीर दुखापत करण्याच्या उद्देशाने पाण्याने भरलेल्या बादलीने दुसऱ्या गटातील बंदीच्या डोक्यावर मारहाण करत असल्याचे दिसून आले. घटनेची माहिती कर्तव्यावरील कर्मचाऱ्यांनी वॉकीटॉकीद्वारे सर्कल अंमलदार गणेश भोपळे यांना दिली. त्यानंतर अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी पोहोचले. बॅरेकचे कुलूप उघडून कारागृह कर्मचाऱ्यांनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.या मारहाणीत न्यायाधीन बंदी गोपाल शंकर कापसे (बंदी क्र. १३५/२६) आणि उमेश राजू पवार (बंदी क्र. १६८१/२६) हे जखमी झाले. त्यांच्या डोक्याला व चेहऱ्यावर दुखापत झाली असून, चावा घेतल्याच्या खुणाही आढळल्या. कारागृहाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. राजीक यांनी त्यांची तपासणी करून प्राथमिक उपचार केले. त्यानंतर पुढील उपचारासाठी दोघांना कारागृह शिपायामार्फत जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले.दरम्यान, कारागृह प्रशासनाने घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता संबंधित बंदी आपापसांत मारामारी करत असल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणी कारागृह प्रशासनाच्या वतीने शिपाई अक्षय गायकवाड यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दिली.तक्रारीनुसार, वैभव बाळासाहेब इक्कर (बंदी क्र. १९/२६), अनिकेत जगदीश बडोदे (बंदी क्र. २२२/२६), अनुज उईके (बंदी क्र. २२०७/२६) यांच्यासह अन्य संबंधित बंदींविरुद्ध मारहाण तसेच महाराष्ट्र कारागृह नियमावलीचे उल्लंघन केल्याप्रकरणी कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### सिंधू जल करार निलंबित

लोकसहभागावर आधारित आहे. ती भावना आपले देशवासीय पुढे नेत आहेत, ही आपल्या लोकशाहीची उपलब्धी आहे.

आतापासून काही तासांनंतर, आपल्या देशाच्या स्वातंर्त्याच्या ८० व्या वर्षाचा शुभारंभ होईल. देश-विदेशात राहणारे सर्व भारतीय हा सण उत्साहात साजरा करतात. आपला तिरंगा आपल्या स्वातंर्त्याचे प्रतीक आहे. तो आपण पूर्ण अभिमानाने फडकवतो.

द्रौपदी मुर्मू म्हणाल्या- १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतमाता पारतंर्त्याच्या बेड्यांतून मुक्त झाली. सर्व देशवासी स्वतंत्र भारताच्या नियतीचे निर्माते बनले. निष्ठावान विद्यार्थी आणि शिक्षक, विकासासाठी तत्पर वैज्ञानिक आणि अभियंता, आरोग्य सेवेत कार्यरत ड?क्टर आणि आरोग्य कर्मचारी, मेहनती कामगार आणि अन्नदाता शेतकरी, आपल्या प्रयत्नांनी राष्ट्र-निर्माण करत आहेत.इतर क्षेत्रांमध्ये सक्रिय असलेले असंख्य देशवासी, तसेच संविधानात नमूद केलेल्या मूलभूत कर्तव्यांचे पालन करणारे सर्व नागरिक, राष्ट्र-निर्माणात महत्त्वाचे भागीदार आहेत. मी त्या सर्वांचे मनापासून कौतुक करते.राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या- न्यायव्यवस्थेशी संबंधित प्रत्येक व्यक्तीचे हे कर्तव्य आहे की, संसाधनांच्या कमतरतेमुळे कोणालाही न्यायापासून वंचित राहू नये याची खात्री करावी. दहशतवादाला आश्रय देणा-या देशासोबत सिंधू जल कराराला निलंबित करणे हे राष्ट्रीय हितासाठी, विशेषत? शेतक-यांसाठी, एक निर्णायक पाउल आहे.राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या- आपला समृद्ध वारसा आणि स्वातंर्त्य संग्रामाचे आदर्श स्वीकारू न आपण आधुनिक विकासाच्या मार्गावर वाटचाल करत आहोत. वयं राष्ट्रे जागृयाम, हे वेद-वाक्य आपल्याला प्रेरणा देते की आपण राष्ट्रासाठी नेहमी जागरूक राहावे.

गेल्या एका दशकाहून अधिक काळात आपल्या देशाने वेगाने सर्वसमावेशक विकास साधला आहे. वारसा आणि विकासाच्या समन्वयाला प्राधान्य दिले आहे, आणि विकासातील दशकाहून जुने अनेक अडथळे दूर केले आहेत.राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या- २५ कोटींहून अधिक लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात यश मिळाले आहे. जगातील सर्वात मोठ्या आर्थिक समावेशक योजनेअंतर्गत, प्रधानमंत्री जन धन योजनेखाली सुमारे ५९ कोटी खातेदार बँकिंग प्रणालीशी जोडले गेले आहेत. त्यात ३२ कोटींहून अधिक महिला खातेदारांचा समावेश आहे.८० कोटी लोकांसाठी मोफत रेशनची व्यवस्था करून त्यांची अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यात आली आहे. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ६० कोटी लोकांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतची मोफत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करू न देण्यात आली आहे.

राष्ट्रपती मुर्मू म्हणाल्या- आर्थिक सहकार्य वाढवण्यासाठी आणि परस्पर संबंध अधिक दृढ करण्यासाठी, आम्ही अनेक देशांसोबत मुक्तव्यापार करार (फ्री ट्रेड एग्रीमेंट्स) केले आहेत. ग्लोबल साउथच्या देशांमध्ये आम्ही अग्रगण्य भूमिका बजावत आहोत. जागतिक स्तरावर आपल्या देशाचा सन्मान वाढला आहे. आपल्या कोणत्याही कृतीमुळे, येणा-या पिढ्यांकडून या अधिकाराच्या वापरात किंचितही कमतरता येउ नये, याची आपल्याला खात्री करायची आहे. आपला प्रयत्न असावा की आपण त्यांना अधिक समृद्ध नैसर्गिक संपदा प्रदान करावी. पर्यावरण संरक्षणाबद्दलची आपली निष्ठा आपल्या परंपरेचा भाग आहे. राष्ट्रपती भवनात होणारे 'ॲट होम' रिसेप्शन अमृत उद्यान परिसरात आयोजित केले जाईल. संध्याकाळी ६ वाजता सुरू होणा-या या कार्यक्रमासाठी सुमारे ६५० पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. यापैकी १०० ज्क्ष्ध पाहुणे असतील.यावेळी खास काय आहे: या वर्षीच्या आयोजनात महाराष्ट्र, गोवा, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या चार राज्यांच्या संस्कृती आणि वारशाला प्राधान्य देण्यात आले आहे. थीममध्ये संस्कृती, समुदाय आणि निसर्ग यांच्यातील संबंध आणि पर्यावरण संरक्षणावर भर दिला आहे. पाहुण्यांच्या स्वागताची खास व्यवस्था: रिसेप्शनमधील पाहुण्यांचे हाताने विणलेल्या महेश्वरी स्टोलने स्वागत केले जाईल. हा स्टोल मध्य प्रदेशातील महेश्वर येथे तयार करण्यात आला आहे आणि यात चारही राज्यांच्या पारंपरिक विणकामाचे नमुने (मोटिफ) समाविष्ट आहेत.

### दर्यापूरात काँग्रेसला मोठा राजकीय

दर्यापूर नगरपरिषदेतील काँग्रेसची मजबूत पकड मानली जात असताना नगराध्यक्षांसह मोठ्या संख्येने नगरसेवकांनी घेतलेला हा निर्णय काँग्रेससाठी आत्मपरीक्षणाचा विषय ठरणार आहे. दुसरीकडे, शिवसेना शिंदे गटासाठी ही मोठी राजकीय ताकद मानली जात असून, या प्रवेशामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणात नव्या समीकरणांना सुरुवात झाली आहे.दर्यापूरच्या राजकारणात 'काँग्रेसचा गड' हादरला, की नव्या राजकीय पर्वाची सुरुवात झाली? याची चर्चा आता शहरासह संपूर्ण अमरावती जिल्ह्यात रंगली आहे.

### सारंगपुर ग्रामपंचायतीच्या

टॉवरवर चढून पोलिस आणि प्रशासनाचे लक्ष वेधले. टॉवरवरून उतरवण्याचा प्रयत्न केल्यास त्यांनी आत्महत्या करण्याची धमकी दिली. यामुळे प्रशासनाची धावपळ झाली. सारंगपुर ग्रामपंचायतीच्या भ्रष्टाचाराची निष्पक्ष चौकशी करावी, सरपंच आणि ग्रामसेवकांवर कारवाई करावी, गावातील प्रलंबित जलपूर्ती योजना त्वरित पूर्ण करावी अशा मागण्या बोरकर यांनी केल्या. या आंदोलनामुळे काही काळासाठी मोठा गोंधळ येथे झाला होता.

**प्रशासनाच्या आश्वासनानंतर उतरले खाली-**

सातूर्णा परिसरातील हॉटेल घरौंदाच्या मागे असणाऱ्या एअरटेलच्या मोबाईल टॉवरवर चढून गजानन महादेव बोरकर यांनी आंदोलन सुरू केले होते. शेवटी मेहकर येथील गटविकास अधिकारी दिनकर बाबुराव खरात, बुलढाणा विस्तार अधिकारी संदीप मेटांगळे, विस्तार अधिकारी एस एस गवई यांनी घटनास्थळावर पोहोचून त्याला समजावले आणि १९ ऑगस्ट रोजी समिती गठित करून पाच ते दहा सप्टेंबर दरम्यान पाईपलाईनचे काम सुरू करण्याचे आश्वासन पत्र दिले. त्यामुळे प्रकरण निवळले.

### घरगुती गॅस सिलेंडर चोरी

म्हणजे, श्रवण उर्फ डॉन राजेश बनारसे याला अगदी १५ दिवसांपूर्वी फ्रेजरपुरा पोलिसांनी दोन वर्षाकरिता शहर तथा जिल्ह्यातून तडीपार केले आहे. मात्र, हा तडीपारीचा आदेश धाब्यावर बसवून त्याने गॅस सिलिंडरवर डल्ला मारल्याचे उघडकीस आले आहे.एमआयडीसी परिसरातील रुपा गॅस सर्व्हिसच्या गोदामातून अज्ञात चोरांनी ३३ घरगुती गॅस सिलिंडर लांबवले होते. या प्रकरणी राजापेठ पोलिस ठाण्यात ९ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान राजापेठ पोलिसांनी प्रेम ढिलके याला ताब्यात घेतले असता त्याने चोरीची कबुली दिली. त्याच्याच माहितीवरून तडीपार असलेला दुसरा आरोपी श्रवण उर्फ डॉन यालाही अटक करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी दोन्ही आरोपींकडून प्रत्येकी ३ हजार रुपये किमतीचे एकूण १५ घरगुती सिलिंडर जप्त केले. तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेली १ लाख २० हजार रुपये किमतीची दुचाकी असा एकूण १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींनी गुन्ह्यात इतर साथीदारांसह विधीसंघर्षित बालकाचा सहभाग असल्याचे कबूल केले आहे. राजापेठ पोलीस ठाण्याचे निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात ही कार्यवाही करण्यात आली.

### सीआरएस पोर्टलवर प्रलंबित जन्ममृत्यू

सोबत घेऊन अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेनेचे तालुकाप्रमुख तथा नगरसेवक रवींद्र गुल्हाने यांनी दिला असून अशा आशयाचे एक लेखी निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना देण्यात येऊन निवेदनाची प्रतिलिपी थेट उपसंचालक आरोग्य सेवा जन्म-मृत्यू महाराष्ट्र राज्य पुणे यांना रवाना करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या नवीन शैक्षणिक सत्राला प्रारंभ झाला असून त्यांना प्रवेशासाठी जन्म दाखल्यांची गरज असल्यामुळे तसेच कार्यालयीन कामांसाठी नागरिकांना जन्म व मृत्यू दाखल्यांची अडचणी निर्माण होत असून दाखले मंजूर होण्यास १ ते २ महिन्याच्यावर कालावधी लागत आहे.त्याकरिता आपल्याकडे मंजुरीसाठी प्रलंबित असलेल्या दाखल्यांना त्वरित मंजुरात देऊन नागरिकांना दिलासा द्यावा.अशी मागणी नगरसेवक रवींद्र गुल्हाने यांनी रेटून धरली.

सीआरएस पोर्टलवर जुने जन्ममृत्यू नोंदी दाखले डिजिटल प्रमाणपत्र काढण्यासाठी आवश्यक केले आहे.बहुतांश नागरिकांनाजवळ जुने जन्म/मृत्यू दाखले व अहवाल उपलब्ध नाही. परंतु नगरपरीषद येथे जन्म मृत्यू अभिलेखात सदरची नोंद दिसून येत आहे.तरी सदर दाखले काढण्यास अडचणी निर्माण होत आहे.तथापि नागरिकांना व विद्यार्थ्यांना दाखले देण्यास विलंब होत आहे.त्यामुळे स्थानिक नागरिकांचा रोष मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे नागरिकांना उत्तर देणे कठीण झाले आहे.तरी या गंभीर समस्येची तात्काळ दखल घेण्यात येऊन अर्ज मंजूर करण्याचा कालावधी कमी करण्यात यावा. जेणे करून विद्यार्थ्यांना व नागरिकांना जन्म मृत्यू दाखले मिळण्यास कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. अन्यथा सर्व नागरिक व विद्यार्थ्यांना सोबत घेऊन अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे तालुकाप्रमुख तथा नगरसेवक रवींद्र गुल्हाने,नगरसेवक नईम खान,योगेश जैस्वाल, लोकेश इखे यांच्या वतीने देण्यात आला आहे.


## पवित्र प्रणालीद्वारे शिक्षक भरती जाहिरात

### शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५

मान्य दिनांक : २०/०७/२०२६
प्रसिद्धी दिनांक : ०६/०८/२०२६

संस्थेचे नाव : (270708SC046) Lok Kalyan Shikshan sanstha Banosa Daryapur (Secondry / Higher Secondary) - With Interview
**शैक्षणिक स्तर :** Secondry / Higher Secondary
Lok Kalyan Shikshan sanstha Banosa Daryapur या व्यवस्थापनच्या शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदासाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील

| अ.क्र | प्रवर्ग | महिला | माजी सैनिक | अंश कालीन | प्रकल्प ग्रस्त | भूकंप ग्रस्त | खेळाडू | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | इ.मा.व | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| २ | ई. डब्लू. एस | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | एकुण | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | २ |

शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील — मान्य दिनांक :20/07/2026

| अ.क्र | माध्यम | पद | वेतनश्रेणी/मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकवण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET / CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Marathi | Under Graduate Teacher std (1-4/5) | Consolidated Pay - UGT (16000) | Aided | All Subjects | Marathi | HSC (Std. 12th) | Diploma | TET Paper 1/CTET Paper 1 | 1 |
| 2 | Marathi | Graduate Teacher std (9-10) | Consolidated Pay - GT 9-10 (18000) | Aided | Language (English) | -- | Graduation | Graduation | -- | 1 |
| | | | | | | | | Total | | 2 |

**सर्वसाधारण सूचना :**
१. अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी- २०२५ (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांनी पवित्र प्रणाली (https://tait2025.mahateacherrecruitment.org.in ) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रम असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करू शकतील.

श्रीमती कांताबाई रा. मुळे
- :अध्यक्ष : -
लोक कल्याण शिक्षण संस्था, (बनोसा) दर्यापूर ता. दर्यापूर, जि. अमरावती

राजेंद्र नारायणराव जळमकर
- :सचिव: -
लोक कल्याण शिक्षण संस्था, (बनोसा) दर्यापूर ता. दर्यापूर, जि. अमरावती

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# 'गरीबांच्या झोपड्यांवरच बुलडोझर का?' महिलांचा पंचायत समितीसमोर एल्गार

■ प्रतिनिधी | अकोट ■

नोटीस नाही, न्यायालयाचा आदेश नाही; मग झोपड्या पाडण्याची घाई कशासाठी? असा संतप्त सवाल उपस्थित करीत वडाळी सटवाई ग्रामपंचायतीच्या कारवाईविरोधात गंगानगर परिसरातील महिलांनी अकोट पंचायत समितीसमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. १० ऑगस्ट रोजी बुलडोझरच्या सहाय्याने १४ झोपड्या जमीनदोस्त करण्यात आल्याचा आरोप महिलांनी केला असून, या कारवाईची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

गंगानगर परिसरातील महिलांनी ११ ऑगस्ट रोजी अकोट गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. मात्र, तक्रारीची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करीत अखेर महिलांनी पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषणाचे अस्त्र उपसले.

### 'कारवाईचा आदेश दाखवा; अन्यथा नुकसानभरपाई द्या!'

झोपड्या पाडण्यापूर्वी ग्रामपंचायतीने कोणतीही नोटीस दिली नाही. न्यायालयाचा आदेशही नसल्याचा दावा महिलांनी केला आहे. 'आम्ही अतिक्रमण केलेले नाही. आमच्या जागेवर आम्ही घरे उभारली. मग आमचीच घरे पाडण्याचा अधिकार प्रशासनाला कोणी दिला?' असा थेट सवाल महिलांनी उपस्थित केला आहे. कारवाईपूर्वी नोटीस, आदेश, पंचनामा आणि अन्य कायदेशीर प्रक्रिया करण्यात आली असल्यास त्याची संपूर्ण कागदपत्रे आम्हाला द्यावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे.



### 'नियम गरीबांसाठी आणि सत्ताधाऱ्यांसाठी वेगळे?'

गावातील अनधिकृत बांधकामांवर समान निकषाने कारवाई करण्याचे आव्हान महिलांनी प्रशासनाला दिले आहे. केवळ गरीब, महिला आणि राजकीयदृष्ट्या कमजोर नागरिकांनाच लक्ष्य केले जात असेल, तर हा कायद्याचा समानतेचा सिद्धांत नसून सरळ दुजाभाव असल्याचा संताप महिलांनी व्यक्त केला. 'कायदा आमच्यासाठी असेल तर तो गावातील प्रत्येकासाठी समान असला पाहिजे. घरांवर ज्या नियमांचा बडगा उगारला, त्याच नियमांचा बडगा इतर अनधिकृत बांधकामांवरही उगारण्याची हिंमत प्रशासनाने दाखवावी,' असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला आहे.

### नुकसानभरपाईसह घरांची नोंद करण्याची मागणी

पाडलेल्या घरांचा आणि नष्ट झालेल्या संसारोपयोगी साहित्याचा पंचनामा करून संपूर्ण नुकसानभरपाई द्यावी. स्वतःच्या प्लॉटची ग्रामपंचायत अभिलेखात नोंद करून नमुना क्रमांक ८ द्यावा तसेच नियमानुसार बांधकाम परवानगी द्यावी, या मागण्याही करण्यात आल्या आहेत.

कारवाईत कोणत्याही अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने अधिकाराचा गैरवापर केला असल्यास त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी. तसेच वडाळी सटवाईतील सर्व अनधिकृत बांधकामांची निष्पक्ष तपासणी करून समान कायद्याच्या आधारे कारवाई करावी, अशी मागणी महिलांनी केली आहे. मागण्या मान्य होईपर्यंत आमरण उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार महिलांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे आता अकोट पंचायत समिती प्रशासन या प्रकरणात चौकशीचा हातोडा चालवते की आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करते, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# मोरगाव भाकरे ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करा

## माजी उपसरपंच अर्चना चोपडे यांचे आजपासून आमरण उपोषण

■ प्रतिनिधी | अकोला ■

मोरगाव भाकरे ग्रामपंचायतीमध्ये सन २०११ ते २०२३ या कालावधीत तत्कालीन ग्रामसेवकांकडून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व शासकीय निधीचा अपहार झाल्याचा आरोप करीत माजी उपसरपंच अर्चना गजानन चोपडे यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे. या प्रकरणाची तालुकास्तरीय चौकशी रद्द करून पाच सदस्यीय जिल्हास्तरीय उच्चस्तरीय चौकशी समिती गठीत करावी, या मागणीसाठी त्यांनी शुक्रवार, १४ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

चोपडे यांनी यापूर्वी २३ जुलै आणि ३ ऑगस्ट रोजी प्रशासनाला आमरण उपोषणाचे निवेदन दिले होते. त्यानंतर पंचायत समिती अकोला स्तरावर प्राथमिक चौकशी समिती गठीत करण्यात आली.



मात्र, तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेता तालुकास्तरीय समितीकडून निष्पक्ष चौकशी होण्याबाबत त्यांनी आक्षेप नोंदविला आहे.

ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहार हा शासकीय निधीच्या अपहाराशी संबंधित असल्याने प्रकरणाची खातेनिहाय सखोल तपासणी होणे आवश्यक असल्याचे चोपडे यांचे म्हणणे आहे. तसेच संभाव्य हितसंबंध लक्षात घेता तालुकास्तरावरील कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या चौकशीच्या निष्पक्षतेवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शासकीय लेखापरीक्षण अहवालातही संबंधित गैरव्यवहार स्पष्ट झाल्याचा दावा त्यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेली पाच सदस्यीय जिल्हास्तरीय उच्च चौकशी समिती गठीत करून प्रकरणाची स्वतंत्र, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करावी, अशी मागणी चोपडे यांनी केली आहे. मागण्या मान्य न झाल्याने त्यांनी अखेर शुक्रवारपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणामुळे या कथित गैरव्यवहाराच्या चौकशीकडे जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून, प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

# हल्दवानी येथील घटनेच्या निषेधार्थ जिल्हा काँग्रेस कमिटीचा मोर्चा व सत्याग्रह संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा. श्री. मल्लिकार्जुनजी खरगे यांच्या हल्दवानी, उत्तराखंड येथील सभेनंतर त्या सभेच्या ठिकाणाचे काही हिंदुत्ववादी उजव्या विचारसरणीच्या संघटनांकडून गंगाजलाने शुद्धीकरण करण्यात आले. काँग्रेसच्या सभेला उपस्थित राहिल्यामुळे त्या ठिकाणाची विटंबना झाली, या कारणावरून करण्यात आलेल्या या कृत्याचा निषेध करण्यासाठी शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ रोजी वाशिम येथे मोर्चा व सत्याग्रहाचे आयोजन करण्यात आले.

वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने हा मोर्चा काढण्यात आला. पाटणी चौक येथून सुरू झालेला मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत नेण्यात आला. यावेळी काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. हातात निषेधाचे फलक व बॅनर घेऊन कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत सदर घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला.

यावेळी अध्यक्ष जिल्हा काँग्रेस कमिटी राजूभाऊ चौधरी यांनी बोलताना उपस्थितान्ना सांगितले की, लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीला आपल्या विचारांचा व राजकीय भूमिकेचा अधिकार आहे. मात्र, एखाद्या राजकीय नेत्याच्या सभेला उपस्थित राहिल्यामुळे सभास्थळाचे गंगाजलाने शुद्धीकरण करणे ही कृती सामाजिक सलोखा, बंधुता आणि संविधानिक मूल्यांना बाधा आणणारी आहे. अशा प्रकारच्या घटनांचा निषेध होणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

मोर्चानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून, पुतळ्याजवळ सत्याग्रह करण्यात आला. यावेळी काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सदर घटनेचा निषेध नोंदवत संविधानिक मूल्ये, सामाजिक एकोपा आणि बंधुता कायम राखण्याचा निर्धार व्यक्त केला. या मोर्चाचे नेतृत्व राजुभाऊ चौधरी अध्यक्ष वाशिम जिल्हा काँग्रेस कमिटी आणि दिलीपरावजी सरनाईक सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस काँग्रेस कमिटी, जावेद सौदागर, डॉक्टर श्याम गाभणे, चंद्रकांत साठे, तालुका अध्यक्ष गजानन गोटे, वैभव सरनाईक, किसनराव मस्के, परसरामजी भोयर, मधुकरराव जुमडे, शहराध्यक्ष सागर गोरे, दिलीपराव देशमुख, इफ्तेखार पटेल, दिलीप मोहनावाले, उज्वल देशमुख, सुरेश रत्नपारखी, रामनाथ राठोड, संदीप घुगे, योगेश बळी, महादेव सोळंके, गौतम गुडदे, राजेश दहात्रे, राजीक शेख, निवास मुसळे, नंदाताई गनोदे, मीनाताई वाठोरे, सुजाता नेमाडे, पिंटू भालेराव, विजय देशमुख, मंगेश भालेराव, मनोज गोरे, मदन जाधव सर, नंदाताई तायडे, बाबाराव राठोड सर, बाबाराव गोदमले, सुनील मापारी, भीमराव लोखंडे, हरीश चौधरी, काशीराम बोके, राजू घोडेवाले, संतोष गावंडे तात्या, विश्वनाथ भालेराव, वाय पी राठोड सर, बबलू खान, डॉक्टर ज्ञानेश्वर गायकवाड, भीमराव खंडारे, असलम खान, सय्यद आजम, विनोद बढेल, परमेश्वर अंभोरे, साजीद खान, अमित चव्हाण, प्रमोद वाघ, निवास मुसळे, राहुल गावंडे, भारत गुडधे, सुनील मापारी, दीपक साठे, विश्वनाथ आरू, सुभाष देवहंस, विजय पाटील वाकुडकर, विठ्ठलराव इंगळे, सुदाम राठोड, बाळू रोकडे, गणेश गायकवाड, विजय ढोबळे, सुनील मानवतकर, सागर भिसडे, बाळू कानगुडे, अख्तर खान पठाण, सागर भिसडे, डॉक्टर शेख तसलीम, संजयराव देशमुख, नारायण ढोबळे ( ठाकरे ), बाळासाहेब लेमले, अजय मोतीवार, सुरेश मोरे सर, संतोष महाले, गजानन ढोबळे, प्रदीप वानखेडे, विजय कडू, असलम खान, लखन धारू, अब्दुल रहीम, मोहम्मद रफी, शेख जावेद, सुधीर शेळके , राहूल शेळले प्रतीक कांबळे, संजय भुसारी, नूर शेख, राहुल शेळके, दीपक लगड, संदीप घुगे, राजरत्न भालेराव, बालाजी चव्हाण, गजानन कदम, विनोदी इंगळे, दीपेश कांबळे, उमेश जाधव पाटील, खरात, पवन भालेराव, शंकर जाधव, प्रल्हाद भालेराव, दीपक भालेराव, सोनू पठाडे, अनु बेनीवाले आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनालाही चार भिंतींचा पडदा!



- फडणवीसांच्या कर्जमाफीच्या निर्णयाचे मनपात कौतुक
- मात्र शहरवासीयांना सोहळा पाहताच आला नाही
- सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण बंद; विरोधकांचा सवाल
- 'अभिनंदनाचा ठरावही नागरिकांपासून का लपविला?'

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या माध्यमातून कर्जमाफी केल्याबद्दल मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव शुक्रवारी अकोला महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला. सत्ताधारी आणि विरोधी नगरसेवकांनी मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाचे कौतुकही केले. मात्र, या कौतुकाचा एकही क्षण शहरवासीयांना पाहता आला नाही. कारण, ज्या सर्वसाधारण सभेचे यापूर्वी थेट प्रक्षेपण होत होते, त्या सभेचेच शुक्रवारी थेट प्रक्षेपण बंद ठेवण्यात आले.

त्यामुळे 'मुख्यमंत्र्यांचा अभिनंदन सोहळा मनपाच्या चार भिंतीतच का ठेवला?' असा सवाल आता उपस्थित झाला आहे. एकीकडे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या निर्णयाचे कौतुक करण्यासाठी ठराव मांडला जातो, तो सर्वानुमते मंजूर केला जातो; मात्र दुसरीकडे शहरातील नागरिकांना हा ठराव मंजूर होताना पाहण्याची संधीच दिली जात नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकाराला राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. यापूर्वीच्या सर्वसाधारण सभांचे थेट प्रक्षेपण होत असल्याने नागरिकांना महापालिकेच्या कामकाजाची माहिती थेट मिळत होती. सभागृहात कोणता विषय मांडला जातो, कोण समर्थन करतो, कोण विरोध करतो, कोणते तांत्रिक मुद्दे उपस्थित केले जातात, याचा थेट आढावा नागरिक घेत होते.

मात्र, अचानक थेट प्रक्षेपण बंद करण्यात आल्याने शुक्रवारच्या सभेतील चर्चेवर पडदा पडला. त्यातच पहिल्याच महत्त्वाच्या विषयात मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव असल्याने या निर्णयावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले आहे. 'मुख्यमंत्र्यांच्या अभिनंदनाचा ठराव असेल, तर तो नागरिकांनी पाहण्यात सत्ताधाऱ्यांना अडचण काय? अभिनंदनाचा ठरावच जर अभिमानाची बाब असेल तर तो चार भिंतीत मंजूर करण्याची गरज काय?' असा सवाल विरोधी नगरसेवकांकडून उपस्थित करण्यात आला आहे.

### 'मुख्यमंत्र्यांचा जाहीर अभिनंदनाचा ठराव चार भिंतीत; हा तर अपमानच!'



'महापालिकेतील सत्ताधारी भाजपची मनमानी दिवसेंदिवस वाढत आहे. आधी पत्रकारांना सभागृहात जागा नसल्याचे कारण देऊन प्रवेश नाकारला. नंतर त्यांच्यासाठी खाली टीव्ही लावला. पुढे थेट प्रक्षेपण सुरू झाले आणि आता तेही बंद करण्यात आले. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला; मात्र तो ठरावही चार भिंतीत मंजूर झाला. मुख्यमंत्र्यांचे कौतुक शहरवासीयांना पाहता आले नाही. आजच्या दिवशी थेट प्रक्षेपण बंद करणे हा मुख्यमंत्र्यांच्याच अभिनंदनाला नागरिकांपासून दूर ठेवण्याचा प्रकार असून, हा एकप्रकारे मुख्यमंत्र्यांचा जाहीर अपमानच आहे. या प्रकाराचा मी निषेध करतो.'

**सागर भारुका, नगरसेवक,** मनपा शिवसेना शिंदे गट

### कर्जमाफीचा निर्णय; अभिनंदन मात्र पडद्याआड

शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करण्याचा ठराव हा शुक्रवारच्या सर्वसाधारण सभेच्या पटलावरील पहिल्या प्रमुख विषयांपैकी एक होता. शेतकरी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडित असलेल्या या निर्णयाचे महापालिकेच्या सभागृहात स्वागत करण्यात आले. सर्वानुमते ठराव मंजूर झाला. मुख्यमंत्र्यांचे कौतुक झाले. मात्र, हे कौतुक नेमके कोणासाठी? असा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण, महापालिकेच्या सभेचे थेट प्रक्षेपण सुरू असते तेव्हा शहरातील नागरिकांना आपल्या नगरसेवकांची भूमिका थेट पाहता येते. मुख्यमंत्री किंवा राज्य शासनाच्या निर्णयावर स्थानिक स्वराज्य संस्थेची भूमिका काय आहे, हे नागरिकांना कळते. पण यावेळी ही संपूर्ण प्रक्रिया चार भिंतींच्या आतच मर्यादित राहिली.

### पारदर्शकतेच्या दाव्याला 'ब्रेक'?

महापालिकेचा कारभार पारदर्शक असल्याचा दावा सातत्याने केला जात असताना सर्वसाधारण सभेचे थेट प्रक्षेपण बंद करण्याचा निर्णय नेमका का घेण्यात आला, याचे उत्तर अद्याप स्पष्ट झालेले नाही.

विशेष म्हणजे, महापालिकेच्या सभागृहातील कामकाज नागरिकांना थेट दाखविण्याची व्यवस्था सुरू झाल्यानंतर नागरिकांमध्येही त्याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. शहराच्या विकासाशी संबंधित विषयांवर आपले लोकप्रतिनिधी काय बोलतात, हे पाहण्याचा अधिकार नागरिकांना असल्याची भावना निर्माण झाली होती. त्यामुळे थेट प्रक्षेपण बंद होणे हा केवळ तांत्रिक निर्णय नसून महापालिकेच्या पारदर्शक कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा निर्णय असल्याची टीका विरोधकांकडून होत आहे.

### 'अभिनंदन करायचे तर शहरासमोर करा; पडद्याआड का?'



'मनपात लोकशाहीची थट्टा सुरू आहे. पारदर्शक कारभाराचा दावा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी थेट प्रक्षेपण का बंद केले, याचे उत्तर द्यावे. आजच्या सभेत मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठराव होता. ई-बस सेवा, हॉकर्स झोन यांसारखे महत्त्वाचे जनहिताचे विषय होते. अशा वेळी सभेचे थेट प्रक्षेपण बंद करण्यात आले. मुख्यमंत्र्यांचे कौतुक करण्यात आले, पण ते कौतुक शहरवासीयांना पाहता आले नाही. अभिनंदनाचा ठराव जर अभिमानाची बाब असेल तर तो नागरिकांसमोर मांडायला काय हरकत होती? त्यामुळे या निर्णयामागचे कारण सत्ताधाऱ्यांनी स्पष्ट करावे.'

**सुनील इन्नानी,** नगरसेवक, मनपा

### 'कौतुक केले, पण शहराला दाखविले नाही!'

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या कर्जमाफीच्या निर्णयाचे महापालिकेत अभिनंदन करण्यात आले. ठराव मंजूर झाला. मात्र, शहरातील जनतेला त्याची माहिती थेट सभागृहातून मिळाली नाही. त्यामुळे विरोधकांनी यावरून सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडले आहे. विशेष म्हणजे, शुक्रवारच्या सभेत ई-बस सेवा, हॉकर्स झोन यांसारखे शहराच्या दृष्टीने महत्त्वाचे विषयही चर्चेत होते. त्यामुळे सभेचे थेट प्रक्षेपण सुरू असते तर नागरिकांना या सर्व विषयांवरील चर्चा थेट पाहता आली असती. मात्र, यावेळी संपूर्ण सभाच नागरिकांच्या नजरेआड राहिली.


## जाहीर नोटीस

**मा. विद्यमान दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, मेहकर यांच्या न्यायालयात.**

एच.एम.पी. क्र. ११०/२०२५ चौ, ता. २५-०८-२०२६

**अर्जदार :** १. राकेश

**दीपक दयाळ** .... अर्जदार

**विरुद्ध**

**मोहिनी दयाळ व एक** ... गैर-अर्जदार

**विरुध्द**

सर्व संबंधितांना याव्दारे जाहीर करण्यात येते की, वरील नमूद एच.एम.पी. क्र. ११०/२०२५ हे प्रकरण मा. विद्यमान दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, मेहकर यांच्या न्यायालयात प्रलंबित आहे.

सदर प्रकरणातील गैर-अर्जदार सौ. मोहिनी दयाळ, आणि अभिनव अशोक बाभुळे दोघ रा. निंबा, ता. बाळापूर, जि. अकोला, या त्यांच्या मूळ गावी सध्या वास्तव्यास नसून, त्यांचा सध्याचा राहण्याचा पत्ता व ठावठिकाणा अर्जदारास ज्ञात नाही. त्यांना प्रत्यक्ष नोटीस बजावण्याचा प्रयत्न करूनही त्यांचा सध्याचा पत्ता उपलब्ध झालेला नाही.

त्यामुळे सदर न्यायालयीन प्रकरणाची माहिती गैर- अर्जदारास व्हावी व त्यांना न्यायालयासमोर आपली बाजू मांडण्याची संधी मिळावी, या उद्देशाने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. गैर- अर्जदार सौ. मोहिनी दयाळ आणि अभिनव अशोक बाभुळे यांनी दिनांक २५/०८/२०२६ रोजी मा. विद्यमान दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, मेहकर यांच्या न्यायालयात स्वतः किंवा आपल्या अधिवक्त्यामार्फत उपस्थित राहून सदर प्रकरणात आपली बाजू मांडावी.

सदर दिनांकास गैर-अर्जदार उपस्थित न राहिल्यास, मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची गैर-अर्जदार यांनी नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस मा. न्यायालयाच्या आदेशानुसार प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ठिकाण : मेहकर
दिनांक : १७/०८/२०२६
**अर्जदारातर्फे अधिवक्ता**

शिक्का

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर, मेहकर



# भाजपची जातीयवादी मानसिकता खपवून घेतली जाणार नाही - प्रकाश तायडे

## अ. भा. काँग्रेस कमिटी अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या अवमानाचा अकोला काँग्रेसकडून निषेध

■ प्रतिनिधी | अकोला ■

उत्तराखंडमध्ये अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे साहेब यांचा अवमान होईल अशा प्रकारचे कृत्य भाजपच्या काही जातीयवादी मानसिकतेच्या लोकांकडून करण्यात आले. या घटनेच्या निषेधार्थ अकोला जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रकाश तायडे, महानगराध्यक्ष महेंद्र गवई, यांच्या नेतृत्वात शुक्रवारी अकोल्यात मोर्चा व निषेध सभा आयोजित करण्यात आली होती.

स्थानिक काँग्रेस मुख्यालय स्वराज्य भवन येथून मोर्चा प्रारंभ होऊन बस स्थानकासमोरील धिंग्रा चौकात घोषणाबाजी व नारेबाजी करण्यात आली. त्यानंतर गांधी जवाहर बागेतील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. या ठिकाणी निषेध सभा घेण्यात आली. आ. साजिद खान पठाण यांच्यासह डॉ. झिशान हुसेन, प्रशांत पाचडे, अक्षय राऊत यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना अकोला जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष प्रकाश तायडे म्हणाले की आपला देश हा संविधानानुसार चालणारा देश आहे. या देशात समानता आणि मानवतेची मुल्ये महात्मा गांधी यांनी रुजवलेली आहेत. या मूल्यांनुसारच हा देश चालेल, भाजपची कोणतीही जातीयवादी मानसिकता काँग्रेस खपवून घेणार नाही. जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष अशोक मानकर यांनी सुद्धा यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी नगरसेवक फजलु पहेलवान, गुड्डू पठाण, आकाश कवडे, हुसेन गवळी, मो. इरफान, संजीवनीताई



बिहाडे, कपिल रावदेव, माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर, ?ड. संतोष गोळे, राजेश मते, आकाश सायखडे, विजुभाऊ पचारे, पंढरी हाडोळे, अजय टापरे, सुनील वानखडे, मोहन अंजनकार, विजय तिवारी, मनीष मिश्रा, भाऊसाहेब थोरात, बाळासाहेब काळे, सोमेश डिगे, गणेश ताले, देविदास नेमाडे, किशोर आरुडकर, नगरसेवक आसिफ खान, प्रशांत प्रधान, प्रा. बिस्मिल्ला खान, अलाउद्दीन अलीमुद्दीन, सय्यद नाईम इनोसली, शाहिद इकबाल खान, मुख्तासिर अहमद खान, राजा खान, सय्यद इमरान अली, वकार अल्लाह खान, डॉ. अशोकराव बिहाडे, प्रशांत सुधाकरराव देशमुख, देविदास नेमाडे, बाळकृष्ण वानखडे, मो. अक्रम, गणेश कळसकर, विनोद नालट, दीपक पोहरे, प्रशांत देशमुख, अनोक राहणे, अतुल खोटे, गजानन डाफे, डॉ. बजाज अन्सारी, दिलीप पाटील, वसीम भाई, विजय देशमुख, सुरेश हाडोळे, राजीव लिखीले, विनोद आंबुसकर, मोसिन शहा, यशोदाबाई गायकवाड, बब्बू भाई, फजलु भाई, दीपक गवई, तशवर पटेल यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी 'समता हमारा नारा है, देश हमारा प्यारा है', भाजपा पदाधिकाऱ्यांचा निषेध असो, मल्लिकार्जुनजी खरगे का अपमान, नही सहेगा हिंदुस्तान' अशा घोषणांनी मोर्चा दणाणला. निषेध सभेचे संचालन कपिल रावदेव, आभार प्रदर्शन नितीन देऊळकर यांनी केले.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २५९ ■ शनिवार, १५ ऑगस्ट २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# जिल्हाधिकारी कार्यालय की भाजपचे स्वागत केंद्र ?

## मंत्र्यांच्या स्वागतासाठी सरकारी कंपाऊंडच 'बुक'

### परवानगी नाही, तरी बॅनर झळकले; जिल्हाधिकारी कार्यालयात सत्तेचा झेंडा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्याच्या प्रशासनाचे प्रमुख केंद्र असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या कंपाऊंडवरच भाजपच्या कार्यकर्त्यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या स्वागताचे बॅनर लावल्याने वर्ध्यात राजकीय वातावरण तापले आहे. विशेष म्हणजे, या बॅनरसाठी प्रशासनाची कोणतीही परवानगी घेण्यात आली नसल्याची माहिती समोर आल्याने सरकारी मालमत्ता जनतेची की सत्ताधारी पक्षाच्या प्रसिद्धीची असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात 'जनसंवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंत्री जिल्हाधिकारी कार्यालयात येणार असल्याने भाजपच्या काही कार्यकर्त्यांनी त्यांच्या स्वागतासाठी थेट जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कंपाऊंडवर बॅनर लावले. मात्र, शासकीय कार्यालयाच्या परिसरात राजकीय स्वरूपाचे बॅनर लावण्यासाठी प्रशासनाची कोणतीही परवानगी घेण्यात आली नसल्याची बाब समोर आली आहे.



जिल्हाधिकारी कार्यालय हे सर्वसामान्य नागरिकांसाठी प्रशासन, न्याय आणि निष्पक्षतेचे प्रतीक मानले जाते. अशा ठिकाणी एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्यांचे फोटो असलेले स्वागत बॅनर झळकणे म्हणजे शासकीय परिसराचा राजकीय प्रसिद्धीसाठी वापर करण्याचा प्रकार नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मंत्र्यांचे स्वागत करायचे असेल तर पक्षाचे कार्यालय, सार्वजनिक चौक किंवा इतर खासगी जागा उपलब्ध असताना थेट जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कंपाऊंडलाच राजकीय बॅनरसाठी का निवडण्यात आले हा प्रश्नही चर्चेत आहे. परवानगी नसतानाही बॅनर लावला गेला असेल, तर संबंधितांवर प्रशासन कारवाई करणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

विशेष म्हणजे, सामान्य नागरिकांनी शासकीय जागेचा वापर केला तर परवानगी, नियम आणि कारवाईची भाषा केली जाते. मग सत्ताधारी पक्षाशी संबंधित कार्यकर्त्यांनी शासकीय कार्यालयाच्या परिसरात बॅनर लावल्यावर नियम वेगळे आहेत का सत्ताधाऱ्यांसाठी वेगळा नियम आणि जनतेसाठी वेगळा असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

या प्रकरणी जिल्हाधिकारी वान्मथी सी. यांच्याशी संपर्क साधून बॅनर लावण्यासाठी परवानगी घेण्यात आली होती का आणि परवानगी नसल्यास प्रशासन काय कारवाई करणार, याबाबत भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. त्यामुळे प्रशासनाची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.

शासकीय कार्यालयाच्या कंपाऊंडवर राजकीय बॅनर झळकतो आणि प्रशासन मौन बाळगते, यामुळे प्रशासनाच्या निष्पक्षतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता हा बॅनर हटवून संबंधितांवर कारवाई होते की सत्तेच्या सावलीत नियमांनाच हरताळ फासला जातो, याकडे वर्धेकरांचे लक्ष लागले आहे.

# ६५ लाखांचा घोटाळा की अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा

## थारच्या जल जीवन योजनेचा बोजवारा, तीन वर्षांत नळाला थेंबभरही पाणी नाही

**आष्टी शहीद जनमाध्यम :** गावकऱ्यांची तहान भागविण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या जल जीवन मिशनअंतर्गत कोट्यवधी रुपयांच्या योजना राबविल्या जात असताना थार गावातील ६५ लाखांची पाणीपुरवठा योजना मात्र प्रशासनाच्या कारभाराची पोलखोल करणारी ठरली आहे. योजना पूर्ण होऊन तब्बल तीन वर्षे उलटली, लाखो रुपये खर्च झाले, पाण्याची टाकी उभी राहिली आणि सोलर पॅनलही बसले. मात्र थारच्या नागरिकांच्या नळाला आजपर्यंत पाण्याचा थेंबही पोहोचलेला नाही. त्यामुळे ६५ लाखांचा हा खर्च नेमका कुणाच्या फायद्यासाठी झाला असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

सन २०२२ ते २३ मध्ये थार पाणीपुरवठा योजनेला मंजुरी देण्यात आली. कारंजा घाडगे तालुक्यातील जसापूर तलावातून पाईपलाईनद्वारे थार गावात पाणी आणण्याचे नियोजन करण्यात आले. यासाठी सुमारे ६५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. प्रत्यक्षात मात्र योजना सुरू होण्याआधीच तिची अवस्था बिकट झाल्याचे चित्र आहे.

**जल जीवन मिशन की जलविना मिशन**

थार जिल्हा परिषद शाळेजवळ पाण्याची टाकी उभारण्यात आली आहे. पाणी उपसण्यासाठी सोलर पॅनल बसविण्यात आले. मात्र देखभालीअभावी सोलर पॅनल



परिसरात गवत आणि झुडपांनी विळखा घातला आहे. लाखो रुपये खर्चून उभारलेली यंत्रणा धूळ खात पडली असून तिचा उपयोग नागरिकांना होताना दिसत नाही. जसापूर तलावातून थारपर्यंत टाकण्यात आलेल्या पाईपलाईनची अवस्थाही समाधानकारक नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. पाईपलाईनच्या कामादरम्यान झालेली तोडफोड आणि नुकसान दुरुस्त करण्यात आले नसल्याने योजना प्रत्यक्षात पाणीपुरवठा करण्यास सक्षम आहे का यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**पाणी गावात नाही मग काम पूर्ण कसे**

सर्वात गंभीर बाब म्हणजे गावात पाणी पोहोचले नसतानाही योजना पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. प्रत्यक्ष पाहणी न करता कामाला मंजुरी देण्यात आली का. पाणीपुरवठा सुरू नसताना कंत्राटदाराची बिले अदा झाली का. कामाची गुणवत्ता तपासण्यात आली का. सोलर यंत्रणा आणि पाईपलाईनची पाहणी कोणी केली. या प्रश्नांची उत्तरे आता प्रशासनाने द्यावीत अशी मागणी होत आहे.

**अधिकाऱ्यांच्या उडवाउडवीच्या उत्तरांनी संताप**

योजनेबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता समाधानकारक माहिती मिळत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. एका बाजूला पाणीटंचाईने नागरिक त्रस्त असताना दुसऱ्या बाजूला ६५ लाखांची योजना निष्क्रिय पडणे हा शासनाच्या निधीचा अपव्यय असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये आहे.

या प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून प्रत्यक्ष पाहणी करावी. योजनेची गुणवत्ता, पाईपलाईन, सोलर यंत्रणा आणि खर्चाची संपूर्ण तपासणी करावी. दोष आढळल्यास संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांची जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी आणि थार गावात तातडीने पाणीपुरवठा सुरू करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

६५ लाखांचा निधी खर्च करूनही तीन वर्षांपासून गाव तहानलेलेच असेल तर जल जीवन मिशनचा हा पैसा नेमका कुठे गेला हा प्रश्न आता प्रशासनाच्या दारात उभा ठाकला आहे.

# आष्टीच्या तलावात २० वर्षीय तरुण बुडाला; शोधमोहीम युद्धपातळीवर

### मित्रांसोबत पोहण्यासाठी गेला अन् पाण्यात बुडाला; गणेशपुरा परिसरात हळहळ

**आष्टी शहीद जनमाध्यम :** आष्टी शहरातील गणेशपुरा भागातील २० वर्षीय तरुण मित्रांसोबत पोहण्यासाठी गेला असता तलावाच्या पाण्यात बुडाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी, दि. १४ ऑगस्ट रोजी दुपारी घडली. सौरव सुनील चचाने असे बेपत्ता झालेल्या तरुणाचे नाव आहे. सायंकाळपर्यंत तलावात बचाव पथकाकडून त्याचा युद्धपातळीवर शोध सुरू होता.



मिळालेल्या माहितीनुसार, सौरव हा दुपारी साडेतीन ते चार वाजेच्या सुमारास मित्रांसोबत स्थानिक तलावावर पोहण्यासाठी गेला होता. पोहत असताना अचानक तो पाण्यात बुडाला. सौरव पाण्यात बुडाल्याचे लक्षात येताच त्याच्या मित्रांसह परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, त्याचा ठावठिकाणा लागला नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलिस प्रशासनाने घटनास्थळी धाव घेतली. बचाव पथकाच्या मदतीने तलावात शोधमोहीम सुरू करण्यात आली. सायंकाळपर्यंत पाण्यात शोध घेण्याचे काम सुरू होते. अंधारामुळे शोधमोहीमेस अडथळे येण्याची शक्यता असून, सौरवचा शोध लागेपर्यंत कुटुंबीयांसह नागरिकांची चिंता वाढली आहे.

या घटनेची माहिती गणेशपुरा परिसरात पसरताच नागरिकांनी तलाव परिसरात मोठी गर्दी केली. अवघ्या २० वर्षांच्या तरुणासोबत घडलेल्या या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, तलाव, नदी अथवा धरणाच्या पाण्यात पोहण्यासाठी जाणाऱ्या तरुणांनी विशेष खबरदारी घ्यावी, तसेच धोकादायक ठिकाणी पोहणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे. सौरवचा शोध लागल्यानंतरच या दुर्घटनेबाबतचे पुढील चित्र स्पष्ट होणार आहे.

### सुट्टीची सूचना

आज दिनांक १५ ऑगस्ट २०२६ शनिवार रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त जनमाध्यम कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या रविवार १६ ऑगस्ट २०२६ रोजी अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

- व्यवस्थापक

# अंबिका चौकात 'चाय पे चर्चा' बावनकुळेंचा चहाचा कप अन् राजकीय संदेश थेट जनतेत

**वर्धा जनमाध्यम :** राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या वर्धा दौऱ्यातील अंबिका चौकातील 'चाय पे चर्चा'ने राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले. दिवसभराच्या कार्यक्रमांनंतर बावनकुळे यांनी आपला ताफा अंबिका चौकात थांबवून नागरिकांमध्ये मिसळत चहाचा आस्वाद घेतला. यावेळी त्यांनी नागरिकांशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या समस्या व अडचणी जाणून घेतल्या.

नागरिकांनी विविध प्रश्न मांडत निवेदने व अर्ज बावनकुळेंकडे सादर केले. त्यांनी अर्ज स्वीकारून संबंधित प्रश्नांवर आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे काही मिनिटांची ही 'चाय पे चर्चा' नागरिकांसाठी संवादाचे व्यासपीठ ठरली.

मात्र, या अनौपचारिक भेटीला राजकीय किनारही असल्याची चर्चा सुरू झाली आहे. सत्तेच्या प्रोटोकॉलच्या चौकटीबाहेर येत थेट जनतेत जाण्याचा संदेश बावनकुळेंनी दिला, असे भाजपच्या वर्तुळातून बोलले जात आहे. अंबिका चौकातील नागरिकांशी थेट संवाद साधतानाच स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांची उपस्थितीही लक्षवेधी ठरली.


### जाहिरनामा

प्रोसेस क -५६८५/२०२६
एम.जे.सी.कं. ८१/२०२६,
मंगला दत्तुजी भाजीपाले व १
वि. निरंक,
पेशी ता. ०१/०९/२०२६,

वर्धा येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात, एम.जे.सी.कं. ८१/२०२६, मंगला दत्तुजी भाजीपाले व १ वि. निरंक, पेशी ता. ०१/०९/२०२६, सदरहु केसमध्ये दत्तुजी बिसनराव भाजीपाले व नानी दत्तु भाजीपाले हे मयत असुन त्यांचा मृत्यू अनुक्रमे दि. २०/१०/२००८ व दि. १९/११/२०२४ रोजी झालेला आहे. अर्जदार क्रं ०१. मंगला दत्तुजी भाजीपाले व ०२. रूपाली दत्तुजी भाजीपाले हे मयत यांचे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदार यांनी मयत दत्तुजी बिसनराव भाजीपाले व नानी दत्तु भाजीपाले यांचा मृत्यू पश्चात या न्यायालयात मुंबई रेगुलेशन ॲक्ट १९२७ चे भाग २ नुसार वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

सदरहू केसमध्ये कोणासही काही आपत्ती असल्यास अथवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महीन्याचे आत ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहु कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यास कायदेशीर वारसहक्क कायद्या अन्वये प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारिख १४/०८/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले.

**आदेशान्वये**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वर्धा**
**दि. १४/०८/२०२६**


# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते जिल्हाधिकारी वॉर रुमचे उद्घाटन

**वर्धा जनमाध्यम :** जिल्हाधिकारी कार्यालयात सुरु करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी वॉररुमचे उद्घाटन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते फित कापून करण्यात आले.



यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली तसेच सर्व उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, महसूल कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटनानंतर महसूल मंत्री व पालकमंत्र्यांनी वॉररुम तसेच व्हिडिओ कॉन्फरन्स रुमची पाहणी केली. जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी सादरीकरणाद्वारे वॉररुममध्ये करण्यात येणाऱ्या कामांची माहिती सादर केली.

या वॉररुममधून एकात्मिक निरीक्षण व सनियंत्रण केले जाणार आहे. डेटा आधारित निर्णय प्रक्रिया, अंमलबजावणीचा मागोवा आणि जिल्हा विकासाच्या प्राधान्यक्रमांसाठी हे एक समन्वयित केंद्र असणार आहे. याठिकाणी विकासात्मक नियोजन आणि कृतीसंगम, प्रकल्प प्रगती व आढावा डॅशबोर्ड, धोरण निर्मिती व समस्या निवारण, नवीन प्रकल्पांची संकल्पना व आराखडा निर्मिती, माहिती व्यवस्थापन व नियंत्रण, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यास वॉर रुमची महत्वाची भूमिका राहणार असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. वॉररुममधून वैनगंगा- नळगंणा नदीजोड प्रकल्प, शक्तिपीठ महामार्ग, नीती आयोगाचा आकांक्षित तालुका कार्यक्रम तसेच मित्राच्या महास्ट्राईड प्रकल्पाचे सनियंत्रण केले जाणार आहे.


### सार्वजनिक जाहीर नोटीस

याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, माझी अशील सौ. पूजा आशिष गिरडकर या खालील मालमत्तेच्या पूर्ण व कायदेशीर मालक व ताबेदार आहेत.

मालमत्तेचे वर्णन

मौजा पिंपळगाव (मा.), मौजा क्र. १०३, पी.एच. क्र. ३४, संत तुकडोजी वार्ड, सर्व्हे क्र. २१७, सर्व्हे क्र. २१७/४२ (ऑनलाईन ७/१२ उताऱ्यानुसार), ले-आऊट कन्व्हर्जन मंजूर प्लॉट क्र. ४२, मालमत्ता क्र. ८७४४ (कर नोंदीनुसार), क्षेत्रफळ ६१.६० चौ.मी. (६६२.८१ चौ.फुट), ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथील मिळकत.

चतु:सीमा
उत्तर: ले-आऊटमधील ९ मीटर रुंदीचा रस्ता,
दक्षिण: दुसरा ले-आऊट,
पूर्व: प्लॉट क्र. ४३,
पश्चिम: प्लॉट क्र. ४१,

तसेच, श्री. सेविका जगदीश लांडगे यांनी वरील मालमत्तेबाबत नोंदणीकृत विक्रीखत क्र. ४४१२/२०२४ दिनांक १०/०७/२०२४अन्वये श्री. आशिष गंगाधरराव गिरडकर यांच्या नावे विक्री केली आहे.

माझ्या अशील यांचे मूळ लिंक विक्रीखत क्र. ४५९६/२०२२ दिनांक ३०/०९/२०२२ हरवले / गहाळ झाले असून, त्याचा सर्वतोपरी शोध घेतला असता ते मिळून आलेले नाही.


माझी अशील सौ. पूजा आशिष गिरडकर यांनी ए.एच.एफ.एल (आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) येथे गृहकर्जासाठी अर्ज केलेला असल्याने सदर सार्वजनिक नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.वरील मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्ती, बँक, वित्तीय संस्था, संस्था, प्राधिकरण किंवा इतर कोणास हक्क, मालकी, स्वारस्य, दावा, आक्षेप, गहाण, बोजा, ताबा किंवा इतर कोणताही अधिकार असल्यास, अथवा कोणाच्या ताब्यात मूळ विक्रीखत क्र. ४५९६/२०२२दिनांक ३०/०९/२०२२ असल्यास, त्यांनी या नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत आवश्यक कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

अन्यथा, वरील मालमत्तेबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप किंवा दावा नाही असे समजण्यात येईल व माझी अशील कर्ज व्यवहार व इतर आवश्यक कार्यवाही पुढे चालू ठेवतील. त्यानंतर प्राप्त होणारा कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा - ४४२००१**
**मो. क्र.: ९८२२४२६१६८**










# जनमाध्यम




e paper www.janmadhyam.com एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार १५ ऑगस्ट २०२६







# जनगणना-2027 मध्ये जात देखील विचारली जाईल

## स्वातंत्र्यानंतर असे पहिल्यांदाच, कोविड लस कुठे घेतली, हे देखील सांगावे लागेल; ४० प्रश्नांची यादी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्र सरकारने जनगणना-२०२७ साठी ४० प्रश्नांची यादी जाहीर केली आहे. यात लोकांना च्क्, च्क्र किंवा इतर जातीबद्दल विचारले जाईल. स्वातंर्त्यानंतर पहिल्यांदाच सर्व समुदायांच्या जातीची माहिती जनगणनेत नोंदवली जाईल. यापूर्वी २०११ च्या जनगणनेच्या फार्ममध्ये २९ प्रश्न होते. यात जातीशी संबंधित माहितीसाठी फक्त च्क्/च्क्र चा पर्याय होता. आता जनगणना-२०२७ च्या प्रश्नांच्या यादीत जातीशी संबंधित प्रश्न क्रमांक १० वर आहे, ज्यात SC/ST सोबत जातीचा पर्यायही जोडला गेला आहे.

विशेष म्हणजे, लोकांनी कोविड लस कोठे घेतली होती, हा प्रश्नही विचारला जाईल. यासोबत मोबाईल नंबर, आधार, मतदार ओळखपत्र (Voter ID) आणि बँक खात्याशी संबंधित प्रश्नही असतील.




**दोन टप्प्यांत होईल जनगणना-**

**पहिला टप्पा -** घर सूचीकरण आणि गृहगणना: एप्रिल ते सप्टेंबर २०२६ दरम्यान होईल. यात घराची स्थिती, सुविधा, घरात उपलब्ध संसाधने आणि इतर निवासी माहिती गोळा केली जाईल. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात हे काम ३० दिवसांच्या कालावधीत होईल. यातील पहिल्या १५ दिवसांत लोकांना स्वयं-गणना करण्याची सुविधा देखील मिळेल.

**दुसरा टप्पा -** लोकसंख्या गणना: फेब्रु वारी २०२७ मध्ये होईल. यात प्रत्येक व्यक्तीची लोकसंख्याशास्त्रीय, सामाजिक-आर्थिक, सांस्कृतिक, स्थलांतर आणि प्रजनन संबंधित माहिती गोळा केली जाईल. याच टप्प्यात सर्व जातींची गणना देखील होईल.

लडाख आणि जम्मू-काश्मीरच्या बर्फाळ प्रदेशांसह उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशातील काही बर्फवृष्टी होणाऱ्या भागांमध्ये दुसरा टप्पा सप्टेंबर २०२६ मध्येच पार पडेल.

**पहिली डिजिटल जनगणना होईल-**

क्षुदद्मद्म २०२७ देशाची पहिली डिजिटल जनगणना असेल. डेटा डिजिटल माध्यमातून नोंदवला जाईल आणि लोकांना स्वतःची माहिती देण्याचा म्हणजेच सेल्फ-एन्यूमरेशनचा पर्यायही मिळेल.जनगणनेची कायदेशीर प्रक्रिया जनगणना कायदा, १९४८ आणि जनगणना नियम, १९९० अंतर्गत होईल. केंद्राच्या मते, लोकांनी दिलेली वैयक्तिक्र माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. जनगणना कायद्याच्या कलम १५ नुसार ती सार्वजनिक केली जाउ शकत नाही, माहिती अधिकार कायद्यांतर्गत (RTI) दिली जाउ शकत नाही आणि कोणत्याही न्यायालयात पुरावा म्हणून वापरली जाउ शकत नाही.

**जनगणनेवर किती खर्च होईल?**

केंद्र सरकारने जनगणना २०२७ साठी ११,७१८.२४ कोटी रु पयांच्या अर्थसंकल्पाला मंजुरी दिली आहे. जनगणना संपूर्ण देशात केंद्राच्या समन्वयाने होईल आणि राज्ये व केंद्रशासित प्रदेशांची सरकारे याच्या अंमलबजावणीत सहकार्य करतील.

## स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींचा देशाला संदेश

**नवी दिल्ली :** १५ ऑगस्ट या भारताच्या स्वातंर्त्य दिनाच्या एक दिवस आधी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये फाळणीचे स्मरण करत हा दिवस आपल्या राष्ट्रातील सलोखा व बंधुभाव जपण्याचा आपला संकल्प अधिक दृढ करो आणि विकसित भारत घडवण्याच्या दिशेने आपण सर्वांनी मिळून कार्य करावे असे म्हटले आहे. पंतप्रधान मोदी आपल्या पोस्टमध्ये म्हणाले की, आज आपण फाळणीच्या भीषणतेचा स्मरण दिवस पाळत आहोत. फाळणीचा फटका बसलेल्या त्या सर्वांच्या धैर्याचे आपण स्मरण करतो. इतिहासातील तो एक असा क्षण होता ज्याने अनेक आयुष्ये उद्ध्वस्त केली. कुटुंबे विस्थापित झाली, आप्तेष्ट हिरावले गेले आणि असीम वेदना सोसाव्या लागल्या. त्याच वेळी, या परिस्थितीवर मात करून लोकांनी शून्यातून आपले आयुष्य पुन्हा उभे केले, संकटांचे यशात रूपांतर केले आणि देशाच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. दरम्यान, भारत १४ ऑगस्ट रोजी विभाजन विभीषिका स्मृति दिवस पाळतो. १९४७ च्या फाळणीदरम्यान ज्यांनी आपले प्राण गमावले आणि अकल्पनीय यातना सहन केल्या, त्या सर्वांना देश आदरांजली वाहत आहे. १९४७ मध्ये भारताला स्वातंर्त्य मिळाल्याच्या वेळी, देशाच्या मोठ्या भागाला फाळणीच्या वेदना सहन कराव्या लागल्या. फाळणीनंतर पंजाब आणि बंगाल (पाकिस्तान) च्या विभागलेल्या भागांमध्ये आपले सर्वस्व मागे सोडून लाखो लोकांनी स्वतंत्र भारतात आसरा घेतला. हा दिवस आपल्या राष्ट्रातील सलोखा व बंधुभाव जपण्याचा आपला संकल्प अधिक दृढ करो आणि विकसित भारत घडवण्याच्या दिशेने आपण सर्वांनी मिळून कार्य करावे, हीच सदिच्छा असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले.



## शिवसेना एकनाथ शिंदेंचीच-फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या शिवसेना पक्षाचं चिन्ह आणि नाव यावर सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरू आहे. गुरु वारी कपिल सिब्बल यांनी शिवसेना ठाकरे गटाची बाजू मांडताना सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तिवाद केला, दरम्यावर यावर प्रतिक्रिया देताना आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठं धान केलं आहे. हे करण सर्वोच्च न्यायालयाच्या विचाराधीन आहे. यावर सर्वोच्च न्यायालय निर्णय देणार आहे. पण त्यापूर्वी लोकन्यायालयाने हा निर्णय २०२४ साली विधानसभेच्या निवडणुकीच्या माध्यमातून दिला आहे. शिवसेना ही एकनाथ शिंदे यांची आणि राष्ट्रवादी ही अजित पवार यांची आहे, यावर लोकन्यायालयाने शिक्कामोर्तब केलेलं आहे. त्यामुळे आता सुप्रीम कोर्ट काय निर्णय घेणार? याकडे सर्वांचं लक्ष आहे, परंतु सुप्रीम कोर्ट देखील हाच निर्णय देईल अशी आम्हाला अपेक्षा आहे, असं यावेळी फडणवीस यांनी म्हटलं आहे. मात्र दुसरीकडे राष्ट्रवादी च्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मात्र शिवसेना ही कालही, आजही आणि उद्याही उद्धव ठाकरे यांचीच तसेच राष्ट्रवादी ही शरद पवार यांचीच असणार आहे, असं विधान केलं आहे.



# बँकाकमध्ये 28 तासांपासून अडकले भारताचे 200 लोक

## मध्य प्रदेशचेही अनेक प्रवासी; एअर इंडियाच्या विमानाने परत यायचे होते



**भोपाळ//वृत्तसंस्था :**थायलंडची राजधानी बँकाक येथे भारताचे २०० लोक गुरु वार संध्याकाळपासून अडकले आहेत. ते एअर इंडियाच्या विमानाने भारतात परत येत होते, परंतु तांत्रिक बिघाडामुळे विमान धावपट्टीवरून परत आले.

प्रवाशांमध्ये अनेकजण मध्य प्रदेशचेही आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, एअर इंडियाने ना विमान रद्द केले ना परतावा दिला. कधी २ तर कधी ४ तास विमान उशिरा असल्याचे सांगितले जात आहे. अशा प्रकारे २८ तास उलटून गेले आहेत.प्रवाशांनी सांगितले की, गुरु वारी संध्याकाळी ४-५ वाजल्यापासून ते विमानतळावर पोहोचले होते. आम्ही खूप त्रस्त आहोत. २८ तासांपासून फक्त वाटच पाहत आहोत, पण दुसरी कोणतीही फ लाइट अरेंज केली जात नाहीये. एअर इंडियाच्या कोणत्याही अधिका-याने आमच्याशी बोलले नाही. शुक्रवारी फक्त चेक-इन आणि चेक-आउटच करत आहेत. लहान मुले आणि महिलाही आहेत. सर्वजण नोकरी करणारे आहेत. तासनतास त्रास सहन करत आहेत.

**कधी विमानतळावर तर कधी हाटेलमध्ये पाठवत आहेत-** इंदूरच्या दिव्या माहेश्वरी यांनी सांगितले की, त्या त्यांच्या मावशीसोबत फिरायला आल्या होत्या. गुरु वारी संध्याकाळी ५.३० वाजता बँकाकहून परत येणारी एअर इंडियाची फ लाइट होती. ही फ लाइट दिल्लीसाठी होती. संध्याकाळी ६ वाजता बोर्डिंग केले आणि ६.१५ वाजता रन-वेवर आलो. सर्व प्रवासी फ लाइटमधून सूर्यास्ताचा व्हिडिओ बनवत होते. तेवढ्यात थोड्याच वेळात फ लाइट परत रनवेवर पोहोचली. केबिनची लाईट चालू झाल्यावर क्रू मेंबर्सना विचारले की काय झाले?

त्यांनी तांत्रिक बिघाड झाल्याचे कारण दिले आणि अपडेट घेण्याची माहिती दिली. गुरु वार रात्री ८.३० वाजेपर्यंत फ लाइटमध्ये बसवून ठेवले होते. अर्ध्या तासानंतर फ लाइटमधून उतरवले आणि एअरपोर्टवर पोहोचलो. प्रवाशांनी माहिती दिली की रात्री ११.१५ वाजता फ लाइट उड्डाण भरेल. थोड्या वेळाने फ लाइट दुस-या दिवसापर्यंत रद्द राहील असे सांगण्यात आले.

**रात्री १२ वाजताची हाटेलची व्यवस्था-**एअर इंडियानेच हाटेलची व्यवस्था केली. जिथे रात्री १२ वाजता पोहोचले. आज, शुक्रवारी संध्याकाळी ५.३० वाजता विमान असल्याचे सांगितले. दुपारी १.३० वाजता विमानतळावर परत आले. तीन ते चार तास वाट पाहिल्यानंतर संध्याकाळी ७.१५ वाजता विमान उड्डाण करेल असे सांगण्यात आले. सध्याच्या विमानात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे प्रवाशांनी एअर इंडियाकडे दुस-या विमानाने भारतात पाठवण्याची मागणीही केली. अनेक प्रवासी असे आहेत जे दुस-या विमानाने भारतात परतले.

## राहुल गांधीविरोधातील सावरकरांशी संबंधीत प्रकरण रद्द

**नवी दिल्ली :** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात स्वातंर्त्यवीर सावरकर यांच्याशी संबंधित मानहानी प्रकरणी कनिष्ठ न्यायालयात दाखल असलेले प्रकरण रद्द करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी यासंदर्भातील निकाल दिला. हे प्रकरण उत्तर प्रदेशातील आहे. सर्वोच्च न्यायालयानेराहुल गांधी यांच्या विरोधात देण्यात आलेली तक्रार आणि न्यायाधीशांनी हजर राहण्याचे दिलेले आदेश रद्द केले आहेत. जेव्हा प्रकरणात कलम नोंदवणे गरजेचे असते आणि त्याची नोंद नसते, तेव्हा ते प्रकरण आपोआपच रद्द होते, असे न्यायालय म्हणाले. न्यायालय म्हणाले की, उत्तर प्रदेश सरकारकडून दाखल करण्यात आलेल्या प्रतिज्ञापत्रात कलमांचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे गुन्हा आणि न्यायाधीशांनी काढलेला आदेश रद्द करत आहोत. हे प्रकरण २०२२ मधील आहे. भारत जोडो यात्रेदरम्यान राहुल गांधी यांनी महाराष्ट्रात झालेल्या कार्यक्रमात वीर सावरकर यांच्याबद्दल एक विधान केले होते. राहुल गांधी यांनी सावरकर हे इंग्रजांचे नोकर होते असा उल्लेख केला होता आणि सावरकर इंग्रजांकडून पेन्शन घेत होते, असे विधान केले होते. यावर आक्षेप घेत वकील नृपेंद्र पांडे यांनी कनिष्ठ न्यायालयात तक्रार दिली होती. न्यायालयाने तत्कालीन भारतीय दंड विधान कलम १५३ अ आणि ५०५ नुसार राहुल गांधी यांना हजर राहण्याचे आदेश दिले काढले होते. हे प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले आहे.



## मराठी सक्तीची; 18 पासून कारवाई

**पुणे** : राज्यातील ऑटो-रिक्षा आणि इलेक्ट्रानिक मीटर असलेल्या टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान असणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी १५ ऑगस्ट ही अंतिम मुदत देण्यात आली होती. ही मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवली जाणार नसल्याचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे.



महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील प्रस्तावित सुधारणांनुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांशी योग्य संवाद साधता यावा, त्यांचे म्हणणे समजून घेता यावे आणि त्यांचा प्रवास सुरक्षित व सोयीस्कर व्हावा, यासाठी चालकांना स्थानिक(मराठी) भाषेचे व्यावहारिक ज्ञान असणे आवश्यक आहे. चालकांना १७ तारखेपर्यंत वेळ देण्यात आला असून १८ तारखेपासून कारवाईला सुरु वात केली जाईल असा इशारा त्यांनी दिला आहे. वाहनांना हाय-सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसवण्याच्या निर्णयाबाबतही सरनाईक यांनी महत्त्वाची माहिती दिली. वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट लावण्यासाठी ३१ डिसेंबर २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर नवीन वर्षात १ जानेवारीपासून नियम मोडणा-या वाहनधारकांवर थेट कारवाई सुरू केली जाईल असे त्यांनी स्पष्ट केले. पुण्यातील बसस्थानकांवरील अस्वच्छता आणि ठेकेदारांच्या मनमानी कारभारावरून मंत्री प्रताप सरनाईक यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. ठेकेदारांनी एसटी कर्मचा-यांना आणि प्रवाशांना मूलभूत सुविधा न दिल्यास कडक कारवाई करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. सध्या सोशल मीडियावर विद्यार्थ्यांचे अनेक व्हिडिओ व्हायरल होत आहेत. यामध्ये विद्यार्थी रस्त्यांवरील खड्ड्यांची अवस्था आणि बसच्या अपु-या फे-यांबद्दल तक्रार करत आहेत. यावर बोलताना सरनाईक यांनी सांगितले की, त्यांच्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी विशेष हेल्पलाइन आहे.

# गेट टू गेदर : '30 वर्षांनी V.M.V. च्या बेंचवर परतली 1993-96 ची पोरं!

## उपविभागीय अधिकारी विवेक काळकर यांची खास उपस्थिती

**अमरावती/प्रतिनिधी-** 'अरे तूच का रे तो... अरे वजन किती वाढवलंय!' 'तुझ्या डोक्यावरचं काय झालं?' अशा एकमेकांना चिडवण्यापासून सुरुवात झालेल्या या भेटीचा शेवट मात्र डोळ्यात पाणी आणि 'पुन्हा लवकर भेटू' या वचनाने झाला.

विदर्भ महाविद्यालय, अमरावती म्हणजे V.M.V. च्या १९९३ ते १९९६ या सुवर्ण बॅचचा ३० वर्षांनंतरचा महाभेटीचा सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. २९ वर्षांनी एकत्र आलेल्या या फौजेला बघून वाटलंच नाही की मधल्या काळात कोणी डॉक्टर, कोणी वकील, कोणी बिझनेसमन आणि कोणी सरकारी अधिकारी झालंय. इथे सगळे फक्त 'V.M.V. चे पोरं होते.

**सामाजिक बांधिलकीसोबत जिव्हाळ्याचा नवा अध्याय-**हा केवळ गेट-टु-गेदर नव्हता. गेल्या वर्षापासून या बॅचने 'मैत्री + समाजसेवा' हा मंत्र जपायला सुरु वात केली आहे. त्यामुळे यावर्षीचा गेट-टु-गेदर म्हणजे जुन्या आठवणींना उजाळा देण्यासोबतच, पुढे एकत्रितपणे सामाजिक कार्य करण्याचा नवा संकल्प होता.

**'सर' आले आणि लेक्चर सुरू झालं... आठवणींचं!**

या भेटीचं खास आकर्षण होते आमचेच बॅचमेट आणि सध्या वनविभागात उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत असले विवेक काळकर काळकर सरांना बघताच सगळे पुन्हा एकदा शेवटच्या बाकावर बसले. त्यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थी दशेतील धमाली, अभ्यासाच्या टेन्शनपासून ते आजच्या जबाबदा-यांपर्यंतचा प्रवास सांगितला. 'पदं येतील जातील, पण V.M.V. ने दिलेली मैत्री आणि संस्कार कायम जपा' असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला.

**त्या दिवसांची पुनरावृत्ती...** कार्यक्रमात



शाळेच्या दिवसांतील किस्से निघाले. कोण सायकलवर तिघे-चौघे बसून कॉलेजला यायचं, कोण कॅन्टीनचे उधार फेडायचं विसरायचं, आणि 'सामूहिक संडास ट्रीप' ते 'शेवटच्या पीरेडला बंक मारणे' असे किस्से ऐकून सभागृह हास्याने फुलून गेलं. हात आता टिफिनऐवजी ब्रीफकेस आल्या आहेत, पोट थोडे वाढले आहेत, केस थोडे कमी झाले आहेत... पण खांद्यावर हात टाकून 'चल रे' म्हणण्याची सवय काही गेली नाही!

**पुढचा संकल्प-** पुढील वर्षीही असाच गेट-टु-गेदर घेण्यासोबतच, गरजू विद्यार्थ्यांना मदत करणे आणि पर्यावरण संवर्धनासाठी एकत्र काम करण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी केला. शेवटी एकच वाक्य सगळ्यांच्या तोंडात होतं - 'डिग्री विसरता येईल, पण V.M.V. आणि ही मैत्री नाही!'

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व बॅचच्या मित्र-मैत्रिणींनी विशेष मेहनत घेतली कार्यक्रमाचे सूत्र संचालन बंडु आठवले यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुधीर रोहनकर, प्रमोद नागपुरे, सुनीता साबळे, स्वाती भटकर,पंकज शिरभाते, अलका घोम, उज्वला खंडारे, वैशाली खोब्रागडे, पंकज मेश्राम, जयेश गुप्ता,बंडू आठवले, पंकज मेढे, संदीप आंबुलकर, राजेश तायडे, गजानन सरोदे, रामराव वानखेडे, प्रवीण माहोरे, त्र्यंबक कुचे, मुकेश बोडसे, श्रीकांत देशमुख, सुभाष चौधरी, सुरेश कोरडे, राज सिंगरोल, अविनाश जाधव, प्रवीण पवार, ईश्वर निमतकर, नंदू गुल्हाने, जेहेरोज काजी रमजान लालुवाले, बब्बू चौधरी इद्रिस लाखनी, शेखर डेंगळे ,चंद्रशेखर गाजभिये, मनीषा मानकर, स्वाती भटकर, वैशाली खोब्रागडे, रेखा ढोके, रजनी शंभरकर, सीमा शर्मा, माया इंगळे, गीता चिंचखेडे, सुनीता कोरडे, शीतल, भारती गडपाले सह माजी विद्यार्थी उपस्थित होते.


**TENDER NOTICE**

Supply and Installation of Weighing Bridge 60 MT Including Civil works

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. Teosa Farmer Producer Company Limited Ta Teosa Dist Amravati is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, www.smart-mh.org, in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is 24/08/2026 up to 6.00 PM. Any updates or notices shall be published on the aforementioned website only.

Tender Submission- Mamarpan Niwas Near Shree Ganesh Lakshmi park, Sub District Hospital Daryapur, Greenluck Fpcl Daryapur, Amravati 444803 Pre-bid Meeting & Opening place District Implementation Unit, SMART Project Dist. AMRAVATI DSAO Office Campus, Visava Colony, Old Bypass Road, Amravati 444602



**जाहीर नोटीस**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती**

क्रमांक/न.भू-१/अपील अर्ज क्र.२७८६/२०२५ — अमरावती, दिनांक १२/०८/२०२६

प्रति,
१) मंदाबाई कृष्णराव पवार
रा.नवाब प्लॉट, पेंशनपुरा, परतवाडा,
ता.अचलपूर, जि.अमरावती — अपिलार्थी

विरुध्द

१) उपअधिक्षक भूमि अभिलेख, अचलपूर
ता.अचलपूर, जि.अमरावती
२) सुमनताई भिमराव खानझोडे
३) आशा ज्ञानेश्वर भागवतकर (मय्यत)
३अ) अभिजीत ज्ञानेश्वर भागवतकर,
रा.पेंशनपुरा, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती
४) शिला चंद्रशेखर वाठोडकर
रा.यशोदा नगर, बडनेरा हायवे रोड, गल्ली नं.१, अमरावती
५) उषा सुधाकर बेलनकर
रा.पेंशनपुरा, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती — उत्तरार्थी

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजा मौजा परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील शिट नं.२९, प्लॉट क्र.६५ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी क्र.२ ते ५ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसलेमुळे उत्तरार्थी यांना याव्दारे कळविण्यात येते की, दिनांक १५/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का

सही/-
(महेशकुमार शिंदे)
जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख
अमरावती



**जाहीर नोटीस**

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.३८३/२०२६ — ने.ता.२४.०९.२०२६

अर्जदार : १. विजय वामनराव विधाते, **वय ६२ वर्षे, व्यवसाय - मजुरी**
**रा.गजानन कॉलनी, चांदूर बाजार,ता.चांदूरबाजार, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार वरील ठिकाणी राहतात.**मृतक वामनराव आनेजी विधाते **यांचा** मृत्यू दि.२५/०५/२०१० **रोजी मु.शिवंगा, पो.बेलोरा,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच** मृतक राधाबाई वामणराव विधाते **हिचा मृत्यू** दि.२३/०६/२०१२ **रोजी रा.निंभोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.**

**त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.**

**अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.३८३/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाण्पत्र देण्यात येईल.**

**आज दि.११.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार



***Form No.4***

CIVIL AND CRIMINAL COURT NANDGAON KHANDESHWAR
IN THE COURT OF Shri Shankar B. Ambhore
C.J.J.D. J.M.F.C. NANDGAON KH.

PROCLAMATION REQUIRING THE APPEARANCE OF A PERSON ACCUSED
*(See Section 82)*

s.s.c./168/2021
Shri Vinod Manohar Rohankar Vs Lokseva Gadi Karkhana Through Proporayter Abdul Raji Abdul Rajjak
NEXT DATE: 03.09.2026

**PUBLISHED THROUGH**
officer Incharge of Police Station/ Police Station Office

P.S. Loni

**WHEREAS Complaint has been made before me that** Lokseva Gadi Karkhana Through Proporayter Abdul Raji Abdul Rajjak**, Age- 50 years, R/o.** Ward No.4, Loni Takali, Tq. Nandgaon Khandeshwar, Dist. Amravati **has committed (or is suspected to have committed) the offence of punishable under Section** 138 **of the** NEGOTIABLE INSTRUMENT ACT**, and it has been returned to a warrant of arrest thereupon issued that the said** Lokseva Gadi Karkhana Through Proporayter Abdul Raji Abdul Rajjak **cannot be found, and whereas It has been shown to my satisfaction that the said** Lokseva Gadi Karkhana Through Proporayter Abdul Raji Abdul Rajjak **has absconded (or is concealing himself to avoid the service of the said warrant );**

**Proclamation is hereby made that the said** Lokseva Gadi Karkhana Through Proporayter Abdul Raji Abdul Rajjak**, Age-50 is required to appear at CIVIL AND CRIMINAL COURT NANDGAON KHANDESHWAR before** C.J.J.D. J.M.F.C. NANDGAON KH. **to answer the said complaint on the day of 03.09.2026.**

**Dated, this day of** 13.08.2026

शिक्का

Sign/-
C.J.J.D. J.M.F.C. NANDGAON KH.

## संपादकीय

### प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# स्वातंत्र्य दिन चुरायू होवो !

आपण आज आपला ८० वा स्वातंत्र्यदिन साजरा करत आहोत. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला मिळालेल्या स्वातंत्र्याला आज ७९ वर्षे पूर्ण झाली असून, देश एका नव्या पर्वाची सुरुवात करत आहे. दीडशे वर्षांच्या ब्रिटिश राजवटीतून मुक्त झालेल्या भारताचा हा राष्ट्रीय सण केवळ एक उत्सव नाही, तर तो देशाच्या लोकशाही मूल्यांची आणि एकात्मतेची आठवण करून देणारा दिवस आहे. हा दिवस देशासाठी प्राणांचे बलिदान देणाऱ्या सर्व ज्ञात आणि अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना कृतज्ञतापूर्वक आदरांजली वाहण्याचा आहे. आज आपण ज्या मुक्त वातावरणात श्वास घेत आहोत, ते केवळ या महान देशभक्तांच्या बलिदानामुळेच शक्य झाले आहे. १९४७ च्या अत्यंत प्रतिकूल, अंधकारमय आणि शंकास्पद परिस्थितीत सुरू झालेला प्रवास आज जगातील सर्वांत वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या रुपाने 'स्वावलंबी' भारताकडून 'विकसित व समर्थ' भारताकडे अशा अध्यायात रूपांतरित झाला आहे. आज जेव्हा भारत आपल्या स्वातंत्र्याच्या 'अमृत काळाकडून' शताब्दी वर्षाकडे (२०४७) वाटचाल करत आहे, तेव्हा उद्दिष्ट केवळ 'विकास' एवढेच सीमित नसून तो 'सर्वसमावेशक आणि शाश्वत विकास' असणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ७९ वर्षांत भारताने शिक्षण, विज्ञान, अर्थव्यवस्था, क्रीडा, लष्करी सामर्थ्य आणि तंत्रज्ञान या प्रत्येक क्षेत्रात जागतिक स्तरावर आपली ताकद सिद्ध केली आहे. चांद्रयान मोहीम, कोविड-१९ लसीचा विकास, पोलिओ निर्मूलन आणि डिजिटल क्रांती ही भारताच्या यशाची पावती आहेत. भारतीय राज्य घटनेने दिलेल्या न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या सार्वकालीन लोकशाही मूल्यांमुळे भारताची एकता, सांस्कृतिक विविधता आणि अखंडता टिकून राहण्यासाठी बळ मिळाले आहे. यंदाच्या स्वातंत्र्य दिनाची थीम 'युवा शक्ती फॉर विकसित भारत ॲट २०४७' अशी असून देशाच्या प्रगतीत, विज्ञानात, नवनिर्मितीत आणि आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीत युवकांचे महत्त्व अधोरेखित करणे हा यामागचा उद्देश आहे. मात्र, देशाला अजूनही पूर्ण विकसित राष्ट्राचा दर्जा मिळवायचा असून, लैंगिक व सामाजिक समानता आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी मोठा पल्ला गाठायचा आहे. भारताच्या स्वातंत्र्याच्या १०० व्या वर्धापन दिनानिमित्त, म्हणजेच २०४७ पर्यंत देशाला 'विकसित भारत' बनवण्याचे ध्येय ठेवण्यात आले असून, त्यासाठी प्रत्येक नागरिकाने राष्ट्रउभारणीत योगदान देण्याची गरज व्यक्त केली जात आहे. स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिन साजरा करत असताना, आपल्यासमोर अद्यापही काही गंभीर आव्हाने उभी आहेत. भ्रष्टाचार, बेरोजगारी, पर्यावरणाचा ऱ्हास, जातीयता आणि सामाजिक मतभेद यांसारख्या समस्या आजही देशाच्या विकासाच्या मार्गात अडथळा ठरत आहेत. हक्क आणि स्वातंत्र्य मिळणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच आपल्या कर्तव्यांची जाणीव असणेही आवश्यक आहे. केवळ १५ ऑगस्ट किंवा २६ जानेवारीला राष्ट्रध्वजाला वंदन करून देशभक्ती संपत नाही. पर्यावरण रक्षण करण्यासाठी झाडे लावणे आणि पाण्याचा योग्य वापर करणे, जात-धर्म विसरून प्रत्येकाशी प्रेमाने वागणे, सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे, स्वच्छता पाळणे आणि कायद्याचे पालन करणे हीच आजच्या काळातील खरी देशभक्ती आहे. या दीर्घ प्रवासाचे सर्वात मोठे यश म्हणजे भारताने साध्य केलेली 'धोरणात्मक स्वायत्तता' आणि 'स्वावलंबन'. अटी-शर्तींवर अवलंबून राहणारा भारत आज केवळ स्वतःच्या गरजा भागवत नाही, तर जागतिक संकटांच्या वेळी जगाला अन्न, औषधे, लस आणि अंतराळ तंत्रज्ञानाची मदत देणारा 'आरोग्य आणि अन्नदाता' बनला आहे. यशाचे हे उत्तुंग शिखर गाठत असताना आपल्यापुढील आव्हानांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. वाढती लोकसंख्या, हवामान बदलामुळे शेतीवर होणारा परिणाम, उत्पन्न आणि संपत्तीतील विषमता, दारिद्र्य निर्मूलन आणि प्रत्येक तरुणाला गुणवत्तेनुसार रोजगार उपलब्ध करून देणे ही आव्हाने आज आपल्यासमोर उभी आहेत. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आणि तरुणांचा देश आहे. आपल्या देशाची तरुण पिढी हीच आपली खरी ताकद आहे. जेव्हा प्रत्येक नागरिक आपले वैयक्तिक हित बाजूला ठेवून राष्ट्रहिताला प्राधान्य देईल, तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने 'विश्वगुरू' बनेल. चला, आजच्या या पवित्र स्वातंत्र्य दिनी आपण सर्वजण एकत्र येऊन संकल्प करूया की, आपण एक जबाबदार, प्रामाणिक आणि निष्ठावंत नागरिक बनू आणि आपल्या भारत भूमीला अधिक समृद्ध, सुरक्षित आणि शक्तिशाली बनवण्यासाठी निरंतर कार्य करत राहू!

# 'एल निनो'चे सावट

**अत्यंत गंभीर भूजलाची असताना त्याचा बेबंद उपसा सुरूच आहे. मुख्य धोरणात्मक प्रश्न असा की, उसासाठी, इथेनॉलसाठी, दारूसाठी आणि पाणीखाऊ उद्योगांसाठी होणारा भरमसाट पाण्याचा वापर केव्हा थांबवणार?**

सांप्रत भारतासह संपूर्ण जग अतोनात आणि परस्परावलंबी, अनिश्चित बेभरवशाच्या वातावरणातून जात आहे. आजघडीची सर्वाधिक चिंतेची बाब म्हणजे हवामान अरिष्टाचे अभूतपूर्व संकट या अस्तित्वाच्या संकटाच्या निराकरणासाठी एकजूट होण्याऐवजी जगभरातील सत्ताधीश, विशेषतः महासत्ताधीश, खनिज इंधने आणि मोक्याच्या ऊर्जा-संसाधनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्ध, आक्रमण आणि नरसंहाराचा मार्ग अवलंबत आहेत.

राष्ट्राराष्ट्रांतील आर्थिक व्यवहार, सौहार्द आणि शांतता जोपासण्यासाठी गेल्या ८० वर्षांत विकसित झालेली संयुक्त राष्ट्रांची संहिता, आंतरराष्ट्रीय करार आणि कायदे धुडकावले जात आहेत. २१ व्या शतकातील मानवसमाजाची ही पाशवी वाटचाल चिंताजनक आहे. त्यामुळे तंत्रज्ञानात्मक क्रांती आणि प्रचलित विकासप्रक्रियेचा मुळातून फेरविचार करण्याची वेळ आली आहे. १९ व्या व २० व्या शतकातील वाढवृद्धीप्रवण विकासप्रारूपे भांडवली, साम्यवादी किंवा मिश्र २१ व्या शतकात निसर्ग, मानव, समाज आणि संस्कृतीच्या हिताची नाहीत, हे आता स्पष्ट झाले आहे.

या पार्श्वभूमीवर भारत आणि जगाला भेडसावणाऱ्या 'एल निनो' घटनाक्रमाचा विचार करणे आवश्यक आहे. जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाच्या धोक्याकडे सहा-सात दशकांपासून शास्त्रज्ञ सातत्याने लक्ष वेधत आहेत. तरीही धोरणकर्ते आणि सत्ताधीश या इशाऱ्यांकडे बेमुर्वतपणे दुर्लक्ष करतात. कारण या संकटाची किंमत त्यांना नव्हे, तर सामान्य जनतेला मोजावी लागते. मात्र, प्रत्येकजण सुरक्षित असल्याखेरीज कोणीही अंतिमतः सुरक्षित राहू शकत नाही, हे सत्य सत्तासंपत्तीधारक विसरतात.

'एल निनो' म्हणजे नेमके काय? हवामान बदलाच्या प्रक्रियेत प्रशांत महासागरातील उष्ण पाण्याचा प्रवाह सक्रिय होतो आणि निसर्गचक्रात बाधा निर्माण होते. त्याचा परिणाम पर्जन्यचक्रावर होतो. दक्षिण अमेरिकेतील पेरू परिसरात नाताळच्या आसपास दिसणारी ही घटना अनेक शतकांपासून ज्ञात आहे. मात्र, कार्बन डाय ऑक्साइड आणि इतर हरितगृह वायूंच्या अति-उत्सर्जनामुळे आणि जागतिक तापमानवाढीमुळे हे संकट अधिक गंभीर स्वरूप धारण करत आहे. हवामान अरिष्टाची तीव्रता वाढेल तशी एल निनोसारख्या घटनांची वारंवारता आणि व्याप्तीही वाढते. यंदा २०२६ मध्ये त्याचा भारतासह अनेक देशांना आणि खंडांना जबरदस्त फटका बसेल, असे जागतिक हवामान संस्था आणि स्वतंत्र संशोधकांचे अनुमान आहे. भारतात दीर्घकालीन सरासरीच्या ९० टक्के किंवा त्यापेक्षा कमी पाऊस पडू शकतो, असे अनुमान गेल्या काही महिन्यांपासून वर्तवले जात आहे. महाराष्ट्रासह अनेक राज्यांवर त्याचे दूरगामी परिणाम होतील, असेही सांगितले गेले आहे.



राज्य सरकारने धरणांमधील उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी राखून ठेवण्याची घोषणा केली आहे परंतु खरी कसोटी अंमलबजावणीची आहे भूजलाची स्थिती भूजलाची स्थिती अत्यंत गंभीर असतानाही त्याचा बेबंद उपसा सुरूच आहे. उसासाठी, इथेनॉलसाठी, दारूसाठी आणि पाणीखाऊ उद्योगांसाठी होणारा भरमसाट पाण्याचा वापर केव्हा थांबवणार?

२०२६ मधील प्रलंबित मान्सूनमुळे १९७२-७४ च्या सलग दुष्काळी स्थितीची आठवण होते. त्या काळात गाव-शिवारात भूगर्भात पाणी होते आणि समाजात परस्पर साहयसहकार्याची भावना होती. गेल्या पाच दशकांत आपण भूगर्भ कोरडा केला; ऊसासारख्या पिकांसाठी पाणी उधळले आणि चंगळवादाच्या नादी लागून माणुसकीची हानी केली. हजारो वर्षांचे संचित भूजल आणि सामाजिक समूहबंध ही मौलिक संसाधने आपण मोडीत काढली.

गत सहा-सात दशकांत पृथ्वीच्या संसाधनांची आणि उत्सर्जन सामावून घेण्याच्या क्षमतेची अंदाधुंद बरबादी झाली. त्यामुळेच एल निनोसारखी संकटे अधिक तीव्र होत आहेत. पॅरिस करारात २०१५ साली मान्य झालेली तापमानवाढ १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्याची सीमा आपण ओलांडत आहोत किंवा तिच्या उंबरठ्यावर आहोत. हवामान आणीबाणी आणि पृथ्वीच्या धारणक्षमतेचे भान ठेवून कायमस्वरूपी उपाययोजना करणे हेच आजचे सर्वोच्च आव्हान आहे.

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाची मुख्य मागणी होती करील त्यालाच जमीन हक्क. परंतु ती प्रत्यक्षात प्रभावीपणे अमलात आली नाही. उलट हरित क्रांतीच्या रासायनिक आणि असेंद्रिय ऊर्जा-सघन शेतीपद्धतीमुळे देशाची मृदसंपदा, जलसंसाधने, वने-कुरणे आणि जैवविविधता यांची मोठी हानी झाली. परिणामी केंद्र सरकारला रासायनिक खतांवर प्रचंड अनुदान द्यावे लागत आहे. आपण शेती, औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाच्या अशा संचयी चक्रात अडकलो आहोत की, हवामान अरिष्ट दिवसेंदिवस गंभीर बनत आहे.

या संदर्भात अनेक संशोधन निष्कर्ष डोळ्यांत अंजन घालणारे आहेत. डार्थमाउथ महाविद्यालयातील भूगोल विषयाचे प्रा. जस्टिन मॅकिन यांनी केलेल्या अभ्यासानुसार २०२६ च्या एल निनोमुळे भारताचे प्रचंड आर्थिक नुकसान होऊ शकते. त्याचे परिणाम पुढील काही वर्षे जाणवू शकतात. याचा अर्थ केवळ कृषी उत्पादनात घट नव्हे, तर राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार, महागाई, अन्नसुरक्षा आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

पश्चिम आशियातील युद्धजन्य स्थितीमुळे जागतिक अर्थकारणाला आधीच मोठा धक्का बसला आहे. भारतासह अनेक देश आयातित पेट्रोलियम पदार्थ, गॅस, खते, पॉलिमर आणि प्लास्टिकवर अवलंबून आहेत. हे अवलंबित्व आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. त्यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऑटोमेशनमुळे रोजगारवाढीवर मर्यादा येत आहेत. त्यामुळे बेरोजगारांची अवस्था अधिक खडतर होण्याची शक्यता आहे.

तरीही पर्याय आहेत. आजचा धोका ही संधीही आहे. निसर्ग आणि मानवी साधनसंपत्तीमध्ये गुंतवणूक करणे हा ठोस पर्याय आहे. तो कमी भांडवलखर्चाचा, सामाजिक पर्यावरणीयदृष्ट्या सुरक्षित आणि जलद परिणाम देणारा असू शकतो. बायोगॅस, पुनर्निर्मितीक्षम ऊर्जा, सेंद्रिय शेती, पर्जन्यजल संकलन, स्थानिक बांधकाम साहित्य, श्रमकेंद्रित तंत्र आणि कौशल्याधारित ग्रामीण उद्योग यांना प्राधान्य देणे गरजेचे आहे.

निसर्गकेंद्री शिक्षणपद्धती, आरोग्य व्यवस्था, स्थानिक जलव्यवस्थापन आणि सामुदायिक संसाधनांचे संरक्षण यांद्वारे सर्वांच्या मूलभूत गरजा आणि आवश्यक सेवांची पूर्तता होऊ शकते. प्रत्येकाने गरजेनुसार उपभोग घ्यावा आणि क्षमतेनुसार सामाजिक उत्पादनात भर घालावी, ही जीवनदृष्टी आज अधिक महत्त्वाची ठरते. मार्क्स, थोरो, रस्किन, टॉलस्टॉय आणि गांधी यांसारख्या विचारवंतांनी मांडलेले आवश्यक श्रम आणि संयमी जीवनाचे तत्त्व आज नव्याने समजून घ्यावे लागेल. सारांश, २१ व्या शतकासाठी नव्या नैतिक, मानवीय आणि प्रबुद्ध समाजव्यवस्थेची गरज आहे. सत्तासंपत्तीच्या हावेतून वाढलेला निसर्गविध्वंस, युद्ध, विषमता, शोषण आणि व्यसनाधीनता यांवर मात करण्यासाठी समतामूलक शाश्वत विकासाची दिशादृष्टी स्वीकारणे हाच एकमेव उपाय आहे. एल निनो आणि त्यामागील हवामान बदलाचे कायमस्वरूपी निराकरण याच मार्गाने शक्य आहे.

**प्रा. एच. एम. देसरडा**

# भीक नको पण, कुत्रा आवर !

आज आपण ८० वा स्वातंत्र्य दिन साजरा करत आहोत. प्रत्येक गावात, तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यात आणि देशात अनेक पाषाणहृदयी कारभारी 'बेगडी' भाषण ठोकून, आपण किती 'देशप्रेमी' आहोत, असा पुळका दाखवतील. पण, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचे काल जे 'सुप वाजले' म्हणण्यापेक्षा, अपेक्षेप्रमाणे ते अक्षरशः पाण्यात वाहून गेले, याचे यांना काही सोयरसुतक आहे का? स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला 'निर्लज्ज' कारभा-यांनी अधिवेशनाच्या नावाखाली ३ आठवडे जो 'जागरण गोंधळा'चा कार्यक्रम राबवला, ते बघून खरेच आपण स्वतंत्र झालो आहोत का? आणि हीच 'लोकशाही' आहे का? असे प्रश्न पडतात. वारंवार झालेला गोंधळ आणि कामकाजातील सततचे व्यत्यय यामुळे सभागृहाचे कामकाज अनेकदा ठप्प झाले, ही खेदाची बाब आहे. कामकाजाचे मौलव्यान तास वाया गेल्याने राष्ट्रीय महत्त्वाच्या विषयांवर अर्थपूर्ण चर्चा आणि विचार विनिमय करण्याची संधीही सभागृहाने गमावली, अशी खंत व्यक्त करण्याची वेळ राज्यसभेचे अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांच्यावर येणे, ही फार मोठी शोकांतिका आहे.

आकडेवारीनुसार लोकसभेत ८५% तर, राज्यसभेत ६७%वेळ वाया गेला आहे. १९ दिवसांच्या कामकाजात फक्त ११७ तास कामकाज झाले. तर, केवळ १२ विधेयके संसदेत मंजूर झाले. ९ विधेयके ही लोकसभेत चर्चेविना मंजूर झालीत. लोकसभेची उत्पादकता ही केवळ १९% तर, राज्यसभेची उत्पादकता ही ३९%राहिली. अतिशय संतापजनक बाब म्हणजे, लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास केवळ १% म्हणजे, फक्त ९ मिनिटे चालला. तर, राज्यसभेत १२%म्हणजे २ तास चालला. लोकसभेत ३८० पैकी फक्त २ प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. तर, राज्यसभेत २८५ पैकी केवळ १६ प्रश्नांची तोंडी उत्तरे देण्यात आली. अधिवेशनाचा ७,०२३ मिनिटे म्हणजे ११७ तास व ३ मिनिटांचा बहुमुल्य वेळ वाया गेला. एकूण १७५ कोटी रुपयांचा चुराडा झाला. अशा या अतिशय गंभीर आणि लाज वाटणा-या परिस्थितीचे वर्णन केल्यास चुकीचे ठरू नये. मागील वर्षीचे अधिवेशनही तत्कालीन उपराष्ट्रपती जगदीप धनकड यांच्या अकस्मात दिलेल्या राजीनाम्यामुळे पाण्यात गेले होते. तर, यावेळी 'जंतरमंतर'वरील आंदोलक आणि विरोधकांच्या दबावाखाली केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देऊनही संसदेतील तिढा अखेरपर्यंत सुटला नाही. 'सुटला' म्हणण्यापेक्षा एकाही लोकप्रतिनिधीला तो 'सोडवण्या' त रस नव्हता, असेच दिसले. २२ जून ते १० जुलै दरम्यान राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन पार पडले. नित्यनियमाप्रमाणे याही अधिवेशनाकडे बहुतांश आमदारांनी पाठ फिरवली. तर, काहींनी बाहेर हजेरीपटावर उपस्थिती दाखवून सभागृहात येण्याची तसदी घेतली नाही. खरेतर, 'लोकशाही'चा गळा घोटला' जात आहे, असा रोज 'गळा' काढणा-या व संसद आणि विधिमंडळात गोंधळ घालणा-या या 'नौटंकी' कारभा-यांचा आजच्या स्वातंत्र्य दिनी भव्य नागरी सत्कार करायला हवा.

### माझेही मत

राज्य विधिमंडळ अधिवेशनाचा खर्च अंदाजे ५० कोटींच्या आसपास असतो. तर सध्या चालू असलेल्या लोकसभा व राज्यसभेच्या पावसाळी अधिवेशनाचा एका दिवसाचा खर्च ९ कोटी इतका होता. अधिवेशन पाण्यात वाहून गेले, त्याबरोबर सर्वसामान्य, कष्टकरी माणसाचे तब्बल १७५ कोटी रुपयेही वाहून गेले. अधिवेशनांवर जो करोडो रुपयांचा चुराडा होतो. निर्वाचित लोकप्रतिनिधींनी संसदेतील कामकाजापेक्षा राजकीय संघर्षालाच अधिक प्राधान्य का दिले? संसदेत गोंधळ घालणा-या किंवा कामकाज रोखणा-या लोकप्रतिनिधींवर कारवाई का होत नाही? ही जबाबदारी नेमकी कोणाची आहे? सत्ताधारी आणि विरोधकांना चर्चेतून तोडगा का काढता आला नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय राहत नाही. जनतेच्या पैशांवर अलिशान बंगल्यात राहणा-या, वातानुकूलित आरामदायी गाड्यांमधून फिरत मौजमजा करणा-यांना याचे काहीही सोयरसुतक नसते. दरवेळेस कोट्यवधी रुपये असे 'निरर्थक' वाया जात असेल तर, विनाकारण हुल्लडबाजी करणा-या नतद्रष्ट कारभा-यांकडून सक्तीने हा पैसा वसूल करण्यात यावा. ते जमत नसेल तर, यापुढे ऑनलाईन पध्दतीने अधिवेशने घेण्यात यावीत. तेही शक्य नसेल तर अधिवेशनेच घेण्यात येऊ नयेत. कारण, हा सावळा गोंधळ' बघून प्रत्येक सर्वसामान्य नागरिक 'भीक नको पण, कुत्रा आवर' या भावनेतून, कशाला पाहिजेत अशी 'निरर्थक' अधिवेशने? हाच प्रश्न विचारताना दिसत आहे.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
नाशिक.
भ्रमणध्वनी-
८७६७५९२९८०

## वंदे मातरम गायले जावे !

'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताच्या सन्मानाला आता कायद्याचे संरक्षण मिळाल्याने स्वातंत्र्यलढ्यात क्रांतिकारकांमध्ये वीरश्री निर्माण करणाऱ्या 'वंदे मातरम्' या बीजमंत्राचा उचित सन्मान झाला आहे. देशप्रेमी नागरिकांचा उर भरून आणणारी ही घोषणा त्याकाळी क्रांतीकारकांना मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्राणपणाने लढण्याचे बळ देत होती. त्यांच्यात वीरश्री निर्माण करत होती. त्यांना क्रांतीची प्रेरणा देत होती. शेकडो क्रांतिकारक त्यावेळी 'वंदे मातरम्' चा घोष करत हसत हसत बलीवेदीवर चढले, कितीतरी वीरांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या, कारागृहात मरणप्राय यातना सहन केल्या. या सर्वांना संजीवनी देण्याचे कार्य त्यावेळी 'वंदे मातरम्' या द्वीअक्षरी मंत्राने केले आहे. 'वंदे मातरम्' हे केवळ गीत नसून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणास्रोत आहे त्यामुळे देशाप्रती प्रेम, स्वाभिमान आणि आस्था असणाऱ्या प्रत्येकाने जात-पात, धर्म-पंथ यांची बंधने झुगारून ते अभिमानाने म्हटलेच पाहिजे. 'वंदे मातरम्'च्या सन्मानाला कायद्याचे संरक्षण मिळाल्याने आज अनेकांना पोटशूळ उठले आहे. मात्र 'जेव्हा देशाप्रती स्वाभिमान दाखवण्याची वेळ येते तेव्हा धर्म-पंथ बाजूला ठेवण्याची शिकवण आपले संविधान आणि आपली न्यायव्यवस्था आपल्याला देते. त्यामुळे 'वंदे मातरम्' ला धार्मिक रंग देऊन त्यास विरोध करणे हास्यास्पद आहे. यंदाच्या स्वातंत्र्यदिनाला केवळ शाळा महाविद्यालयांतच नको तर देशाच्या कानाकोपऱ्यात ज्या ज्या ठिकाणी राष्ट्रध्वज फडकावले जातील त्या त्या ठिकाणी संपूर्ण 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय गीत म्हटले जावे. अनेकांनी यापूर्वी 'वंदे मातरम्' हे संपूर्ण गीत कधी गायले नसेल, कित्येकांनी ते ऐकलेही नसेल यासाठी सरकारच्या वतीने संपूर्ण 'वंदे मातरम्' योग्य चालीत आणि स्पष्ट उच्चारांत कसे गावे याची ध्वनीफित प्रसारित करावी, जेणेकरून ज्या ठिकाणी ते प्रत्यक्षात म्हणणे शक्य नसेल त्या ठिकाणी सदर ध्वनिफीत तरी लावली जाईल. आज जसे जण गन मन हे राष्ट्रगीत सर्वांच्या तोंडी रुळले आहे कालांतराने संपूर्ण 'वंदे मातरम्'गीतही सर्वांना पाठ होईल. यासाठी त्याची सुरुवात यंदाच्या स्वातंत्र्य दिनापासून करूया !

**नरेश घरत**

## तिरंग्याचा सन्मान

१५ ऑगस्ट आला की अवघा देश देशभक्तीच्या रंगात न्हाऊन निघतो. घरोघरी, गल्लोगल्ली आणि शाळांमध्ये तिरंगा फडकवला जातो. लहान मुलांच्या हातात लहान-मोठे झेंडे असतात, तर काही जण तिरंग्याचे टी-शर्ट, ब्रेसलेट किंवा तिरंगी प्रिंट असलेल्या वस्तू वापरतात. अगदी आनंदाने केक कापूनही हा दिवस साजरा केला जातो. पण या उत्साहात बऱ्याचदा नकळतपणे आपल्या राष्ट्रध्वजाचा अनादर होतो. १५ ऑगस्ट संपला की तेच कागदी किंवा प्लास्टिकचे झेंडे रस्त्यावर पायदळी तुडवले जातात आणि गल्लीबोळात किंवा कचऱ्याच्या ढिगाऱ्यात उघड्यावर पडलेले दिसतात. स्वातंत्र्यप्रेम हे फक्त एका दिवसापुरते नको, तर कायम आपल्या मनात असायला हवे. आजकाल बाजारात सहज मिळणाऱ्या प्लास्टिकच्या झेंड्यांचा किंवा तिरंगी वस्तूंनी बाजारपेठ भरून जाते. एक दिवसाच्या उत्साहात लोक कागदी व प्लास्टिकचे झेंडे, तिरंगी टोप्या सर्रास खरेदी करतात. पण कार्यक्रम संपल्यानंतर तेच झेंडे पायदळी तुडवले जातात, नाल्यात किंवा कचऱ्यात फेकून दिले जातात. वाहनांवर किंवा वस्तूंवर लावलेले तिरंगे तसेच फेकून देणे योग्य नाही. कचऱ्यात किंवा गटारीत झेंडे पडलेले पाहणे म्हणजेच आपल्या राष्ट्रध्वजाची विटंबना करणे होय. देशभक्ती ही केवळ एका दिवसाची किंवा देखाव्याची असू नये. आपल्या मुलांना सुरुवातीपासूनच शिकवावे की राष्ट्रध्वजाचे मान-महत्त्व राखणे हीच आपली खरी देशभक्ती आहे आणि त्याचा कधीही अवमान करू नये. राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे हीच खऱ्या अर्थाने आपल्या स्वातंत्र्यसैनिकांना खरी श्रद्धांजली ठरेल!

**वर्षा आवदे**

## श्रावणमासी हर्ष मानसी...!

सध्या चातुर्मासातील श्रावण मास सुरू झाला आहे. जरा जिवंतिका पूजन, शुक्रवारी घरातील अपत्यांना ओवाळणे, नागपंचमीचा सण आणि नागदेवतेची पूजा, रक्षाबंधन, श्रीकृष्ण जयंती आणि गोपाळकाला, इतक्या सर्व सणांमध्ये आपण मनापासून देवाची भक्ती करत सहभागी झालो तर मन सततच एका चैतन्यात नाहून निघते! एक एक सण म्हणजे चैतन्याने मन भरून जाते. असे सुंदर चैतन्याचे क्षण शांत मनाने अनुभवताना एक वेगळीच अनुभूती येते. काहीजण या संपूर्ण चातुर्मासात एखादे स्तोत्र जसे की रामरक्षा आणि मारुती स्तोत्र नियमितपणे म्हणण्याचे व्रत अंगीकरतात. एकूणच काय, हा संपूर्ण चातुर्मासच आनंद घेऊन मनास शांततेची अनुभूती देतो! यांद्वारे मनातील नकारात्मकता, हेवे दावे, कटूता, मनुष्य संपूर्णतः विसरून सकारात्मकता अनुभवतो. चला तर मग, आपणही या सकारात्मकतेच्या चैतन्याने ऊर्जा कमवूया आणि देवाचे आशीर्वाद सुद्धा ! देवाचे आशीर्वाद कमवणे, मनाला आनंद मिळणे हे किती आनंददायी आहे ! आपणही आपल्या व्यस्त जीवनात नियमित स्तोत्र पठण, देवाचे स्मरण, याद्वारे आनंद अनुभवूया आणि खऱ्या अर्थाने 'श्रावणमासी हर्ष मानसी' या वाक्याची अनुभूती घेऊया.

**आदिती देखणे**

## राष्ट्रभक्तिचा महापूर

वारं पाहून उफणण्यात
आम्ही आहोत वाकबदार
बघा स्वातंत्र दिनीआमच्या
राष्ट्र भक्तिला कशी येते धार ..

वर्षातून दोन वेळा
येते भौ भरती
बाकी मग वर्षभर
आहोटीच ओहोटी ... !

तिसरी शक्ति बनण्याचे
होण्या स्वप्न साकार
करावे लागेल राष्ट्रनिष्ठाने
भ्रष्टाचार मुक्त व्यवहार .. !

**प्रा अशोक सारडा** मेहकर
( ९४२१३९४३३९ )

शनिवार, दि. १५ ऑगस्ट २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# यवतमाळ नगरपरिषद शाळा क्रमांक -20 ची दयनीय अवस्था

## ३११ विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी शाळेला दोन वेळा भेट देऊन समस्या जाणून घेतल्या. मात्र भेटीनंतर आश्वासने मिळाली असली तरी सफाई कर्मचारी, छत गळती, जीर्ण इमारत आणि इतर मूलभूत सुविधांबाबत अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याची नाराजी पालकांनी व्यक्त केली आहे. इतर शाळांच्या प्रश्नांकडे ज्या तत्परतेने लक्ष दिले जाते, त्याच धर्तीवर या शाळेतील प्रश्नांकडेही नगराध्यक्षांनी गांभीर्याने पाहावे, अशी मागणी होत आहे.**



**यवतमाळ, दि. १४ :** नगरपरिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि मूलभूत सुविधा देण्याचा दावा केला जात असला, तरी प्रत्यक्षात अनेक शाळांची अवस्था चिंताजनक असल्याचे समोर येत आहे. तहसील कार्यालयासमोरील नगरपरिषद शाळा क्रमांक -२० पी एम श्री.माँ. जिजाऊ न.प.मुलामुलींची शाळा येथे पाहणी केली असता पोषण आहाराचा तुटवडा, जीर्ण इमारत, छताची गळती, स्वच्छतेचा अभाव आणि मनुष्यबळाची कमतरता अशा अनेक समस्या आढळून आल्या. त्यामुळे तब्बल ३११ विद्यार्थ्यांच्या सुरक्षितते सह त्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेत काही दिवसांपासून पोषण आहाराचा नियमित पुरवठा होत नसल्याची तक्रार पालकांकडून करण्यात येत आहे. शाळेत उपलब्ध असलेल्या शिल्लक धान्याच्या आधारे शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना पोषण आहार देण्याची वेळ आली आहे. पोषण आहाराच्या पुरवठ्याबाबत वारंवार तक्रारी करूनही शासनस्तरावरून अद्याप ठोस कार्यवाही झालेली नसल्याने शाळा व्यवस्थापनाची मोठी कोंडी झाली आहे. यापूर्वी बचत गटाकडे पोषण आहाराची जबाबदारी होती; मात्र काही शाळांमध्ये बचत गट तर काही ठिकाणी शिक्षकावरच ही जबाबदारी सोपविण्यात आल्याचे सांगण्यात येते.

शाळेची इमारत तब्बल १९०१ या वर्षी स्थापना झाली १०० वर्ष अधिक जुनी असून भिंती आणि छताची अवस्था जीर्ण झाली आहे. पावसाळ्यात छत गळत असल्याने विद्यार्थ्यांना वर्गात बसणे ही धोकादायक ठरत आहे. जीर्ण वास्तू कधीही दुर्घटनेला निमंत्रण देऊ शकते, अशी भीती पालक आणि शिक्षकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे केवळ डागडुजी न करता या ठिकाणी नवीन इमारत उभारण्याची मागणी होत आहे. शिक्षकांनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांची संख्या वाढावी आणि पालकांचा नगरपरिषद शाळांकडे कल वाढावा, या उद्देशाने शिक्षकांनी स्वतःच्या पुढाकारातून नर्सरी, केजी-१ आणि केजी-२ चे वर्ग सुरू केले आहेत. सध्या या वर्गांमध्ये सुमारे ४० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अवघ्या ७०० रुपयांत गणवेश आणि पुस्तकांचा संच उपलब्ध करून देत पालकांना परवडणारे शिक्षण देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र या उपक्रमासाठी शासनाकडून कोणताही विशेष निधी मिळत नसल्याची खंत शिक्षकांनी व्यक्त केली. शाळेत पाच स्मार्ट बोर्ड, सीसीटीव्ही कॅमेरे, सायन्स लॅब यांसारख्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्यांचा पाया असलेली इमारत आणि मूलभूत व्यवस्थाच कमकुवत असल्याने 'स्मार्ट शिक्षण' नेमके कोणत्या आधारावर, असा प्रश्न उपस्थित होत आहे. चपराशी नाही, लिपिकाचे पद २० वर्षांपासून रिक्त ३११ विद्यार्थ्यांची संख्या असलेल्या शाळेत चतुर्थ श्रेणी कर्मचारी अर्थात चपराशी नसल्याने स्वच्छता, देखभाल आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच लिपिकाचे पद जवळपास २० वर्षांपासून रिक्त असल्याची माहिती आहे. त्यामुळे शाळे वरील प्रशासकीय भारही शिक्षकांवरच येत आहे. दोन्ही पदे तातडीने भरण्याची मागणी होत आहे. विद्यार्थी शहरातील विविध भागांतून येत असल्याने त्यांच्यासाठी नगरपरिषदेने शालेय व्हॅनची वाहनाची व्यवस्था करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. शाळेत बांधण्यात आलेल्या स्वच्छतागृहाच्या नियमित स्वच्छतेसाठी सफाई कर्मचारी उपलब्ध करून देण्याची गरज आहे.

**केंद्र प्रमुखाचे दुर्लक्ष..**

केंद्र प्रमुख म्हणून विनोद डवले यांनी सुध्दा या बाबींकडे लक्ष देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना केवळ स्मार्ट बोर्ड नव्हे, तर सुरक्षित इमारत, पुरेसा पोषण आहार, स्वच्छतागृह, कर्मचारी आणि सुरक्षित वातावरण हवे आहे. नगरपरिषद प्रशासनाने व शिक्षण विभागाचे विनोद डवले यांनी आश्वासना पलीकडे जाऊन तातडीने निर्णय घेतला नाही, तर ३११ विद्यार्थ्यांच्या भवितव्याशीच हा अन्याय ठरेल, अशी भावना पालकांमध्ये आहे.

## जनमाध्यमच्या बातमीनंतर खडबडले प्रशासन..! फेट्रीतील नालीचे काम तात्काळ बंद



**दिग्रस, दि. १४ :** दिग्रस तालुक्यातील फेट्री येथील दलित वस्तीतील नालीच्या बांधकामातील कथित अनियमिततेबाबत जनमाध्यमने १३ ऑगस्ट रोजी सविस्तर वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची प्रशासनाने तातडीने दखल घेतली असून, फेट्री येथील नालीचे सुरू असलेले काम तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

त्यामुळे जनमाध्यमच्या वृत्ताचा प्रशासनावर इम्पॅक्ट झाल्याचे स्पष्ट झाले आहे. वृत्ताची दखल घेत प्रभारी गटविकास अधिकारी रणवले यांनी तातडीने बैठक घेऊन संबंधित विस्तार अधिकाऱ्यांना पाचारण केले. बैठकीत कामाच्या सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर नालीचे बांधकाम तात्काळ थांबवून पुढील काम सर्व नियम व अटींचे पालन करूनच करण्याच्या सूचना देण्यात आल्या. माजी उपसरपंच रमेश राठोड यांनी या कामातील अनियमिततेबाबत तक्रार केली होती. मंजूर कामासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया, अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता व मोजमाप याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केले होते. त्यानंतर जनमाध्यमने हा विषय लावून धरला. आता संबंधित कामाची तपासणी करून नियमानुसारच पुढील कार्यवाही केली जाणार आहे. अंदाजपत्रक, तांत्रिक मान्यता, मोजमाप पुस्तिका तसेच प्रत्यक्ष बांधकामाची गुणवत्ता तपासल्यानंतरच काम सुरू करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे तक्रारदारांच्या मागणीला आणि जनमाध्यमच्या वृत्ताला यश आले आहे.

# सेल्फीच्या नादात धरणात दोन तरुणी बुडाल्या..!

## वाधवानी कॉलेजच्या १० ते १५ विद्यार्थ्यांचा सहलीचा दुर्दैवी शेवट..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १४ :** शहरालगतच्या बोरगाव धरण परिसरात सहलीसाठी गेलेल्या वाधवानी कॉलेजच्या विद्यार्थ्यांच्या गटातील दोन तरुणी धरणाच्या पाण्यात बुडाल्याची हृदयद्रावक घटना शुक्रवार, १४ ऑगस्ट रोजी दुपारी घडली. रील्स आणि सेल्फी काढण्याच्या नादात घडलेल्या या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली.

मोनिका गोत्रे आणि अमृता खेडकर अशी बुडालेल्या तरुणींची ओळख पटली असून, दोघीही वाधवानी कॉलेजच्या विद्यार्थिनी होत्या. मिळालेल्या माहितीनुसार, कॉलेजचे अंदाजे १० ते १५ विद्यार्थी सहलीसाठी बोरगाव धरण परिसरात गेले होते. यावेळी मोनिका आणि अमृता धरणाच्या भिंतीवर चढून मोबाईलमध्ये रील्स आणि सेल्फी काढत होत्या. रील्स व फोटो काढताना एका तरुणीचा तोल जाऊन ती धरणाच्या पाण्यात पडली. मैत्रिणीला बुडताना पाहून दुसरी तरुणी तिला वाचविण्यासाठी पाण्यात उतरली. मात्र, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तीही पाण्यात बुडाली. काही क्षणांतच दोघीही पाण्याखाली गेल्याने सहकाऱ्यांमध्ये एकच घबराट पसरली. घटनेची माहिती मिळताच आपत्ती शोध व व्यवस्थापन विभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकाकडून दोन्ही तरुणींचा शोध घेण्यासाठी युद्धपातळीवर बचावमोहीम सुरू करण्यात आली. शोधमोहीम सुरू असताना घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. दरम्यान, तरुणींचे आई-वडील व नातेवाईक घटनास्थळी दाखल झाल्याने वातावरण अधिकच भावुक आणि तणावपूर्ण झाले.

# पुसद शहर बनले खड्ड्याचे शहर;रस्ते देत आहेत अपघातास आमंत्रण.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १४ :** शहरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहनचालकांना कसरत करत वाहन चालवावे लागत आहे. खड्डेमय रस्त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या प्रकाराला वाहनधारक वैतागले असून, पुसद शहर खड्डेमुक्त कधी होणार, असा प्रश्न सुज्ञ नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. शहरातील प्रमुख रस्ते व अंतर्गत निवासी भागांमधील मुख्य रस्त्यांवर लहान-मोठे खड्डे पडले आहेत.

पावसाळ्याच्या दिवसांत या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने विद्यार्थ्यांच्या वाहतूक करत असतांना वाहनधारकांना खड्यांचा अंदाज येत नाही. या खड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावतो. परिणामी अपघात होण्याचे सत्र सुरूच आहे प्रमुख चौकांमध्ये रोजच मोठी वाहतूक कोंडी पाहायला मिळते. दुचाकीस्वारांचे नियंत्रण सुटून घसरून पडण्याचे प्रकार सतत घडत आहेत. खड्यांमधून वाहने चालविल्याने शॉकअप, टायर आणि सस्पेंशन खराब होऊन वाहनधारकांना आर्थिक फटका बसत आहे या जबाबदार कोण असा प्रश्न वाहनधारक करत आहेत. रस्त्यांवर साचणारे पाणी व वाहनांमुळे उडणाऱ्या चिखलामुळे रस्त्याशेजारील व्यावसायिक वैतागले असून संताप व्यक्त करत आहेत. पुसद शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी सामाजिक संघटना, वृत्तपत्रातून तसेच नागरिकांकडून होत आहे स्टेट बँक चौक ते बोरगडी रोड या रस्त्याची गेल्या कित्येक महिन्यांपासून या रस्त्यांचे नवीन बांधकाम तर झालेच नाही परंतु डागडुजी सुद्धा झालेली नाही. अधूनमधून पडलेल्या खड्ड्यांमध्ये केवळ माती किंवा मुरुम टाकून तात्पुरती मलमपट्टी केली जाते. मात्र, पावसात ही माती वाहून जाऊन रस्ते पुन्हा जैसे थे होतात. खड्ड्यांमुळे पुसद शहराचे वैभव व सौंदर्यही धोक्यात आले आहे. एकूणच विद्यार्थ्यांची पालक, सुज्ञ नागरिक व वाहनधारक हे अत्यंत त्रस्त झाले असून रस्त्यांचा गंभीर प्रश्न मार्गी कधी लागणार अशी मागणी जोर धरत आहे.

**शहरातील नागरिकांना सुखमय प्रवास कधी मिळणार?**

स्टेट बँक चौक ते बोरगडी रोड हा पुसद-नांदेडकडे जाणारा प्रमुख मार्ग असून,रोज शेकडो नागरिक, रुग्णवाहिका व जड वाहने या रस्त्यावरून ये-जा करतात. खड्डे चुकवण्याच्या नादात प्रत्येक वाहनचालक आपली गाडी रस्त्याच्या मधोमध आणतो. त्यामुळे वाहतूक कोंडी नित्याचीच आहे. रस्त्यावरील छोट्या मोठ्या खड्ड्यांमुळे प्रवाशांना मणक्याचे आजार जडत आहेत.

## थोडक्यात

### वृक्षारोपणच्या नावाखाली शासनाच्या लाखो रुपये निधीचा अपव्यय गोविंदराव देशमुख




**महागाव :** सार्वजनिक बांधकाम विभाग महागाव यांचे कार्यालय मार्फत मागील चार ते पाच वर्षांपासून महागाव ते गुंज रोडच्या दुतर्फा दरवर्षी जुलै ते ऑगस्ट महीन्यात कंत्राटदारांच्या मार्फत वृक्ष लागवड करण्यात येतांना दिसत आहे. परंतु योग्य देखभालीसाठी कोणी वाली नसल्याने दरवर्षी त्याच त्या जागेवर वृक्षारोपण करुण लाखो रुपयांचे बिले काढण्यात येत आहेत. हा शासनाच्या पैशाचा अपव्यय असुन याची चौकशी होणे गरजेचे आहे. असे मत सवना येथील शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते गोविंदराव देशमुख यांनी व्यक्त केले आहे. यावर्षी सुध्दा मागील पंधरवड्यात रोडच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली त्याला संरक्षणासाठी पिव्हीसी पाईप प्रतीवृक्ष सहा ते सात फूट वापरण्यात आला त्यावर पेन्टने PWD Mahagaon असे लीहीलेले असुनसुद्धा लावण्यात आलेल्या एकुन पाईपच्या १०% टक्के सुध्दा पाईप जागेवर ऊभे नाहीत त्यामुळे या पाईप मध्ये लावण्यात आलेले झाडे खाली वाकुन मोडत आहेत. तर काही जनावरे खात आहेत थोड्या दिवसांनी या ठिकाणी काहीही दिसणार नाही अशी परिस्थिती आहे. परत पुढच्या वर्षी याच जागेवर परत परत वृक्षारोपण असा शासकिय पैसा उकळण्याचा वार्षिक कार्यक्रम मागील पाच वर्षांपासून नियोजनबद्ध पद्धतीने सुरु आहे. या प्रकरणी चौकशी झाल्यास खुप मोठे गौडबंगाल ऊघडकीस येण्याची शक्यता आहे. तरी या कामात वरीष्ट आधीकार्यांनी तातडीने लक्ष घालून योग्य ती कारवाई करावी अशी मागणी स्थानिक जनतेतुन होत आहे.



### बाल विज्ञान मेळाव्यात हर्षदीप, श्रुती प्रथम तर रितिका द्वितीय..

**बाभूळगाव :** बाल विज्ञान परिषद, राणी अमरावती येथे आयोजित बाल विज्ञान मेळाव्यात मातोश्री नानीबाई घारफळकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बाभूळगाव या शाळेतील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. वर्ग ८ ते १० गटातून हर्षदीप पाटील याने प्रथम क्रमांक पटकावून शाळेचे नाव उज्वल केले. वर्ग ५ ते १२ गटातून श्रुती इंगळे हिने प्रथम क्रमांक तर रितिका परचाके हिने द्वितीय क्रमांक मिळवला.
या यशस्वी विद्यार्थ्यांना किशोर भिसे सर व सारिका भगत मॅडम यांनी मार्गदर्शन केले. सहभागी विद्यार्थी अथर्व खडसे व संचिता सावसाकडे यांनी देखील चांगली कामगिरी केली. या यशाबद्दल संस्थेचे सचिव कृष्णा कडू, संचालिका माधवी कडू, निरीक्षक सुरेंद्र कडू, मुख्याध्यापक दिनेश रामटेके तसेच शिक्षक . प्रगती गजबे,रविकांत धुर्वे, शीतल भेंडे, प्रियंका नीघोट , मानेकर , ऋषिकेश कडू , शुभम कडू , अल्केश गारगाटे , प्रवीण गाडेकर , उज्वला स्थुल , खुशी बावणे , सेजल आखरे , प्रियंका जांभुरे , समीर गायकवाड, सुरज कांबळे, कुणाल महाजन, प्रफुल गोंडाने, रोशन तुरकाने, अभय पाटील.तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.



### वनविभागाच्या प्रश्नांवर वनमंत्र्यांकडे ठोस मागण्या

**४.५९ कोटींच्या प्रस्तावाला गती देण्याची मागणी**

**महागाव :** उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातील वनविभागाच्या प्रलंबित प्रश्नांना आता गती देण्याची मागणी करण्यात आली आहे. मुंबई येथे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत आमदार किसनराव वानखेडे यांनी मतदारसंघातील वनविभागाच्या कार्यालये, अधिकारी-कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, कॅम्पा आराखडा तसेच मानव–वन्यजीव संघर्षाच्या प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली. उमरखेड येथील वनविभागाच्या कार्यालयीन इमारती व निवासस्थानांसाठी सुमारे ४ कोटी ५९ लाख रुपयांचा प्रस्ताव प्रलंबित असून, त्याला तातडीने प्रशासकीय मंजुरी देऊन बांधकामाला गती द्यावी, अशी मागणी करण्यात आली.
दरम्यान, मतदारसंघातील १२ गावांमध्ये मानव–वन्यजीव संघर्ष गंभीर होत असल्याने गावनिहाय माहिती संकलित करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली. कॅम्पा २०२६-२७ मधील प्रस्तावित कामांना मंजुरी देऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी जलद करण्यावरही भर देण्यात आला. बैठकीस भाजपा जिल्हा समन्वयक नितीन भुतडा उपस्थित होते.

# आश्रमशाळांची सुरक्षा वाऱ्यावर? सर्पदंशाच्या घटनेनंतर तातडीच्या सुरक्षा ऑडिटची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**झरी-जामणी, दि. १४ :** गडचिरोलीतील आश्रमशाळेत सर्पदंशामुळे विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेची गंभीर दखल घेत पाटण, मार्की तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा अंतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची तातडीने सुरक्षा तपासणी करून प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी आदिवासी संघटना व सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

पावसाळ्यात आश्रमशाळांच्या परिसरात साप, विंचू व इतर विषारी प्राण्यांचा धोका वाढतो. त्यामुळे परिसरातील झाडेझुडपे व गवत साफ करणे, निवासगृह, स्वयंपाकगृह व शौचालयांची नियमित स्वच्छता, पुरेशी प्रकाश व्यवस्था तसेच दरवाजे-खिडक्यांची सुरक्षितता तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. सर्पदंशाच्या प्रसंगी तातडीचे उपचार मिळावेत यासाठी जवळच्या शासकीय रुग्णालयाशी आपत्कालीन समन्वय व्यवस्था निश्चित करण्याची मागणीही करण्यात आली. रात्रीच्या सुरक्षेसाठी आवश्यक कर्मचारी व सुरक्षा व्यवस्था, आपत्कालीन संपर्क क्रमांक आणि विद्यार्थ्यांना सर्पदंश प्रतिबंधाबाबत प्रशिक्षण याचीही खातरजमा करावी, अशी मागणी आहे. असुरक्षित आश्रमशाळांचे स्वतंत्र सुरक्षा व सुविधा ऑडिट करून त्रुटी आढळल्यास विद्यार्थ्यांना सुरक्षित पर्यायी ठिकाणी हलवावे, अशी ठाम भूमिका निवेदनकर्त्यांनी घेतली आहे. निवेदनाच्या प्रती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना पाठविण्यात आल्या. पांडूरंग पोयाम, दयाकर गेडाम, महेश गेडाम, योगेश मडावी यांच्यासह विविध आदिवासी संघटनांचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# कवठा नदीपात्रात अवैध रेतीचा धंदा..!

## वारा गावातील कथित दारूविक्रीमुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १४ :** यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर तालुक्यातील वारा–कवठा परिसरात कथित अवैध रेती उत्खनन आणि वारा गावात सुरू असलेल्या कथित अवैध देशी दारू विक्रीमुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, कवठा नदीपात्रातून भरदिवसा तसेच रात्री ट्रॅक्टरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रेतीची वाहतूक केली जात आहे. मात्र, संबंधित प्रशासनाकडून अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, नदीपात्रातून काढलेली रेती कवठा स्मशानभूमी परिसर तसेच अंदरवाडी रोडलगत मोठ्या प्रमाणात साठवून ठेवण्यात आली आहे. हा प्रकार उघडपणे सुरू असल्याचा दावा होत असतानाही संबंधित विभागाकडून कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, वारा गावात कथितपणे खुलेआम देशी दारू विक्री सुरू असल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. या प्रकारामुळे गावातील सामाजिक वातावरणावर परिणाम होत असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली असून, पोलिस प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन चौकशी करावी, अशी मागणी होत आहे. अवैध रेती उत्खननामुळे नदीपात्राच्या पर्यावरणीय स्थितीवर परिणाम होण्याची शक्यता असून शासनाच्या महसुलाचेही नुकसान होऊ शकते. त्यामुळे रेती उत्खनन व वाहतुकीची अधिकृत परवानगी आहे किंवा नाही, याची तपासणी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. स्थानिक नागरिकांनी कवठा स्मशानभूमी परिसर व अंदरवाडी रोडवरील कथित रेतीसाठ्यांची तपासणी करून ते जप्त करावेत, अवैध उत्खनन व वाहतूक आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करावी. तसेच वारा गावातील कथित अवैध देशी दारू विक्रीची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी केली आहे. आता महसूल व पोलिस प्रशासन या दोन्ही प्रकरणांची दखल घेऊन प्रत्यक्ष तपासणी आणि कारवाई करणार का, याकडे केळापूर तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# उपोषणाला काँग्रेसच्या मध्यस्थीने तूर्तास ब्रेक..! मागण्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १४ :** विविध मागण्यांसाठी राळेगाव तालुक्यातील वालधूर येथील ग्रामस्थांनी यवतमाळच्या आझाद मैदानावर सुरू केलेले उपोषण जिल्हा काँग्रेस कमिटीच्या मध्यस्थीनंतर स्थगित करण्यात आले. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली.

जिल्हाधिकारी दौऱ्यावर असल्याने अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात मागण्यांबाबत चर्चा करण्यात आली. प्रशासनाशी समन्वय साधून ग्रामस्थांच्या मागण्या मार्गी लावण्यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन ॲड. नाईक यांनी दिले. तसेच भविष्यात गरज भासल्यास काँग्रेस पक्ष आंदोलकांच्या भूमिकेत सहभागी होऊन पाठिंबा देईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या आश्वासनानंतर आंदोलकांनी आपापसांत चर्चा करून उपोषण स्थगित करण्याचा निर्णय घेतला. मात्र, मागण्या मार्गी न लागल्यास आंदोलन पुन्हा तीव्र करण्याचा इशारा आंदोलकाकडून देण्यात आला. यावेळी राजीव गांधी पंचायतराज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष संजय ठाकरे, सुनील भेले, जिल्हा सचिव शशांक केंढे, कुणाल जानकर, शीतल कुळसंगे, रंजना सवाई व सुरेखा येरखडे उपस्थित होते.

# उकणीच्या पूनर्वसनाला आता मिळणार वेग !

## वेकोली सीएमडी यांची प्रत्यक्ष पाहणी, पूनर्वसन,मोबदला व जमीन संपादनाच्या प्रश्नांवर कार्यवाहीचे निर्देश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. १४ :** गेल्या काही वर्षापासून उकणी गावचे पूनर्वसन,प्रदूषण,उकणी कोळसा खाण प्रकल्यातील सूरूंग स्पोटामूळे होणारे घराचे नूकसान तसेच उर्वरीत जमीन संपादनाचा प्रश्न,गावाचे सूरक्षित स्थळी पूनर्वसन,घरासाठी मिळणारा मोबदला अत्यल्य असल्याने त्याचे फेरमूल्यांकन करून बाजार भावाप्रमाणे भरपाई देण्यात यावी,तसेच उकणी खंड १ परिसरातील १७० शेतकऱ्याची जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी,स्थानिकांना रोजगारात प्राधान्य इत्यादी प्रश्न प्रलंबित असल्यामूळे कामगार नेते संजय खाडे यांच्या नेतृत्वात संघर्ष समिती व उकणीवासीयांनी वेळोवेळी आंदोलन केले होते,त्या अणूषंगाने वेकोलीचे अध्यक्ष-सह-व्यवस्थापकीय संचालक(सीएमडी)डॉं,हेमंत शरद पांडे यांनी उकणी गावाला भेट देत गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या,तसेच प्रलंबित जमीन संपादनाची पाहणी करून संबंधित वेकोली अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले, गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या उकणी गावाच्या पूनर्वसनाचा प्रश्न आता मार्गी लागण्याच्या दिशेने हालचालीला वेग आला आहे,यावेळी संजय खाडे,अर्जून खापणे,विवेक धांडे. कूणाल बोंजे,सागर डांगे,कवळू पचारे,सूहास डाहूले,त्रिकाल ढापकस,अशोक गोवारदिपे,अक्षय ढापकर यांच्यासह संघर्ष समितीचे पदाधिकारी,सदस्य तसेच उकणीवासी आणी वेकोलीचे अधिकारी उपस्थित होते,

# बँकांच्या किचकट धोरणामुळे मेळघाटातील आदिवासी सावकाराच्या पाशात

## सोन्या-चांदीच्या दागिन्यांवर मनमानी व्याज वसुली

**मेळघाट/वार्ताहर**

पावसाळ्याच्या सुरुवातीला शेतीची कामे सुरळीत सुरू करण्यासाठी मेळघाटातील आदिवासी व गरीब शेतकऱ्यांना पैशांची मोठी गरज भासते. यासाठी अनेक गावकरी दागिने बँकेत गहाण ठेवून कर्ज घेण्यासाठी बँकांकडे धाव घेतात. मात्र, बँकांच्या किचकट प्रक्रियेमुळे त्यांना वेळेवर पैसे मिळत नसल्याने नाईलाजाने सावकारांकडे जाण्याची वेळ येत आहे.

बँकेत दागिने गहाण ठेवण्यासाठी प्रथम त्यांची तपासणी, मूल्यांकन आणि इतर प्रक्रिया पूर्ण करावी लागते. या प्रक्रियेला वेळ लागत असल्याने तातडीच्या पैशांची गरज असलेला गरीब शेतकरी सावकाराच्या दारात पोहोचतो. स्थानिक पातळीवर काही सावकारांकडून सोन्याच्या दागिन्यांवर ३ टक्के, तर चांदीच्या दागिन्यांवर ४ ते ५ टक्के व्याज किंवा कमिशन आकारले जात असल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे, व्यवहाराच्या वेळी देण्यात येणाऱ्या पावतीवर मात्र कमी व्याजदर दाखवला जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे. काही महिन्यांनंतर किंवा वर्षभरानंतर दागिने सोडवण्यासाठी गेल्यावर प्रत्यक्षात अधिक रक्कम वसूल केली जात असल्याचे गरीब नागरिकांचे म्हणणे आहे.

अनेक आदिवासी नागरिक निरक्षर असल्याने पावतीवरील मजकूर आणि व्याजदर त्यांना समजत नाही. त्यामुळे नाईलाजाने मागितलेली रक्कम भरून दागिने परत घ्यावे लागतात. हा प्रकार केवळ गरीब नागरिकांची आर्थिक पिळवणूक नसून, व्यवहारात योग्य पावती न दिल्यास शासनाच्या महसुलाचेही नुकसान होण्याची शक्यता आहे.त्यामुळे संबंधित प्रशासनाने मेळघाटातील सावकारांच्या व्यवहारांची सखोल तपासणी करून प्रत्यक्ष आकारले जाणारे व्याज, पावतीवरील नोंद आणि प्रत्यक्ष वसुली याची पडताळणी करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान,बँक प्रशासनानेही कर्ज प्रक्रियेतील अनावश्यक किचकटपणा कमी करून दागिने गहाण ठेवून कर्ज मागणाऱ्या गरजू नागरिकांना ङत्याच दिवशी किंवा कमीतकमी वेळेत कर्ज उपलब्ध होईल, अशी व्यवस्था करावी. त्यामुळे गरीब आणि आदिवासी नागरिकांना सावकारांच्या पाशात अडकण्यापासून मोठ्या प्रमाणात दिलासा मिळू शकतो.

सावकारांच्या व्यवहारांवर प्रशासन कारवाई करणार का? तसेच बँक अधिकारी कर्जप्रक्रिया सुलभ करण्यासाठी पुढाकार घेणार का? याकडे मेळघाटातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# ८० व्या स्वातंत्र्यदिनी घुमणार 'वंदे मातरम'चा गजर!

## ध्वजारोहणासाठी शासनाचे कडक नियम लागू

**अमरावती/सुधीर केने**

यावर्षीच्या ८० व्या स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक सुधारित परिपत्रक जारी केले आहे. या नव्या आदेशानुसार, राज्यातील सर्व शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था,शाळा आणि महाविद्यालयांमध्ये ध्वजारोहण सोहळ्यादरम्यान राष्ट्रगीताच्या आधी 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय गीत म्हणणे अधिकृतपणे अनिवार्य करण्यात आले आहे.

राज्य सरकारने जारी केलेल्या राजशिष्टाचार मार्गदर्शक सूचनांनुसार, कार्यक्रमाचा नवा क्रम निश्चित करण्यात आला आहे.सर्वात आधी उपस्थित सर्वांनी सावधान स्थितीत येऊन 'वंदे मातरम्' हे राष्ट्रीय गीत म्हणावे किंवा त्याचे वादन करावे. त्यानंतर राष्ट्रध्वज फडकवून त्याला वंदन करताना 'जन गण मन' हे राष्ट्रगीत म्हटले जाईल. राष्ट्रगीतानंतर 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताचे गायन करून सोहळ्याची सांगता होईल.

नुकतेच केंद्र सरकारने राष्ट्रीय सन्मान अवमान प्रतिबंधक (सुधारणा) कायदा, २०२६ अंतर्गत 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला राष्ट्रगीताप्रमाणेच वैधानिक आणि कायदेशीर संरक्षण दिले आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांना अनुसरून, गीत वाजताना सर्वांनी सावधान मुद्रेत उभे राहणे बंधनकारक आहे. तसेच,'वंदे मातरम्' च्या गायनात जाणीवपूर्वक अडथळा आणल्यास किंवा त्याचा अवमान केल्यास ३ वर्षांपर्यंतच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.वेळेचे कडक नियोजनराज्य शासनाच्या आदेशानुसार, मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ सकाळी ९.०५ वाजता आयोजित केला जाईल. या दिवशी सकाळी ८.३५ ते ९.३५ या वेळेत इतर कोणताही समांतर शासकीय किंवा निमशासकीय कार्यक्रम आयोजित करता येणार नाही. जर एखाद्या स्थानिक संस्थेला किंवा शाळेला स्वतंत्र ध्वजारोहण करायचे असल्यास, त्यांनी ते सकाळी ८.३५ च्या पूर्वी किंवा ९.३५ च्या नंतर करावे, असेही या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

**दीडशे वर्षे पूर्ण**

यावर्षी 'वंदे मातरम्' गीताला १५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय प्रतीकांचा आदर राखण्यासाठी आणि देशभरात एकसमान पद्धत लागू करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# धानोरा गुरव येथील ग्रामपंचायत भवन बांधकामात खोडा

## अतिक्रमण काढून बांधकाम सुरू करण्याचे मागणी

## शिवसेना उबाठा तालुका प्रमुखाचे अन्नत्याग आंदोलन प्रारंभ

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

तालुक्यातील धानोरा गुरव येथील हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे ग्रामपंचायत भवन बांधकामात अडथळा निर्माण केला जात असल्याचा आरोप शिवसेना तालुकाप्रमुख प्रमोद कोहळे यांनी केला.या प्रकरणात चौकशी करून बांधकाम त्वरित सुरू करा व ग्रामपंचायतीच्या जागेवरील अतिक्रमण हटविण्यात यावे या मागणीसाठी शिवसेना तालुकाप्रमुख प्रमोद कोहळे यांनी पंचायत समिती कार्यालयाच्या बाजूला १३ ऑगस्ट पासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे.



धानोरा गुरव येथे बाळासाहेब ठाकरे ग्रामपंचायत भावना करता सन २०२४-२५ ला शासकीय मंजुरात मिळाली त्यानुसार ग्रामपंचायतची मासिक सभा व ग्रामसभेच्या ठरावानुसार ग्रामपंचायतीच्या जागेवर बांधकाम सुरू करण्यात आले.पी. आर. कार्ड नुसार ६२५१ चौरस मीटर जागेपैकी एक हजार चौरस फूट जागेवर भवनाचे काम सुरू असताना काही राजकीय लोकांनी या बाबत तक्रार करून बांधकाम बंद पाडण्याचा प्रयत्न केला. ग्रामपंचायत सचिव हे सुद्धा या कामात हेतू परस्पर हयगय करीत असल्याचा आरोप प्रमोद कोहळे यांनी केला. बांधकामाचे अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता असून भावनाला सहा दरवाजेची तरतूद आहे तरी ठेकेदारावर दबाव टाकून एक दरवाजा बंद करण्याचे सांगण्यात आले. याबाबत गटविकास अधिकारी यांचे लेखी आदेश सुद्धा नाही. सदर दाराचा अंदाजपत्रकामध्ये तरतूद असताना दरवाजा बंद करण्याचा अट्टहास ग्रामपंचायत सचिवांनी का केला? त्यामुळे ग्रामपंचायत सचिवावर कारवाई करण्यात यावी या प्रकरणाची अधिकृत चौकशी करून सध्याच्या स्थितीतील अतिक्रमण हटवून उर्वरित बांधकाम सुरू करण्यात यावे, या मागणीसाठी शिवसेना तालुकाप्रमुख प्रमोद कोहळे यांनी १३ ऑगस्टपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केले असून शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपोषण मंडपाला भेटी दिल्या. यामध्ये शिवसेनेचे पदाधिकारी ओंकार ठाकरे, प्रमोद ठाकरे,डॉ प्रमोद कठाळे, वासुदेव लोखंडे यांचे सह धानोरा गुरव येथील नागरिक उपस्थित होते.

## जलसंधारण सप्ताहात विविध उपक्रमांचे आयोजन

# २१ ऑगस्टला 'वॉक फॉर वॉटर' वॉकेथॉनचे आयोजन

### जलसंधारणावर आधारित सर्वोत्कृष्ट 'रील्स' बनवणाऱ्यांना २५ हजार रुपयांपर्यंतची पारितोषिके

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात १५ ते २१ ऑगस्ट दरम्यान जलसंधारण सप्ताह राबविण्यात येणार आहे. या निमित्ताने आठवडाभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. २१ ऑगस्ट रोजी 'वॉक फॉर वॉटर -वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले असून नागरीकांनी मोठया संख्येत सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे. युवा पिढीच्या कल्पकतेला मंच उपलब्ध करून देत जलसंधारणावर आधारीत रील्ससाठी आकर्षक पारितोषिकही प्रदान करण्यात येणार आहेत.

मृद व जलसंधारण विभागामार्फत संपूर्ण राज्यात १५ ते २१ ऑगस्ट या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह' राबविण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातील आयोजनाच्या पूर्व तयारीसाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी आढावा घेतला. जिल्ह्यात जलसंधारण सप्ताह अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे राबविण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी विविध उपक्रमांची घोषणाही केली. या अंतर्गत 'पाणी बचत' आणि 'जलसंधारणाचा व्यापक संदेश देण्या'साठी २१ ऑगस्ट रोजी 'वॉक फॉर वॉटर' ही विशेष वॉकेथॉन आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील सर्व नागरिक, तरुण, विद्यार्थी आणि शासकीय कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

युवा पिढीला या अभियानात जोडण्यासाठी आणि जलसंधारणाचा संदेश घरोघरी पोहोचवण्यासाठी सोशल मीडिया 'रील्स स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. जलसंधारणावर आधारित सर्वोत्कृष्ट रील्स तयार करणाऱ्यांना जिल्हा प्रशासनातर्फे २५ हजारांचे प्रथम पारितोषिक, १५ हजारांचे द्वितीय तर १० हजारांचे तृतिय पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार असल्याचे श्री. येरेकर यांनी सांगितले.जलसंधारण सप्ताहाच्या निमित्ताने संपूर्ण जिल्ह्यात वृक्षलागवड, श्रमदान, जनजागृती कार्यक्रम, व्याख्याने तसेच शाळा-महाविद्यालयांमध्ये चित्रकला आणि रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी, सामाजिक संस्थांनी आणि विद्यार्थ्यांनी या सर्व उपक्रमांमध्ये व वॉकेथॉनमध्ये हिरिरीने सहभागी होऊन जलसंधारण सप्ताह यशस्वी करण्याचे आवाहन येरेकर यांनी केले आहे.

# ३ लाख ३० हजार वगळलेल्या मतदारांची यादी प्रसिद्ध

## यादीतील सुधारणेसाठी बीएलओशी संपर्क साधावा-जिल्हाधिकारी

**अमरावती/का.प्र.**

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमात जिल्ह्यातील ३ लाख ३० हजार ४०१ मतदार वगळण्यात आले आहेत. वगळण्यात आलेल्या मतदारांच्या नावाची यादी amravati.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. वगळलेल्या मतदारांच्या यादीत नाव असल्यास तातडीने बीएलओंशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

जिल्ह्यात १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदारयाद्यांचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अंतर्गत गणना अर्जांचे वितरण व डिजिटायझेशनचे काम सुरु आहे. भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत प्रणालीवर ११ ऑगस्ट २०२६ रोजी ही माहिती प्रसिद्ध झाली आहे. एसआयआर अंतर्गत जिल्ह्यातील २५ लाख ४५ हजार ६७७ मतदारांना गणनापत्रक वाटप करण्यात आले. त्यानुसार १ लाख ८ हजार १०९ मयत मतदार, १५ हजार ३०७ गैरहजर मतदार, १ लाख ५३ हजार ८३३ कायमस्वरूपी स्थलांतरित मतदार, १ हजार २ इतर मतदार आणि ५२ हजार १५० यापूर्वीच नोंदणी झालेले मतदार मतदारयादीतून वगळण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील एकही पात्र मतदार मतदानाच्या हक्कापासून वंचित राहणार नाही. यासाठी सर्व नागरिक, राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांनी यादीचे अवलोकन करावे. पात्र मतदाराचे नाव पत्ता सापडला नसल्यास किंवा 'अनकलेक्टेड' वर्गवारीमध्ये समाविष्ट झाले असल्यास अथवा त्यांनी गणनापत्रक जमा केले नसल्यास, त्यांनी त्वरित संबंधित बीएलओशी संपर्क साधून गणनापत्रकात अचूक माहितीसह भरावी, तसेच गणना पत्रक जमा करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

# महाराष्ट्र देवस्थान समिती आर्वी तालुक्यातील मंदिरांच्या समस्यांवर आक्रमक

## तहसीलदार आणि उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

## मंदिरांच्या हक्क आणि हितासाठी पाच प्रमुख मागण्या

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र देवस्थान समितीने आर्वी तालुक्यात मंदिरांना भेडसावणाऱ्या विविध समस्या सरकारसमोर मांडण्यासाठी २७ हून अधिक मंदिरांच्या वतीने आर्वीचे तहसीलदार आणि उपविभागीय अधिकारी यांना एक निवेदन सादर केले. आर्वीतील शालिक धर्मशाळेजवळील श्री श्यामबाबा मंदिरात झालेल्या मंदिर विश्वस्तांच्या बैठकीच्या संदर्भात हे निवेदन सादर करण्यात आले.



बैठकीला तालुक्यातल्या बहुतांश मंदिरांचे विश्वस्त, अधिकारी आणि संबंधित प्रतिनिधी उपस्थित होते. मंदिर संरक्षण, मंदिराची जमीन, मंदिर विकास आणि विविध सरकारी योजनांमध्ये मंदिर संस्थांचा सहभाग यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.मंदिरांच्या समस्या सरकारपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी निवेदनात मंदिराच्या व्यवहारांना मुद्रांक शुल्कातून सूट देण्यात यावी,मंदिरांना मिळणाऱ्या देणग्या, जमीन किंवा मालमत्तेची खरेदी-विक्री आणि देवस्थानाच्या हितासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांवरील मुद्रांक शुल्क आणि संबंधित शुल्क माफ करण्यात यावे, अतिवृष्टीमुळे मंदिराच्या जमिनीचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई देण्यात यावी,शेतकऱ्यांप्रमाणेच, सरकारने मंदिरांच्या मालकीच्या शेतजमिनीला अतिवृष्टी, पूर आणि नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई द्यावी, मंदिर विकास प्रकल्पांमध्ये मंदिर संस्थांना विश्वासात घेण्यात यावे,मंदिरे आणि तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी सरकारने दिलेल्या निधीचा वापर करताना, संबंधित मंदिर संस्था, विश्वस्त मंडळ आणि स्थानिक व्यवस्थापन यांना विश्वासात घेऊन विकास योजना तयार केल्या पाहिजेत.मंदिराच्या जमिनीसाठी 'सवलत प्रमाणपत्रा'ची अट शिथिल करण्यात यावी.संबंधित कायद्यांनुसार मंदिराच्या जमिनीला दिलेले संरक्षण आणि कुल व कमाल जमीन धारणा कायद्यांमधून मंदिराच्या जमिनीला दिलेली सूट लक्षात घेता, 'सूट प्रमाणपत्र' सादर करण्याची अट शिथिल करावी, मंदिराची जमीन आणि परिसर विकासाच्या उद्देशाने हस्तांतरित करू नये.अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. बैठकीत दिलीप अग्रवाल, सतीश ठाकरे, मोरेश्वर खेडकर, आशिष लोखंडे, कैलाश झाडे, मनोज काळे, सुनील राऊत, दर्शन पुरोहित, विनोद काहरे, नितीन बोडके आणि सुरेश पावडे यांची आरवी तालुका समन्वयक म्हणून निवड करण्यात आली.

## संक्षिप्त

### आज महारक्तदान शिबीर

**अमरावती-**महा रक्तदान शिबिराचे आयोजन शनिवार १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता हॉटेल ग्रँड महफिल येथील रुबी हॉल येथे करण्यात आले आहे. राज्य उत्पादन शुल्क आणि अमरावती जिल्हा मद्य विक्रेता संघटना यांच्या वतीने हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे.'रक्तदान - शहिदों के नाम' अशी संकल्पना या शिबिराची ठेवण्यात आली आहे. या शिबिराचे आयोजन राज्य उत्पादन शुल्कचे विभागीय उपायुक्त डॉ. पराग नवलकर, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक शशिकांत गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे. तसेच, महा रक्तदान शिबीर आयोजन समितीचे अध्यक्ष नितीन देशमुख,उपाध्यक्ष अनिल भामोरे, दीपक गुडधे, विजय जयस्वाल, सुरेश चांदवानी, बाबूसेठ मतानी आणि इतर सर्व पदाधिकारी व सदस्यांच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.स्वातंत्र्य दिनी रक्तदान करून आरोग्य यज्ञात सहभागी व्हावे,तसेच राष्ट्रसेवा आणि मानवसेवेचे कार्य करावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### कृषी कर्ज वितरण शिबीर १७ ला

**अमरावती-**शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी बँकिंग सुविधा त्यांच्या दारी पोहचविण्याच्या उद्देशाने सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्यावतीने १७ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता अचलपूर तालुक्यातील पथ्रोट येथील प्रसन्न लॉन येथे आयोजित करण्यात आला आहे.शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांना विविध कृषी कर्ज योजना, बँकिंग सुविधा तसेच केंद्र व राज्य शासनाच्या कृषीविषयक योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने बँकच्या राष्ट्रव्यापी मेगा कृषी आउटरीच कॅम्पचा हा भाग आहे. या एकदिवशीय शिबिरामध्ये शेतकऱ्यांना पीक कर्ज, कृषी मुदत कर्ज, कृषी यांत्रिकीकरण, सिंचन, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, कृषीपूरक व्यवसाय तसेच इतर कृषी व ग्रामीण कर्ज योजनांबाबत बँकेच्या मुंबई येथील केंद्रीय कार्यालय मुंबई उप महाप्रबंधक पुरुषोत्तम मीणा अमरावतीचे क्षेत्रीय प्रबंधक सुनील पाण्डेय मार्गदर्शन करणार आहेत.शिबिरात पात्र शेतकऱ्यांकडून कर्ज प्रस्ताव स्वीकारले जातील आणि प्रलंबित कर्ज प्रकरणांचा आढावा घेण्यात येईल तसेच विविध बँकिंग व डिजिटल बँकिंग सुविधांची माहिती देण्यात येणार आहे.याशिवाय शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देऊन त्यांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शेतकरी, कृषी उद्योजक, महिला बचत गट, एफपीओ तसेच ग्रामीण भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी होऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेंट्रल बँक ऑफ इंडिया चे अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी आले आहे.

### नगरसेविका इमले यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**चांदूर रेल्वे-**वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छांचा वर्षाव नव्हे,



तर समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची संधी असल्याचे दाखवून देत प्रभाग क्रमांक ३ च्या नगरसेविका ॲड. कीर्ती राहुल इमले यांच्या वाढदिवसानिमित्त शिक्षक कॉलनीत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश अधिक बळकट केला.कार्यक्रमाला नगरसेविका ॲड. कीर्ती राहुल इमले, प्रियंका सतपाल वरठे, निलोफर शेख, माजी नगरसेवक सतपाल वरठे तसेच कंत्राटदार इम्रान सौदागर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शिक्षक कॉलनीतील महेश देशमुख, प्रल्हाद उमप, विनोद चुने, प्रमोद नागमोते, देवेंद्र ठाकरे, पंकज इमले, कमलाकर आखरे, मदन वानखडे, शारदा देशमुख, आरती पवार, शितल पवार, सुषमा आखरे, अर्चना उमप, सुनिता वानखडे, राधिका चुडे, अर्चना डोके, सूरज चौधरी, निशा मोटवानी, सोनम इमले, नेहा इमले, चांदनी दांडेकर, विजया जाधव, आकाश इमले, भारत कर्से, सुनील दांडेकर यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी लावण्यात आलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याची सामूहिक जबाबदारी स्वीकारत पर्यावरण संरक्षणासाठी सातत्याने असे उपक्रम राबविण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

### विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागाचे यश

**अमरावती-**रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील जे. बी. सावंत सायन्स कॉलेज येथे आयोजित रिसेन्ट ट्रेन्डस् इन सायन्सेस या एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बायोटेक्नोलॉजी विभागाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे.रुबिना चांद शेख व डॉ. अनिता पाटील यांनी 'रिसेन्ट ट्रेन्डस् इन सायन्सेस' या विषयावर संशोधन पेपरचे मौखिक सादरीकरण करुन प्रथम क्रमांक पटकाविला आहे. याशिवाय अनघा मोरोपंत उंदिरवाडे आणि डॉ. अनिता पाटील यांनी याच परिषदेत त्याच विषयाच्या अनुषंगाने सादर केलेल्या संशोधन पेपरला तृतीय क्रमांक मिळाला. बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या विद्यार्थी आणि विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील यांनी मिळविलेल्या या यशामुळे विद्यापीठाच्या गौरवात आणखी भर पडली आहे. कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी विद्यार्थी व डॉ. अनिता पाटील यांचे अभिनंदन केले.

### उत्कृष्ट ग्रंथालय आणि 'ग्रंथमित्र' पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करा

**अमरावती-**राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत असलेल्या ग्रंथालय संचालनालयामार्फत देण्यात येणाऱ्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार' आणि 'डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र) पुरस्कार'- सन २०२५-२६ साठी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. इच्छुक ग्रंथालये, कार्यकर्ते आणि सेवकांनी २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट सार्वजनिक ग्रंथालय पुरस्कार हा राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील शासनमान्य ग्रंथालयांना त्यांच्या वर्गांनुसार (अ, ब, क, ड) रोख रक्कम, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र आणि ग्रंथभेट देऊन गौरवले जाते. 'अ' वर्ग ग्रंथालयास रुपये १ लाख, 'ब' वर्ग ग्रंथालयास रुपये ७५ हजार, 'क' वर्ग ग्रंथालयास रुपये ५० हजार आणि 'ड' वर्ग ग्रंथालयास रुपये २५ हजारांची रोख रक्कम प्रदान करण्यात येते.इच्छुकांनी आपले विहित नमुन्यातील संपूर्ण प्रस्ताव आवश्यक सर्व कागदपत्रांसह तीन प्रतीत आपल्या संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत सादर करता येणार आहे.

# 'बलसागर भारत होवो'

**हे** साने गुरुजींचे गीत केवळ राष्ट्रभक्तीचे गीत नाही; ते भारताच्या भविष्याचे एक स्वप्न आहे.त्या स्वप्नातील भारत शक्तिशाली आहे; पण केवळ शस्त्रांच्या बळावर नाही,तर जागरूक नागरिकांच्या बळावर, शिक्षणाच्या बळावर,एकतेच्या बळावर, त्यागाच्या बळावर,स्वाभिमानाच्या बळावर आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे माणुसकीच्या बळावर.आज आपण २१व्या शतकातील भारताकडे पाहतो तेव्हा एक प्रश्न मनात उभा राहतो.साने गुरुजींनी पाहिलेला 'बलसागर भारत' आपण खरोखर घडवला आहे का?या प्रश्नाचे उत्तर सरळ 'हो' किंवा 'नाही' असे देता येणार नाही. कारण आजचा भारत विरोधाभासांनी भरलेला आहे. एकीकडे भारत जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये आपले स्थान निर्माण करीत आहे,चंद्रावर पोहोचण्याची क्षमता दाखवत आहे,डिजिटल तंत्रज्ञानाने सामान्य माणसाच्या जीवनात मोठा बदल घडवून आणला आहे, महामार्ग,रेल्वे,विमानतळ, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि पायाभूत सुविधांचा विस्तार होत आहे;भारतीय तरुण जगभरातील तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये नेतृत्व करीत आहेत,भारतीय उद्योजक जागतिक बाजारपेठेत उतरले आहेत.स्टार्टअप संस्कृती वाढत आहे, विज्ञान, औषधनिर्मिती, माहिती-तंत्रज्ञान आणि अंतराळ संशोधनात भारताची क्षमता जगाला दिसत आहे.ही निश्चितच अभिमानाची बाब आहे.पण दुसरीकडे बेरोजगारी,गरिबी, सामाजिक विषमता, शिक्षणातील तफावत,



आरोग्यसेवेतील असमानता, शेतकऱ्यांच्या अडचणी, महिलांच्या सुरक्षिततेचे प्रश्न आणि न्याय मिळण्यास होणारा विलंब अजूनही आपल्या समोर उभे आहेत. म्हणूनच 'बलसागर'या शब्दाचा अर्थ आपण केवळ लष्करी किंवा आर्थिक शक्तीपुरता मर्यादित केला तर साने गुरुजींच्या विचाराचा आत्माच हरवेल.

बलसागर भारत म्हणजे ज्ञानाने बलवान भारत, विज्ञानाने बलवान भारत, अर्थव्यवस्थेने बलवान भारत,संविधानाने मजबूत भारत, न्यायाने समृद्ध भारत आणि माणुसकीने महान भारत. देशाची खरी ताकद सीमांवर उभ्या असलेल्या सैनिकांमध्ये आहेच; पण त्याचबरोबर शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यात,वर्गात शिकवणाऱ्या शिक्षकात, प्रयोगशाळेत संशोधन करणाऱ्या वैज्ञानिकात, रुग्णाची सेवा करणाऱ्या डॉक्टरमध्ये,प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कामगारात आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या सामान्य नागरिकात ही आहे.साने गुरुजींच्या विचारातील राष्ट्रवाद हा द्वेषाचा राष्ट्रवाद नाही; तो सेवेचा, त्यागाचा आणि माणुसकीचा राष्ट्रवाद आहे.

आज भारताने अनेक क्षेत्रांत मोठी झेप घेतली आहे. अंतराळ संशोधनातील कामगिरी, डिजिटल व्यवहार, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, उद्योग, स्टार्टअप, औषधनिर्मिती आणि माहिती-तंत्रज्ञान या क्षेत्रातील प्रगती ही भारताच्या सामर्थ्याची उदाहरणे आहेत. पण या प्रगतीचा लाभ भारतातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतो आहे का, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे. एखाद्या शहरात गगनचुंबी इमारती उभ्या राहत असतील आणि त्याच शहरातील गरीब मुलाला चांगले शिक्षण मिळत नसेल, तर विकासाची कथा अपूर्ण आहे. देशात अत्याधुनिक रुग्णालये असतील पण गरीब कुटुंबाला उपचारासाठी जमीन विकावी लागत असेल,तर विकासाचा अर्थ पुन्हा तपासावा लागेल. डिजिटल भारत तयार होत असेल पण ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षक, इंटरनेट आणि शिक्षणाच्या संधी मिळत नसतील,तर 'बलसागर भारत' अजून पूर्ण झालेला नाही.

आजच्या विद्यार्थ्याला स्पर्धा परीक्षेचे ज्ञान आहे;पण त्याला संविधानाची जाणीव आहे का?त्याला मोबाईल वापरता येतो; पण सोशल मीडियावरील खोटी माहिती आणि सत्य यातील फरक ओळखता येतो का?भारताला केवळ पदवीधर तरुण नको आहेत; भारताला विचार करणारे, प्रश्न विचारणारे, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले आणि संविधानाचा आदर करणारे नागरिक हवे आहेत.सरकारे येतात आणि जातात,पक्ष बदलतात,नेते बदलतात; पण संविधान हे आपल्या लोकशाही जीवनाचे मूलभूत अधिष्ठान आहे. बलसागर भारत म्हणजे असा भारत जिथे नागरिक सरकारला प्रश्न विचारू शकतो.रस्ते खराब असतील तर प्रश्न विचारणे चुकीचे नाही; शेतकऱ्यांच्या समस्या असतील तर प्रश्न विचारणे देशद्रोह नाही; बेरोजगारीवर प्रश्न विचारणे राष्ट्रविरोधी नाही; महागाईवर प्रश्न विचारणे चुकीचे नाही; न्याय मिळण्यास विलंब होत असेल तर त्यावर चर्चा करणे आवश्यक आहे.

लोकशाहीमध्ये सरकारवर टीका करणे म्हणजे देशावर टीका करणे नव्हे.उलट सरकारला प्रश्न विचारणारा जागरूक नागरिक देशाची लोकशाही मजबूत करतो.'बलसागर भारत'ची कल्पना न्यायाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.कायद्यापुढे सर्व समान असणे हा केवळ संविधानातील सिद्धांत नाही;तो सामान्य नागरिकाचा विश्वास आहे.गरीब आणि श्रीमंत, शक्तिशाली आणि दुर्बल,राजकीय प्रभाव असलेला आणि सामान्य नागरिक सर्वांना न्याय समान मिळाला पाहिजे. मात्र न्याय मिळण्यास होणारा विलंब हा आजही गंभीर प्रश्न आहे.भारताची विविधता ही त्याची ताकद आहे; पण हीच विविधता जर द्वेषाचे कारण बनली तर राष्ट्राच्या शक्तीला तडा जातो.

बलसागर भारतासाठी डिजिटल नागरिकही जबाबदार असला पाहिजे.शिक्षित, कौशल्यपूर्ण, निरोगी आणि रोजगारक्षम तरुणाई ही खरी ताकद असते. तरुणांना केवळ नोकरी मागणारे बनवण्यापेक्षा रोजगार निर्माण करणारे बनवणे आवश्यक आहे. त्यांना कौशल्य, उद्योग, संशोधन, विज्ञान, शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान आणि नवकल्पनांची संधी मिळाली पाहिजे.महिलांना शिक्षण, रोजगार, समान संधी, सुरक्षित सार्वजनिक जागा, न्याय आणि निर्णय प्रक्रियेत समान सहभाग मिळाला पाहिजे.

भारताची अर्थव्यवस्था कितीही आधुनिक झाली तरी अन्न निर्माण करणाऱ्या शेतकऱ्याचा आणि देशाची उत्पादनशक्ती उभी करणाऱ्या कामगाराचा सन्मान टिकला पाहिजे.शेतकऱ्याला योग्य बाजारभाव,पाणी, तंत्रज्ञान आणि आर्थिक सुरक्षा मिळाली पाहिजे. कामगाराला योग्य वेतन,सुरक्षित कामाचे वातावरण आणि सामाजिक सुरक्षा मिळाली पाहिजे. कारण राष्ट्राची इमारत फक्त संसद,मंत्रालये आणि मोठ्या उद्योगांवर उभी नसते;ती शेतातल्या मातीत आणि कामगाराच्या घामातही उभी असते. मग आजचा भारत कुठे उभा आहे?आपल्या मुलांना समान दर्जाचे शिक्षण मिळते का? सामान्य माणसाला वेळेत न्याय मिळतो का?तरुणाला त्याच्या शिक्षणाला साजेसा रोजगार मिळतो का?शेतकरी सुरक्षित आहे का?महिला निर्भय आहेत का? गरीबाला सन्मानाने जगता येते का? जात-धर्माच्या पलीकडे भारतीय म्हणून आपण एकमेकांकडे पाहतो का?सरकार कोणतेही असो, नागरिक प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य आणि धैर्य जपतो का?या प्रश्नांची उत्तरे अजून पूर्णपणे समाधानकारक नाहीत. म्हणूनच 'बलसागर भारत' हे स्वप्न अजून पूर्ण झालेले नाही.

भारताला जगातील सर्वात शक्तिशाली देश व्हायचे आहेच; पण त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे भारताला जगातील सर्वात न्याय्य, संवेदनशील, सुशिक्षित आणि माणुसकी जपणारा देश व्हायचे आहे. कारण शेवटी देशाची खरी ताकद त्याच्या सीमांच्या लांबीमध्ये नसते; ती त्याच्या नागरिकांच्या मनाच्या उंचीत असते. आणि म्हणूनच आज, २१व्या शतकातील भारताने पुन्हा एकदा स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.'आपण खरोखर बलसागर भारत घडवत आहोत का, की केवळ बलसागर भारताची गाणी गात आहोत?' या प्रश्नाचे उत्तर सरकारने नव्हे, आपल्या प्रत्येकाच्या कृतीने द्यायचे आहे. 'बलसागर भारत होवो' हे केवळ साने गुरुजींचे स्वप्न नाही ते आजच्या भारतासमोरचे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

**धनंजय देशमुख**
मो.९२८४३८२१०२

## शौर्य गाण

भारत देशाची वाढवू आम्ही शान
देश रक्षणार्थ लावू पणाला प्राण..

स्वातंत्र्यासाठी जे लढले
तळहाती घेऊनी प्राण

एकमुखाने गाऊ सारे
त्यांच्या शौर्याचे गुणगाण..

स्वातंत्र्याप्राप्ती मार्ग अनेक जपले
अहिंसा,संघर्ष,त्याग,बलिदान
छातीवर जरी गोळी झेलली
कधी न झुकली ती वीर मान..

मायभूचे साखळदंड तुटता मिळे
स्वातंत्र्य समता बंधुत्वाचे दान

भेदाभेद संपवू या रे
गाऊ सारे मानवतेच गाण..

सीमारक्षणा लडले वीर जवान
किसान पिकवतो कष्टाने रान

देश गौरविण्या एक होऊन
पराक्रम कष्टाचा करु सन्मान..

जल,जमीन,जंगल गिळण्या
एकवटले सारे हैवान
वसुंधरेच्या संरक्षणासाठी
आता पेटवू सारे रान..

संविधान मुल्य घाव सोसती
धर्माधर्मात नको भांडण

कधी ना मोडू जुट एकटेची
देश असे प्राण
तिरंगाचा अभिमान..

भारत देशाची वाढवू आम्ही शान
देश रक्षणार्थ लावू पणाला प्राण..

**विठ्ठल वळसे पाटील,**
पुणे
मो. ८४८४०६६०४२

## स्मरण क्रांतिवीरांचे !

जे लढले होते तेव्हा
आज ते अस्तित्वात नाहीत,

आहेत जे आज ईथे त्यांना
स्वातंत्र्याचे मोलच नाही..

दुःखाची झळ सोसली त्यांनी
भविष्याची पर्वा केली नाही,

सुख आज आम्ही उपभोगतोय
आम्हाला त्यांची कदर नाही...

स्वप्न त्यांच्या डोळ्यातले
पारतंत्र्यात कधी साकारले नाही,
त्यांच्या स्वप्नांचे मूल्य
आम्हाला आज कळणार नाही..

रक्त सांडले, फास स्वीकारला
जखमांना कधी कुरवाळले नाही,

ध्यास एकची स्वातंत्र्याचा
मोहाचा स्पर्श होऊ दिलाच नाही...

हसत हसत लढत राहिले
वंदे मातरम् बोलण्यास विसरले नाही,
मृत्यु समोर उभा असतानाही
माघार त्यांना मान्यच नाही..

देशाला केले मुक्त जोखडातून
छळाला त्यांनी जुमानले नाही,
लढले ते वीर क्रांतिकारक
स्वातंत्र्याची फळे त्यांनी चाखलीच नाही...


स्वातंत्र्य दिनाच्या या पवित्र क्षणी
त्यांना न स्मरून
चालणारच नाही
ते लढले म्हणून आज आहोत आपण
त्यागाविना त्यांच्या
आपले अस्तित्वच नाही..

**ज्योती रावराणे**

# श्री अरविंद यांची योगसाधना

**१५** ऑगस्ट हा महायोगी श्री अरविंद यांचा जन्मदिन आहे. त्यांच्या वडिलांना भारतीय संस्कृती व समाजव्यवस्थेपेक्षा पाश्चात्य संस्कृती आणि समाजव्यवस्था अधिक उच्च दर्जाची वाटत असल्यामुळे वडिलांनी श्री अरविंद यांना त्यांच्या बालपणीच शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविले. तिथल्या वास्तव्यात श्री अरविंदांनी पाश्चात्य संस्कृती, इतिहास, तत्वज्ञान, साहित्य आणि कला या सर्व अंगांचा भरपूर अभ्यास केला.त्यांची बुद्धी कुशाग्र होती.परंतु तरुणपणी भारतीय स्वातंत्र्याच्या ओढीमुळे आयसीएस चे शिक्षण अर्धवट सोडून ते भारतात परतले. इथे आल्यावर त्यांनी भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या कार्यात भाग घेतला आणि सशस्त्र क्रांतिकारकांशी देखील संपर्क ठेवला. अल्पावधीतच त्यांना देश ओळखू लागला. एक वर्षाचा कारावास भोगत असताना श्री अरविंदांना अनेक प्रकारच्या आध्यात्मिक अनुभूती होत गेल्या. भारताला स्वातंत्र्य मिळणारच; तू मात्र स्वातंत्र्य लढ्यापासून बाजूला होऊन केवळ आध्यात्मिक साधना कर, असा सुस्पष्ट आंतरिक संदेश आल्यामुळे तुरुंगातून सुटल्यावर ते पाँडीचेरी येथे कायमचे स्थायिक झाले. तिथे त्यांनी दीर्घकाळ एकांतात योगसाधना केली.

ताटातून घास उचलून तोंडात टाकणे ही आपली ऐच्छिक क्रिया असते. म्हणजे त्यावेळी जेवावे की न जेवावे, कोणता पदार्थ खावा हे आपण ठरविलेले असते. परंतु एकदा घास तोंडात गेल्यानंतर पुढे शरीरात त्यावर जी प्रक्रिया होते ती आपण ठरविल्यामुळे होत नाही.आपोआप होणाऱ्या या प्रक्रियेला नैसर्गिक किंवा प्राकृतिक म्हटले जाते.म्हणजे शरीराच्या बाबतीत काही गोष्टी आपले मन अथवा बुद्धी ठरवू शकतात, पण अनेक बाबतीत आपली प्रकृती यांत्रिकपणे ते कार्य करते. भूक लागली की अन्न खाणे, ही देहप्रकृती आहे. परंतु भुकेवर नियंत्रण ठेवणे, अन्नाची निवड करणे हे शारीरिक प्रकृतीपेक्षा वरच्या स्तरावर असलेल्या मनाचे व बुद्धीचे काम आहे.



आपल्या मनाचे निरीक्षण केले तर आपल्या भावना, इच्छा, वासना, आग्रह आणि अहंकार हे देखील खूप प्रमाणात प्राकृतिक, म्हणजे आपल्या नियंत्रणाबाहेर, असल्याचे आढळून येते.याचा अर्थ मनाची देखील एक प्रकृती आहे. आपण पुष्कळदा यांत्रिकपणे वागत असतो. विचार करणे हे बुद्धीचे काम आहे,पण कोणता विचार करावा,कसा करावा यावर अनेकदा आपले नियंत्रण नसते. बुद्धीची एक स्वतंत्र प्रकृती आहे. म्हणजे आपण विचारही यांत्रिकपणे करतो.फक्त असे निश्चित म्हणता येईल की देहप्रकृतीपेक्षा मनाची प्रकृती आणि मनप्रकृतीपेक्षा बुद्धीची प्रकृती ही अधिक लवचिक व बदल स्वीकारणारी असू शकते. मानवी देहामध्ये बुद्धीच्या प्रकृतीपेक्षा अधिक उच्च दर्जाची प्रकृती अपवाद स्वरूप आढळून येते.

श्री अरविंद यांचे असे प्रतिपादन होते की,या संपूर्ण विश्वाच्या मुळाशी एकच एक चैतन्य असून ते सर्वव्यापी व सर्वशक्तिमान आहे. शिवाय त्या चैतन्याचा आनंद हा स्वभाव आहे. त्या मूळ चैतन्यातूनच अनेक प्रकारची जगते निर्माण होत गेली आणि आपल्याला दिसणारे व ज्यात आपण जगत आहोत ते भौतिक जगत हे एकमेव जगत अस्तित्वात नाहीत. प्रत्येक जगताची एक प्रकृती आहे, जी नियंत्रणाशिवाय आपोआप कार्यरत राहते.

निर्जीव भौतिक जगतात सजीवांची उत्पत्ती झाली तेव्हा देहप्रकृतीचे जगत इथे अवतरले. देहप्रकृतीचा विकास होता होता त्यात मनप्रकृतीचे जगत अवतरले आणि मानव देहामध्ये मनासोबतच बुद्धीप्रकृतीचे जगत देखील मोठ्या प्रमाणात अवतरले.

मनाने शारीरिक इच्छा, वासनांवर काही प्रमाणात नियंत्रण मिळविले आणि मानवी संस्कृतीचा विकास सुरु झाला. बुद्धीने मन व शरीरावर पुन्हा काही प्रमाणात नियंत्रण मिळविले आणि त्या विकासाचा वेग वाढला. परंतु नियंत्रण मिळविणे म्हणजे खालच्या प्रकृतीचे रुपांतरण होणे नव्हे.मी संतापावर नियंत्रण मिळविले म्हणजे माझ्यातून संताप नष्ट होत नाही,तर तो माझ्यातल्या जाणिवेतून नेणिवेत जाऊन बसतो. याचा अर्थ नित्याच्या व्यवहारात जरी मी संतापत नसलो तरी एखाद्या प्रसंगी तो संताप उफाळून बाहेर येतोच. आपल्यातल्या अनेक विकारांमुळे आपल्यात आणि इतर व्यक्तींमध्ये दुरावा निर्माण होतो. व्यक्ती-व्यक्तींमध्ये दुरावा नसावा तर प्रत्येक व्यक्तीने आपापल्या क्षमतेनुसार विकसित होत असतानाच इतर व्यक्तींसोबत सुसंवादी राहावे, हा उत्क्रांतीचा उद्देश आहे 'भूतां परस्परें जडो, मैत्र जीवाचें'. जीवाजीवांमध्ये दुरावा निर्माण करणाऱ्या आमच्या प्रकृतीचे रुपांतरण आज आमच्या हाती नाही. परंतु उत्क्रांतीच्या ओघात हळूहळू प्रदीर्घ कालावधीत ते घडणार आहेच. बुद्धीप्रकृती पेक्षा अधिक उच्च दर्जाच्या दिव्य जगताचे पृथ्वीवर अवतरण व्हावे, यासाठी श्री अरविंदांनी अनेक दशके योगसाधना केली. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या योगसहकारी व पट्टशिष्या असलेल्या माताजींनी काही वर्षांनी असे सांगितले की ते उच्चतम दिव्य जगत पृथ्वीवर आता अवतरले असून हळू हळू इथल्या प्रकृतीवर त्याचे कार्य चालणार आहे. आम्हा सर्व मानवांच्या आत खोलवर त्या मूळ सर्वव्यापी व आनंदमय अश्या चैतन्याचा अंश विद्यमान आहेच. परंतु देहप्रकृती, मनप्रकृती आणि बुद्धीप्रकृती यांचेच वर्चस्व आमच्या जाणीवेवर असल्यामुळे त्या अंतरात्म्याशी आमचा सहजी संपर्क होऊ शकत नाही. मात्र आम्ही आमच्या प्रकृतीपासून आमच्या जाणीवेला वेगळे करण्याची व त्या अंतरात्म्याशी संपर्क साधण्याची साधना करू शकलो तर उच्चतम दिव्य प्रकृतीच्या दिशेने तो अंतरात्मा आम्हाला लवकर नेऊ शकतो. हेच श्री अरविंद योगाचे मुख्य सूत्र आहे.

**किशोर देशपांडे**

# महा वॉकेथॉन २०२६-वॉक फॉर वॉटर

**शा**श्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे असून मृद व जलसंधारण विभागाच्यावतीने आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाची थीम सेव सॉईल, सेव वॉटर, सेक्युअर टूमारो (Save Soil, Save Water, Secure Tomorrow) अशी असून पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा हे घोषवाक्य आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यात २१ ऑगस्ट रोजी कमाल ३ किलोमीटर (महा वॉकेथॉन) चालणे आणि मृद व जलसंधारणाची शपथ घेणे असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे.

शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारण हे आवश्यक असून त्याचे महत्त्व पटवून देण्याकरिता राज्यात १५ ते २१ ऑगस्ट, २०२६ दरम्यान 'जलसंधारण सप्ताह' आणि १५ ऑगस्ट, २०२६ ते २६ जानेवारी, २०२७ दरम्यान 'जलसंधारण अभियान' आयोजित करण्यात येत आहे. तर २१ ऑगस्ट २०२६ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यात शाश्वत विकासासाठी मृदसंधारण व जलसंधारणाबाबत 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' (Maha Walkathon-Walk for Water) या उपक्रमाचे आयोजन करुन जलसंवर्धनाला लोकचळवळीचे स्वरुप देण्याचे कार्य राज्य शासनाने हाती घेतले असून मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी या लोकचळवळीत राज्यातील सर्व नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

राज्यस्तरीय कार्यक्रम मुंबई येथे होणार असून प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रमाच्या आयोजनाचे प्रमुख जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी हे असणार आहेत. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सर्व मंत्री, सर्व राज्यमंत्री, राज्यसभा/ लोकसभा/ विधान परिषद/ विधानसभा सदस्य, सर्व जिल्हापरिषद अध्यक्ष/ उपाध्यक्ष, सर्व महापौर / उपमहापौर, सर्व नगराध्यक्ष/उपनगराध्यक्ष, सर्व जिल्हापरिषद / पंचायत समिती / ग्रामपंचायत सदस्य, सर्व महानगर पालिका/ नगर पालिका नगर पंचायत सदस्य आणि इतर स्थानिक लोक प्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात येणार आहे.सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी, सर्व निमशासकीय अधिकारी व कर्मचारी, जिल्ह्यातील नामांकित व प्रतिष्ठित व्यक्ती / डॉक्टर / कलाकार/ उद्योजक, जिल्ह्यातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू, जिल्ह्या तील सर्व महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थी, एनसीसी, एनएसएस, माय भारत, नेहरु युवा केंद्र, भारत स्काऊट्स अँड गाईड्स, रेड क्रॉस, होमगार्ड, स्वयंसेवी संस्था, रोटरी क्लब सदस्य, लायन्स क्लब सदस्य, रनिंग क्लब सदस्य, सायकलिंग क्लब सदस्य, उद्योग व व्यापारी संघटना, सीएसआर भागीदार कंपन्या, विविध क्रीडा संघटना, गुड मॉर्निंग ग्रुप्स, विविध व्यायाम शाळा, स्वयंसेवी संस्था, महिला, राज्याचे नागरिक यांना सहभागी करण्यात येणार आहे.

### क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी

महा वॉकेथॉन मध्ये सहभागी होण्यासाठी क्यूआर आधारित ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. २१ ऑगस्ट रोजी महा वॉकेथॉन मध्ये सहभागी प्रत्येक व्यक्तीस ई-प्रमाणपत्र मिळणार आहे. तर प्रथम दहा विजेत्यास जिल्हास्तरावर सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाची सोशल मीडियासाठी #MahaWalkathon, #Walk ForWater, #SaveSoil Save Water हे हॅशटॅग वापरण्यात याव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

### जलसंधारण सप्ताह

१५ ते २१ ऑगस्ट २०२६ या जलसंधारण सप्ताह दरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींच्या कल्पकतेचा उपयोग करुन इनस्टाग्राम (Instagram) च्या माध्यमातून महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यात मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्यासाठी राज्यव्यापी 'Reel for Soil and Water Conservation' स्पर्धा आयोजित करण्यात आले

## २१ ऑगस्ट जलसंधारण दिनी राज्यभर आयोजन

आहे. याची थीम Save Soil, Save Water, Secure Tomorrow अशी असून सोशल मीडियावर #SaveSoil Save Water हे हॅशटॅग वापरण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यामुळे एकाच हॅशटॅगखाली विक्रमी संख्येने रील्स तयार होऊन मोठ्या डिजिटल सहभागाची नोंद होणार आहे.रील स्पर्धा महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरावर आयोजित करण्यात आली असून या स्पर्धेचा पात्र वयोगट १५ ते ३० वर्षे असा ठेवण्यात आला आहे. प्रत्येक स्पर्धकाने ३० ते ६० सेकंदांची Instagram Reel तयार करावी. व्हिडीओ/ रीलच्या सुरुवातीला व्हिडीओ / रीलचा उद्देश, स्वतःचे संपूर्ण नाव, जिल्ह्याचे नाव नमूद सहभागी स्पर्धकांनी करणे आवश्यक आहे. स्पर्धकांने Reel स्वतःच्या Public Instagram Account वर पोस्ट करावी. स्पर्धकांनी मृद व जलसंधारण विभागाच्या अधिकृत Instagram Account }e Tag करणे बंधनकारक राहील. यासाठी अधिकृत हॅशटॅग #SaveSoilSave Water वापरणे अनिवार्य राहणार आहे.

स्पर्धेसाठी मान्यता दिलेला एक अधिकृत QR Code तयार करण्यात येईल. QR Scan केल्यानंतर नोंदणी Reel Link Submit जिल्हा निवड Verification सहभाग प्रमाणपत्र अशी सोपी प्रक्रिया असणार आहे. Instagram हॅशटॅगबरोबर स्वतंत्र डिजिटल नोंदणी केल्यामुळे शासनाकडे प्रत्येक सहभागीची अधिकृत नोंद उपलब्ध राहणार आहे. रील्स अपलोड करण्याचा कालावधी १५ ते २१ ऑगस्ट २०२६ असा आहे.

### रील्स बनवण्यासाठी विषय

माती संवर्धन, पाणी बचत, मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक मृद व जलसंधारण पद्धती, माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना, आजचे संवर्धन उद्याचे सुरक्षित भविष्य असे रील्स बनवण्यासाठी विषय देण्यात आले आहेत.रील्स बनवितांना Storytelling, Acting, Music, Dance, Animation, AI Creative, Comedy, Short Film, Before-After, Drone Visuals किंवा अन्य नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करता येणार आहे. मात्र रीलचा मुख्य संदेश माती आणि पाणी संवर्धनाशी संबंधित असणे आवश्यक राहणार आहे.

रील्स करिता गुणांकन पद्धती पुढील प्रमाणे असणार आहे. विषय व संदेश - ३० गुण, कल्पकता - २५ गुण, प्रभावी सामाजिक संदेश - २० गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्ता - १५ गुण, Instagram Engag ement - १० गुण असे एकूण - १०० गुण असणार आहेत. केवळ थ्वे किंवा Followers वर विजेता निश्चित न करता तज्ज्ञ परीक्षण आणि Social Media Engagement या दोन्हींचा समतोल ठेवण्यात येणार आहे. गुणांकानुसार विजेत्याची निवड करण्यात येईल.

संपूर्ण राज्यासाठी एकच अधिकृत हॅशटॅग क्ष्ईनएदर्ग्ईर्न्नी वापरण्यात येणार असून, प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रील्स आणि राज्यभरातून १० हजार रिल्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या माध्यमातून लाखो नागरिकांपर्यंत डिजिटल स्वरूपात मृद व जलसंधारणाचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. रील स्पर्धेत प्रत्येक जिल्ह्यात प्रथम पुरस्कार २५ हजार व गौरवचिन्ह, द्वितीय पुरस्कार १५ हजार व गौरवचिन्ह आणि तृतीय पुरस्कार १० हजार व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र तसेच विजेत्यांना विशेष 'युवा मृद-जलदूत' म्हणून गौरविण्यात येणार आहे.

'एक Reel... मातीसाठी !, एक Reel... पाण्यासाठी !, एक Reel... सुरक्षित भविष्यासाठी !' हा रील्स प्रचारासाठी मुख्य संदेश आहे.

### जलसंधारण अभियान

या स्पर्धेसोबतच १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या जलसंधारण अभियानादरम्यान राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध स्पर्धा (जलसंधारणाचे महत्त्व, पाण्याचे महत्व, जल है तो कल है, जलसंवर्धन उपाय, घरातील पाण्याचा वापर - Water Budget), चित्रकला / पोस्टर स्पर्धा- जलसंवर्धन उपाय, पाणी बचत उपाय, Rainwater Harvesting., वाद-विवाद स्पर्धाः (विषय- जलसंधारण शासनाची जबाबदारी कि जनतेची जबाबदारी, इतर विषय), एक शाळा- एक शोषखड्डा उपक्रम राबविणे, सर्व शाळांमध्ये पाणी बचतीचे महत्व विद्यार्थ्यांना सांगणे., जलमित्र / जलदूत घोषित करणे, २१ ऑगस्ट रोजी शाळेत माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करणे, २१ ऑगस्ट रोजी मृद व जलसंधारणाची शपथ घेणे, २१ ऑगस्ट रोजी प्रमाणपत्र / सन्मानचिन्ह / पुरस्कार वितरण करणे, २१ ऑगस्ट रोजी गावातील किंवा शहरातील जलतज्ञ/प्रतिष्ठीत व्यक्ती यांना प्रमुख पाहूणे म्हणून आमंत्रित करणे असे कार्यक्रम घेण्यात यावेत.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना आणि उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांना २६ जानेवारी रोजी पालकमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मृद व जलसंधारण विभागाचे पुढील सोशल मीडिया अकाऊंट आहेत. Instagram - https:// www.insta gram.com/ mahawalkathon2026/?hl=enFacebook - https://www.facebook.com/mahawalkathon2026/Twitter- https://x.com/ Maha Walkathon26

**संकलन – गजानन पाटील,**
विभागीय संपर्क अधिकारी,
माहिती व जनसंपर्क
महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई

# ई-बस, हॉकर्स झोनवरून महासभेत रणकंदन!

## ‘आधीच डबघाईला आलेल्या मनपावर बससेवेचा अतिरिक्त बोजा नको’ ; आंबेडकर मैदानातील हॉकर्स झोनला नगरसेवकांचा विरोध

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेच्या शुक्रवारी, १४ ऑगस्ट रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात झालेल्या सर्वसाधारण सभेत ई-बस सेवा, हॉकर्स झोन, शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था, आमदार स्थानिक विकास निधीतील कामे आणि महिला सुविधांसह विविध विषयांवर निर्णय घेण्यात आले. महापौर शारदा खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत तब्बल सहा ठरावांना मंजुरी देण्यात आली. मात्र, ई-बस सेवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानातील प्रस्तावित हॉकर्स झोनवरून सत्ताधारी-विरोधकांमध्ये चांगलेच मतभेद उफाळून आले.



### ई-बससाठी स्वतंत्र कंपनी; आर्थिक भाराचा सवाल

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री ई-बस सेवा योजनेअंतर्गत अकोला शहराला मिळालेल्या ई-बसच्या परिचालनासाठी कंपनी कायदा २०१३ अंतर्गत स्वतंत्र परिवहन कंपनी तथा विशेष उद्देश संस्था (एइत्र) स्थापन करण्यास महासभेने मंजुरी दिली. या कंपनीच्या माध्यमातून बस संचालन, करार व्यवस्थापन, महसूल, तिकीट प्रणाली, आयटीएमएस, बस डेपो, चार्जिंग स्टेशन तसेच प्रवासी सुविधांचे व्यवस्थापन केले जाणार आहे. मात्र, ‘आधीच आर्थिक संकटात असलेल्या मनपावर ई-बस सेवेचा अतिरिक्त आर्थिक भार किती?’ असा सवाल शहर सुधार आघाडीचे नगरसेवक सुनील मेश्राम यांनी उपस्थित केला. बससेवा सुरू करायची असेल तर केंद्र शासनाने मनपाला विशेष निधी द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. प्रस्तावानुसार वाहकाच्या वेतनात कंपनी आणि मनपामध्ये सुमारे ३,४४० रुपयांचा फरक असून, ११९ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दरमहा सुमारे ४.०९ लाख रुपये आणि वार्षिक सुमारे ४९.१२ लाख रुपयांची बचत अपेक्षित असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, बससेवेचा एकूण खर्च, मनपाचा हिस्सा आणि भविष्यातील आर्थिक जबाबदारी याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

### आंबेडकर मैदानावर हॉकर्स झोन? पराग गवईंचा तीव्र विरोध

दरम्यान, शहरातील विविध रस्ते व परिसर हॉकर्स झोन आणि नॉन-हॉकर्स झोन म्हणून निश्चित करण्याचा प्रस्तावही महासभेत आला. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानाच्या रस्त्यालगतच्या जागेचा हॉकर्स झोनमध्ये समावेश प्रस्तावित करण्यात आला आहे. याला वंचित बहुजन आघाडीचे नगरसेवक पराग गवई यांनी तीव्र विरोध केला. ‘शहराच्या मध्यवर्ती भागात खेळाडू, विद्यार्थी आणि नागरिकांसाठी उरलेले हे महत्त्वाचे मोकळे मैदान आहे. येथे हॉकर्स झोन केल्यास मैदानाचे अस्तित्वच धोक्यात येईल आणि पुन्हा अतिक्रमणाचा प्रश्न निर्माण होईल,’ अशी भूमिका त्यांनी मांडली.

शहरातील वाहतूक कोंडी आणि अतिक्रमणाचा प्रश्न कायम असताना हॉकर्स झोनच्या नावाखाली नव्या अतिक्रमणाला खतपाणी घालण्याचा प्रकार होऊ नये, अशी मागणीही त्यांनी केली.

### शहरातील २३ ठिकाणी नॉन-हॉकर्स झोन

महापालिकेने शहरातील बसस्थानक, गांधी चौक, सिटी कोतवाली, टिळक रोड, अकोट स्टँड, जठारपेठ, रेल्वे स्टेशन, डाबकी रोड, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, शाळा-महाविद्यालये आणि रुग्णालय परिसरासह तब्बल २३ मार्ग व संवेदनशील भाग नॉन-हॉकर्स झोन म्हणून प्रस्तावित केले आहेत. त्याचवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदानालगतची जागा, खदान मनपा कॉम्प्लेक्समधील ओटे आणि डाबकी रोडवरील मराठी मुलांची शाळा क्रमांक ८ परिसर अशा तीन ठिकाणी हॉकर्स झोन प्रस्तावित करण्यात आले आहेत.

### १.४० कोटींच्या विकासकामांना हिरवा कंदील

आमदार स्थानिक विकास कार्यक्रम २०२६-२७ अंतर्गत प्रभाग क्रमांक ११, १५ आणि १८ मधील सुमारे १ कोटी ४० लाख रुपयांच्या कामांना नाहरकत प्रमाणपत्र देण्यास मंजुरी देण्यात आली. यामध्ये प्रभाग १५ मध्ये संजय ठाकूर ते जाफर अली ते अहमद गॅरेज ते नियामत शाहपर्यंत कॉंक्रीट नाली, रस्ता व कल्व्हर्टसाठी ३५ लाख रुपये, प्रभाग १८ मध्ये एस.एस. किराणा ते लुकमान ऐ अरब मस्जिदपर्यंत कॉंक्रीट रस्त्यासाठी १५ लाख रुपये, प्रभाग ११ मध्ये फतेह चौक ते टॉवरपर्यंत विद्युतीकरण व स्टोन रेलिंगसाठी ३० लाख रुपये, प्रभाग १८ मध्ये सम्राट हॉटेलजवळ कॉंक्रीट नाली व मोठ्या कल्व्हर्टसाठी २० लाख रुपये आणि प्रभाग ११ मध्ये फतेह चौकावरील खुल्या जागेत पेव्हर्स व विद्युतीकरणासाठी ४० लाख रुपयांचा समावेश आहे.

### महिलांसाठी ‘हिरकणी कक्ष’, सॅनिटरी नॅपकिन मशीन

महिला व बालकल्याण समितीच्या ठरावानुसार गांधी चौकात आधुनिक आणि सुरक्षित सार्वजनिक स्वच्छतागृहासोबत स्तनदा मातांसाठी स्वतंत्र ‘हिरकणी कक्ष’ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. महापालिका मुख्य इमारत, झोन कार्यालये, दवाखाने आणि मराठी शाळांमध्ये सॅनिटरी नॅपकिन वेंडिंग व डिस्पोजल मशीन बसविणे, वॉटर प्युरिफायर उपलब्ध करणे तसेच चारही झोनमध्ये किशोरवयीन मुली व महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यासही मान्यता देण्यात आली.

### शेतकरी कर्जमाफीबद्दल फडणवीसांचे अभिनंदन

महाराष्ट्र शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनंदनाचा ठरावही महासभेत मंजूर करण्यात आला. महापौर शारदा खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला उपमहापौर अमोल घोगे, आयुक्त डॉ. संजय लहाने, सभापती विजय अग्रवाल, सभागृहनेता पवन महल्ले, विरोधी पक्षनेते जीशान हुसेन, नगरसचिव अनिल बिडवे यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका उपस्थित होते. ई-बससाठी स्वतंत्र कंपनी, हॉकर्स झोनची आखणी आणि कोट्यवधींची विकासकामे यामुळे महासभेतील निर्णयांना महत्त्व प्राप्त झाले असले, तरी ई-बसचा आर्थिक भार आणि आंबेडकर मैदानाच्या जागेवरील हॉकर्स झोनचा निर्णय येत्या काळात मनपासाठी आणि प्रशासनासाठी मोठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे.

### अतिरिक्त बोअर, शाळा व हिरवळींमध्ये सबमर्सिबल पंप

शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी अतिरिक्त बोअर कार्यान्वित करण्यास तसेच सार्वजनिक शौचालये, महापालिकेच्या शाळा आणि हिरवळीच्या परिसरात बोअर करून सबमर्सिबल पंप बसविण्यास मंजुरी देण्यात आली. शहरात २०० बोअरचे रिड्रिलिंग/फ्लशिंग व सबमर्सिबल पंप बसविण्याची निविदा प्रक्रिया पूर्ण करून झोननिहाय कार्यादेश देण्यात आले असल्याचे सभागृहात सांगण्यात आले. बोअरची संख्या वाढणे आणि अतिरिक्त केसिंगची आवश्यकता निर्माण झाल्याने वाढीव खर्चासह अतिरिक्त बोअर कार्यान्वित करण्यासही मंजुरी देण्यात आली.

**अकोला महानगरपालिका, अकोला**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**मनपा अकोला**

**निविदा सुचना क्र. १५, (२६-२७)**

आयुक्त, अकोला महानगरपालिका १५ वा वित्त आयोग निधी अंतर्गत ०७ काम, मा. आमदार श्री. रणधीर सावरकर यांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत ०१ काम या कामांकरीता निविदा मागविण्यात येत आहे. करीता विस्तृत माहितीसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, मनपा अकोलाच्या निविदा शाखेच्या कार्यालयीन नोटीस बोर्डवर तसेच खालील नमुद संकेत स्थळावर भेट द्यावी.

Portal https://amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
अकोला महानगर पालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/साबावि/३९१/२०२६,
अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : १३/०८/२०२६

## भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन; केंद्रीय विद्यालयाचा आज प्रवेशोत्सव

**अकोला :** भारताच्या ८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त मुख्य शासकीय समारंभ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात उद्या दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०५ वा. होणार आहे. राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ?ड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते राष्ट्रध्वजारोहण होईल. स्वातंत्र्यदिनानिमित्त उद्या विविध कार्यक्रम होणार आहेत. केंद्रीय विद्यालयात प्रवेशोत्सव :अकोला येथे केंद्रीय विद्यालयाची स्थापना झाली असून, पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या उपस्थितीत विद्यालयात उद्या प्रवेशोत्सव साजरा होणार आहे. मुख्य ध्वजारोहण समारंभानंतर सकाळी १० वा. हा कार्यक्रम होईल. जिल्ह्यातील मान्यवर लोकप्रतिनिधी यावेळी उपस्थित राहणार आहेत. विश्रामगृहाच्या कामांचे उद्घाटन : सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने शासकीय विश्रामगृहाचे नूतनीकरण, तसेच आवारभिंतीच्या बांधकामाचा उद्घाटन समारंभ सकाळी ९.४५ वा. पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या हस्ते व विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. ‘आत्मा’तर्फे रानभाजी महोत्सव : कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणेतर्फे (आत्मा) जिल्हा रानभाजी महोत्सव शनिवारी सकाळी १० ते दु. ३ या वेळेत येथील मूर्तिजापूर रस्त्यावरील ‘आत्मा’ कार्यालयाच्या परिसरात होणार आहे.

**Change In Name**
I HAVE CHANGED MY
**NAME FROM**
**NOOR AFSA**
PASSPORT NO
(N6210444)
**NOOR AFSA TABREZ**
**AHMED CHAUDHARY**
NEAR NEW INDIA
BAKERY SHANKAR
NAGAR AKOT FAIL
AKOLA 444001

**Change In Name**
I HAVE CHANGED MY
NAME FROM
**A. RAZZAQUE**
**A. SATTAR**
**अ रज्जाक अ सत्तार**
TO
**ABDUL RAZZAQUE**
**ABDUL SATTAR**
**अब्दुल रज्जाक अब्दुल सत्तर**
HAJI NAGAR AKOT
FAIL BEHIND RAZA
MASJID AKOLA 444003

**Change In Name**
I HAVE CHANGED MY
**NAME FROM**
**TABREZ AHMAD**
PASSPORT NO
(N6210445)
**TABREZ AHMED**
**MEER HASAN**
**CHAUDHARY**
NEAR NEW INDIA
BAKERY SHANKAR
NAGAR AKOT FAIL
AKOLA 444001

## तेल्हाऱ्यात ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत भव्य रॅली



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

भारताच्या ८०व्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी तेल्हारा शहरात ‘हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत शुक्रवारी भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. हातात तिरंगा घेतलेल्या विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांनी दिलेल्या ‘भारत माता की जय’, ‘वंदे मातरम्’ आणि ‘जय हिंद’च्या घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले.

तहसील कार्यालय, पंचायत समिती, नगर परिषद, वान प्रकल्प, श्री शिवाजी हायस्कूल, से.ब. विद्यालय आणि तेल्हारा पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने रॅलीचे आयोजन करण्यात आले. तहसीलदार महेश राममुंडे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या रॅलीत महसूल, शिक्षण, पोलीस प्रशासनासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

नायब तहसीलदार विकास राणे, ज्योती नारगुडी, संजय दुबे, श्री शिवाजी हायस्कूलचे मुख्याध्यापक शांतीकुमार प्र. सावरकर, उपमुख्याध्यापक राजेंद्र कोरडे, बाजार समितीचे सचिव सोनाने, ठाणेदार संजय इंगळे, मंडळ अधिकारी संजय सावळे, गिल्ली, अंकुश मानकर, पटवारी संघाचे पदाधिकारी तसेच वान प्रकल्पाचे राजेश म्हसाये यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी रॅलीत सहभागी झाले.

तिरंगा हा देशाचा स्वाभिमान, त्याग, शौर्य, एकता आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून ‘देश प्रथम’ हा विचार प्रत्येक नागरिकाच्या मनात रुजविण्याचे आवाहन करण्यात आले. रॅलीतील विद्यार्थ्यांच्या हातातील तिरंगे आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

**जाहीर नोटीस**

दि. १३.८.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, मे. दिलीप ट्रेडर्स चे प्रो. प्रा. मदन इरतकर, यांचे मौजे मेहकर, ता. मेहकर, जि बुलढाणा येथील सर्वे क्र १७८/३-अ, लेआऊट प्लॉट क्र ३७, बाबतचे आधीचे खरेदीखत दि. १७.८.२०१०, दस्त क्र २०७१ हे मुळ खरेदीखत हरवले अनावधानाने गहाळ झाले आहे. व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत भी रीतसर संबंधित पो. स्टे, कडे कार्यवाही केली आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन चौदा (१४) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर किंवा चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

**आपला**
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो. ९८२३०९१३७७

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३३५/२०२६ प्रोसेस नं.१०२९१/२०२६
चौ.ता. २२/०९/२०२६ दिनांक : १०/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्यामलाल सदोरोमल साधवानी २. प्रेरणा नितीनकुमार शबरानी ३. संजय श्यामलाल साधवानी सर्व रा. फ्लॅट नं. २०१, आशिर्वाद पार्क, गीता नगर, अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कांचन श्यामलाल साधवानी
**पत्ता :-** रा. फ्लॅट नं. २०१, आशिर्वाद पार्क, गीता नगर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कांचन श्यामलाल साधवानी यांचे दि. १३/०१/२०२६ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०९/२०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३१७/२०२६ प्रोसेस नं. १०३५१/२०२६
चौ.ता. २८/०९/२०२६ दिनांक : ११/०८/२०२६

**अर्जदार :** १. दादाराव मधुकर इंगळे रा. अमानतपुर, पो. सुकोडा, ता. जि. अकोला. मो. क्र. ७७६९८८६१६०

**विरुध्द**


**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मधुकर लक्ष्मण इंगळे २. मंजूळाबाई मधुकर इंगळे
**पत्ता :-** रा. व्दारा दादाराव मधुकर इंगळे रा. अमानतपुर, पो.. सुकोडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर लक्ष्मण इंगळे यांचे दि. ०१/०६/२०१९ रोजी व मयत मंजूळाबाई मधुकर इंगळे यांचे दि. ११/०९/२०२१ रोजी राहत्या घरी अमानतपूर, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबंब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला




जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २४६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# मंडल यात्रेत दादा-ताई संघर्ष उघड

## मंडल यात्रेचा समारोप, काँग्रेसच्या गटबाजीचे प्रदर्शन

### 'दादा' गैरहजर,'ताई' बेदखल काँग्रेसचा सुपडा साफ, तरी गटबाजीचा माज कायम मंडल यात्रेत

**वर्धा/ रवींद्र लाखे**

पूर्व विदर्भ मंडल यात्रेचा समारोप सेवाग्राम येथील चरखा भवन येथे पार पडला मात्र या कार्यक्रमाने मंडल यात्रेपेक्षा वर्धा काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजीचीच चर्चा अधिक रंगवली. कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिकेवर स्वागताध्यक्ष म्हणून काँग्रेस नेते रणजीत कांबळे यांचे नाव आणि छायाचित्र ठळकपणे झळकत होते. मात्र समारोपाच्या कार्यक्रमाला स्वागताध्यक्षच उपस्थित नसल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले.




मंडल यात्रेच्या माध्यमातून ओबीसी समाजाच्या हक्कांचा आवाज बुलंद करण्याचा दावा काँग्रेसकडून करण्यात आला. उठ ओबीसी जागा हो... अन्यायाचा धागा हो, जय मंडल, जय संविधान अशा घोषणा देत कार्यक्रम पार पडला. प्रदेश ओबीसी काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. यशपाल भिंगे, राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अनिल जयहिंद, विभागीय समन्वयक मोरेश्वर भादे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. मात्र ज्यांच्या नावावर स्वागताध्यक्षपदाची जबाबदारी होती, तेच कार्यक्रमस्थळी दिसले नाहीत,यामुळे उपस्थितांमध्ये कुजबुज सुरू झाली.

विशेष म्हणजे, वर्धा काँग्रेसमध्ये आधीपासूनच दोन गट असल्याची चर्चा आहे. एका बाजूला 'दादा' गट, तर दुसऱ्या बाजूला 'ताई' गट अशी विभागणी कार्यकर्त्यांच्या चर्चेत आहे. दादाची राजकीय दादागिरी कायम ठेवण्यासाठी ताईला पुढे येऊ दिले जात नाही, अशी नाराजी काही कार्यकर्ते खासगीत व्यक्त करीत आहेत. परिणामी दोन्ही गटांतील कार्यकर्त्यांमध्येच अस्वस्थता निर्माण झाल्याचे चित्र आहे.

मंडल यात्रेच्या समारोपासाठी तयार करण्यात आलेल्या प्रसिद्धी साहित्यावर स्वागताध्यक्ष म्हणून रणजीत कांबळे यांचे नाव आणि फोटो असल्याने दुसऱ्या गटातील नेतृत्वाचे नाव-छायाचित्र झाकोळल्याची चर्चा होती. मात्र त्यानंतर नाव आणि फोटो असतानाही स्वागताध्यक्षांचीच गैरहजेरी राहिल्याने या राजकीय समीकरणाला आणखी वेगळे वळण मिळाले.

वर्धा जिल्ह्यात काँग्रेसची राजकीय ताकद घटत असतानाही गटबाजीचा अहंकार मात्र संपत नसल्याची भावना कार्यकर्त्यांतून व्यक्त होत आहे. निवडणुकीतील पराभवातून धडा घेऊन पक्षाला पुन्हा उभे करण्याऐवजी नेत्यांच्या प्रतिष्ठेच्या लढाईत सामान्य कार्यकर्ता भरडला जात असल्याची खंत अनेकांनी व्यक्त केली. मंडल यात्रा ओबीसींच्या हक्कांसाठी होती, पण समारोपानंतर चर्चेचा विषय ठरला ते 'दादा कुठे गेले आणि 'ताईला का रोखले हाच त्यामुळे वर्धा काँग्रेसमधील अंतर्गत धुसफूस आता चार भिंतींच्या आत न राहता सार्वजनिक व्यासपीठावर येऊ लागल्याचे चित्र आहे.

## परवानगीविना रास्ता रोको; ४८ जणांवर गुन्हा

**हिंगणघाट** - नंदोरी मार्गावर पूर्वपरवानगी न घेता रास्ता रोको आंदोलन केल्याप्रकरणी ४८ जणांविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ही कारवाई १२ ऑगस्ट रोजी करण्यात आली. विविध मागण्यांसाठी आंदोलनकर्त्यांनी हिंगणघाट-नंदोरी मार्गावर एकत्र येत रास्ता रोको केला.आंदोलनासाठी प्रशासनाची पूर्वपरवानगी घेण्यात आली नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. तसेच जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोपही करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली. त्यानंतर आंदोलनात सहभागी असलेल्या ४८ जणांविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सामना करावा लागला. या प्रकरणाचा पुढील तपास हिंगणघाट पोलिस करीत असून, सहभागी व्यक्तींची भूमिका तपासली जात आहे.

## खरगे यांच्या अपमानावर काँग्रेस आक्रमक, कठोर कारवाईची मागणी

**वर्धा/ जनमाध्यम**

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासंदर्भात उत्तराखंड येथे घडलेल्या कथित अपमानास्पद घटनेचे पडसाद आता वर्ध्यात उमटले आहेत. या घटनेची सखोल व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीने केली आहे. जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सुनील कोल्हे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

काँग्रेसने या घटनेला केवळ एका राष्ट्रीय नेत्याचा अपमान न मानता संविधानिक मूल्यांवरील आघात असल्याचे म्हटले आहे. समता,सामाजिक न्याय,बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा ही भारतीय संविधानाची मूलभूत मूल्ये आहेत. त्यामुळे जातीय भेदभाव, सामाजिक अपमान अथवा संविधानविरोधी मानसिकतेला कोणत्याही परिस्थितीत खतपाणी मिळता कामा नये,अशी भूमिका काँग्रेसने निवेदनातून मांडली.

घटनेमागचे सत्य बाहेर काढा, दोषींना धडा शिकवा' अशी आक्रमक भूमिका घेत काँग्रेसने प्रशासनाकडे पाच प्रमुख मागण्या केल्या आहेत. घटनेची निष्पक्ष चौकशी करावी, दोषी व्यक्तींची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, कथित जातीय भेदभाव अथवा संविधानविरोधी मानसिकतेची चौकशी करावी, भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात आणि संविधानिक मूल्यांच्या संरक्षणासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी करण्यात आली.या प्रकरणाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कारवाई करावी, अन्यथा संविधानिक मूल्यांच्या रक्षणासाठी काँग्रेसला अधिक आक्रमक भूमिका घ्यावी लागेल, असा सूर निवेदनातून व्यक्त करण्यात आला.

## संक्षिप्त

### पालकमंत्र्यांच्या हस्ते आज ध्वजारोहण

**वर्धा-** भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन समारंभ शनिवार १५ ऑगस्ट रोजी साजरा करण्यात येणार असून राज्याचे गृह, गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण होणार आहे.ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय समारंभ शनिवारी १५ ऑगस्ट रोजी सकाळी ९.०५ वाजता पोलिस मुख्यालय, कवायत मैदान वर्धा येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

० ० ० ०

### अंगणातल्या दोन शेळया चोरीला

**हिंगणघाट**-तालुक्यातील चिकमोह येथे अंगणात बांधलेल्या दोन शेळया अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना ११ ऑगस्ट रोजी उघडकीस आली. चिकमोह येथील श्रीकांत सोळटे यांनी आपल्या शेळया नेहमीप्रमाणे घराच्या अंगणात बांधल्या होत्या. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी संधी साधून दोन शेळया चोरून नेल्या. सकाळी सोळटे यांच्या निदर्शनास शेळया गायब असल्याचे आले. त्यांनी परिसरात शोध घेतला; मात्र शेळ्यांचा ठावठिकाणा लागला नाही. चोरी गेलेल्या दोन्ही शेळ्यांची एकूण किंमत सुमारे नऊ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. घटनेची माहिती हिंगणघाट पोलिसांना देण्यात आली. सोळटे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. परिसरातील संशयित हालचाली तसेच उपलब्ध माहितीच्या आधारे पोलिसांकडून चोरट्यांचा शोध घेण्यात येत आहे. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

० ० ० ०

### प्रतिबंधित तंबाखूसह पॅकिंग मशिन जप्त

**पुलगाव**-येथे अन्न व औषध प्रशासन विभागाने कारवाई करीत प्रतिबंधित सुगंधित तंबाखूसह पॅकिंग मशिन, वजनकाटा आणि रिकामे टिनाचे डबे असा २२ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पुलगाव येथील सनी श्यामलाल आहुजा याच्याकडे प्रतिबंधित तंबाखूचा साठा असल्याची माहिती मिळाल्यानंतर अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने त्याच्या ठिकाणी छापा टाकला. तपासणीदरम्यान प्रतिबंधित सुगंधित तंबाखू, पॅकिंग मशिन, वजनकाटा तसेच रिकामे टिनाचे डबे आढळून आले. पथकाने पंचनामा करून सर्व साहित्य ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत २२ हजार ४७० रुपये असल्याचे सांगण्यात आले. या कारवाईनंतर पुलगाव पोलिस ठाण्यात सनी आहुजा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. प्रतिबंधित तंबाखूच्या विक्री व साठवणुकीबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

० ० ० ०

### चार बैलांची निर्दय वाहतूक

**सिंदी (रेल्वे)**-नागपूर-वर्धा मार्गावरील सेलडोह शिवारात वाहनातून चार बैलांची दाटीवाटीने आणि निर्दयतेने वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध सिंदी (रेल्वे) पोलिसांनी कारवाई केली. पोलिस गस्तीवर असताना एमएच ३८ एक्स ४०७८ क्रमांकाच्या वाहनातून जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सेलडोह मार्गावर नाकाबंदी करून वाहन थांबविले. तपासणी केली असता वाहनामध्ये चार बैल दाटीवाटीने कोंबलेले आढळून आले. संबंधितांनी हे बैल ब्रह्मपुरी येथील बाजारातून खरेदी करून वाशिम येथे नेत असल्याचे पोलिसांना सांगितले. मात्र वाहतुकीदरम्यान जनावरांना पुरेशी जागा नसल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी सुरेश भुन्नर, रा. खेरर्डा, ता. जि. हिंगोली आणि अरुण सूर्यवंशी, रा. कोलार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सिंदी (रेल्वे) पोलिस करीत आहेत.

० ० ० ०

### प्रकृती बिघडल्याने इसमाचा मृत्यू

**पुलगाव**-प्रकृती अचानक बिघडल्याने ५६ वर्षीय इसमाचा मृत्यू झाल्याची घटना पुलगाव येथे १२ ऑगस्ट रोजी घडली. चरणदास विठोबाजी ठाकरे, रा. पुलगाव, असे मृताचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चरणदास ठाकरे यांची अचानक प्रकृती बिघडली. त्यानंतर कुटुंबीयांनी त्यांच्याकडे लक्ष देत उपचारासाठी नेण्याची तयारी केली. मात्र प्रकृती अधिक खालावल्याने त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पुलगाव पोलिसांनी घटनास्थळी आवश्यक कार्यवाही केली. ठाकरे यांच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झालेले नसून, प्रकृती बिघडल्यामुळे मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. घटनेबाबत आवश्यक तपासणी व कायदेशीर प्रक्रिया पोलिसांकडून करण्यात येत आहे. पुढील तपास पुलगाव पोलिस करीत आहेत.

## गो ग्रीन' चा स्वीकार : वर्धा जिल्ह्यात वीज ग्राहकांची वर्षभरात ४८ लाखांची बचत

**वर्धा/ जनमाध्यम**

पर्यावरण रक्षणाचा वसा घेत वर्धा जिल्ह्यातील महावितरणच्या वीज ग्राहकांनी एक आदर्श आणि ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. महावितरणच्या 'गो ग्रीन' या लोकप्रिय योजनेला वर्धेकरांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला असून,कागदी बिलांना पूर्णपणे फाटा देत डिजिटल बिलांचा स्वीकार केला आहे.या पर्यावरणपूरक आणि दूरगामी निर्णयामुळे जिल्ह्यातील जागरूक वीज ग्राहकांनी वर्षाला तब्बल ४८ लाख १८ हजार १२० रुपयांची घसघसीत बचत केली आहे.

पर्यावरण संवर्धनाला थेट आर्थिक फायद्याची जोड देणाऱ्या या योजनेअंतर्गत,'गो ग्रीन'चा पर्याय स्वीकारणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या पहिल्याच बिलात संपूर्ण वर्षासाठीची १२० रुपयांची सवलत (१० रुपये प्रति महिना) एकत्र देण्यात येत आहे. या अत्यंत आकर्षक आणि ग्राहककेंद्री योजनेमुळे नागपूर जिल्ह्यात डिजिटल बिलांचा स्वीकार करणाऱ्या ग्राहकांची संख्या वेगाने वाढून आता ४० हजार १५१ वर पोहोचली आहे.

पूर्वी या योजनेत सहभागी होणाऱ्या ग्राहकांना दरमहा १० रुपयांची सवलत मिळायची. परंतु, जानेवारी २०२५ पासून महावितरणने नियमात बदल करत, गो ग्रीनचा पर्याय निवडल्याच्या पहिल्याच बिलात पुढील १२




महिन्यांसाठीची संपूर्ण १२० रुपयांची सवलत एकत्र देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. या बदलामुळे वर्धा जिल्ह्यात जानेवारी २०२५ मध्ये ३ हजार २०४ असलेले ग्राहक जानेवारी २०२६ मध्ये ४ हजार ३५२ पर्यंत पोहोचले आणि आज ही संख्या तब्बल ४० हजार १५१ च्या टप्प्यावर पोहोचली आहे.

'गो ग्रीन' योजनेमुळे ग्राहकांना अनेक मोठे फायदे मिळत आहेत. नोंदणीकृत ईमेल,मोबाईलवर एसएमएस आणि व्हॉट्सअॅपद्वारे दरमहा अचूक वीजबिल अगदी वेळेवर उपलब्ध होते. हे बिल मोबाईल किंवा संगणकात सुरक्षित ठेवता येते, तसेच आवश्यकतेनुसार केव्हाही डाऊनलोड किंवा रंगीत प्रिंट काढण्याची सुविधाही उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, बिलाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत ऑनलाइन भरणा केल्यास ग्राहकांना अतिरिक्त एक टक्क्यांची सवलत देखील मिळत आहे. या पर्यावरणपूरक प्रवासात सहभागी होणे अतिशय सोपे असून, ग्राहकांनी महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर किंवा मोबाईल अॅपवर जाऊन आपला ग्राहक क्रमांक सबमिट करायचा आहे. याद्वारे छापील बिलाची प्रत रद्द होऊन नोंदणीकृत मोबाईल व ईमेलवर दरमहा डिजिटल बिल पाठविण्यात येते.

निसर्गाचे जतन आणि घसघसीत आर्थिक बचत साधणाऱ्या या सुवर्णसंधीचा लाभ वर्धा जिल्ह्यातील जास्तीत जास्त वीज ग्राहकांनी घ्यावा, कागदी बिलांचा मोह टाळून 'गो ग्रीन'चा पर्याय स्वीकारावा आणि पर्यावरण रक्षणात आपला खारीचा वाटा उचलावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

### जुन्या वादातून मारहाण

**कारंजा (घा)** - एक दिवसापूर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी देत इसमास मारहाण केल्याची घटना कारंजा (घाडगे) तालुक्यातील गवंडी येथे १२ ऑगस्ट रोजी घडली. गवंडी येथील पुंडलिक डोंगरे (६१) यांचा प्रमोद चौधरी याच्यासोबत एक दिवसापूर्वी वाद झाला होता. याच वादातून चौधरी याने डोंगरे यांना पुन्हा शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्यांना जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर डोंगरे यांनी कारंजा (घाडगे) पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी प्रमोद चौधरी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. घटनेमागील कारण तसेच वादाची पार्श्वभूमी तपासली जात आहे.

## आरोग्य शिबिराचा गाजावाजा; साहूरकर मात्र उपचाराविना

### आमदारांच्या घोषणांना वाहतुकीची सोय नसल्याने खो, ३० किलोमीटर अंतरामुळे नागरिकांची गैरसोय

**आष्टी/ शहीद जनमाध्यम**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभर आरोग्य अमृत महोत्सवांतर्गत महाआरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. आर्वी विधानसभा मतदारसंघातही दोन दिवसीय आरोग्य शिबिराचा मोठा गाजावाजा करण्यात आला. मात्र शिबिराच्या ठिकाणापासून दूर असलेल्या साहूर आष्टी परिसरातील नागरिकांसाठी वाहतुकीची कोणतीही सुविधा उपलब्ध न केल्याने शासनाच्या आरोग्य उपक्रमाचा लाभ नेमका कुणाला मिळाला, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

आर्वी विधानसभा मतदारसंघात आरोग्य शिबिराचे



आयोजन करण्यात आले असले तरी साहूर आष्टी परिसरातील नागरिकांना शिबिराच्या ठिकाणी पोहोचण्यासाठी मोठे अंतर पार करावे लागले. शासनाच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी आणि उपचाराची संधी उपलब्ध असताना केवळ वाहतुकीच्या अभावामुळे नागरिकांना त्याचा लाभ घेता आला नाही.

दरम्यान, साहूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची कमतरता हा स्वतंत्र गंभीर प्रश्न आधीच निर्माण झाला आहे. या आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात सुमारे ३० ते ३२ गावे असून अनेक आरोग्य उपकेंद्रे आहेत. मात्र रिक्त पदांमुळे आरोग्य यंत्रणेवर ताण वाढला आहे.

एकीकडे आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रसिद्धी केली जाते, तर दुसरीकडे दुर्गम भागातील नागरिकांना शिबिरापर्यंत पोहोचण्यासाठी साधी वाहतूक सुविधा उपलब्ध करून दिली जात नाही. त्यामुळे केवळ शिबिराचा गाजावाजा करून आरोग्यसेवा सर्वसामान्यांच्या दारात पोहोचणार आहे का, असा प्रश्न साहूर आष्टी परिसरातील नागरिक उपस्थित करीत आहेत.

आ.सुमित वानखेडे यांनी या भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन साहूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्यासाठी पाठपुरावा करावा तसेच भविष्यातील आरोग्य शिबिरांसाठी दुर्गम भागातील नागरिकांना वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### आठवडी बाजारात संशयास्पद वावर

**समुद्रपूर**-येथील आठवडी बाजार परिसरात संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या तरुणाविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली. कुणाल परचाके (२५), रा. मुरादपूर, असे कारवाई करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. समुद्रपूर पोलिसांचे पथक परिसरात गस्त घालत असताना आठवडी बाजार परिसरात एक इसम संशयास्पदरीत्या वावरत असल्याची माहिती मिळाली. घटनास्थळी पोहोचून तरुणाला ताब्यात घेतले. विचारपूस केली असता त्याने समाधानकारक माहिती न देता उडवाउडवीची उत्तरे दिल्याचे पोलिसांनी सांगितले. कुणाल परचाके याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला

## ३९ हजार २३६ कुटूंबांचे आवास प्लस सर्वेक्षण पूर्ण

### ग्रामसभेत लाभार्थी यादीला मंजूरी-पराग सोमण

**वर्धा/ जनमाध्यम**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत जिल्ह्यातील ५२१ ग्रामपंचायतीमधील बेघर व कच्च्या घरात राहणाऱ्या कुटूंबांचे आवास प्लस २०२४ सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमार्फत सहाय्यक सर्वेक्षण तसेच स्वयं सर्वेक्षणाच्या माध्यमातून जिल्ह्यातील तब्बल ३९ हजार २३६ कुटूंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. या कुटूंबांच्या मसुदा प्रतिक्षा यादीला ग्रामपंचायत स्तरावर १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या ग्रामसभांमध्ये कायमस्वरुपी मान्यता दिली जाणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी सांगितले. आर्वी तालुक्यातील ५ हजार ८४३ कुटूंब, आष्टी ३ हजार ४६९, देवळी ३ हजार ३६४, हिंगणघाट ४ हजार ९८३, कारंजा ३ हजार ६७०, समुद्रपूर ६ हजार ९३६, सेलू ४ हजार १२३ व वर्धा तालुक्यातील ६ हजार ८४८ कुंटूबाचा सर्वेक्षणात समावेश आहे.

पक्के घर, दोनपेक्षा अधिक खोल्या असलेल्या घरांसह विविध बारा निकषांनुसार कुटुंबे वगळली जाणार आहेत. तीन किंवा चारचाकी वाहन असणारे, यांत्रिकीकरण केलेली तीन किंवा चारचाकी कृषी उपकरणे, ५० हजार रुपये किंवा त्याहून अधिक क्रेडिट मर्यादेचे किसान क्रेडिट कार्ड, कुटुंबातील सदस्य शासकीय कर्मचारी असणे, नोंदणीकृत बिगरकृषी उद्योग असणे.

## माजी विद्यार्थ्याची शाळेसाठी सामाजिक बांधिलकी

### विद्यार्थ्यांना मोफत जोडे-सॉक्स

**वर्धा**-माजी विद्यार्थी म्हणून शाळेप्रती असलेली सामाजिक बांधिलकी जपत निर्भय किनगांवकर यांनी महाराणा प्रताप नगरपरिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत जोडे व सॉक्सचे वाटप केले. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांच्या सामाजिक आवाहनाला प्रतिसाद देत हा उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या मूलभूत गरजांकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. याच भावनेतून किनगांवकर यांनी आपल्या माजी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पुढाकार घेतला. मोफत पादत्राणे मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सामाजिक



उपक्रमातून विद्यार्थ्यांना मिळालेली ही मदत त्यांच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासोबतच त्यांचा आत्मविश्वास वाढविणारी ठरली.

या उपक्रमाबद्दल उपस्थित मान्यवरांनी निर्भय किनगांवकर यांचे कौतुक केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शाम भेंडे, अभिजित चौधरी, शशिकांत विरखेडे, मिंग्लिश मंत्रा अकॅडमीचे चेतन ठाकरे, शाळेचे मुख्याध्यापक मनोहर भीमराव चव्हाण, सहाय्यक शिक्षक शिवराज सखाराम भिसे, सेवानिवृत्त शिक्षिका प्रणिता नागलकर, पृथा तसेच राम तायडे आदी उपस्थित होते.

दरम्यान, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश, पादत्राणे व अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दानशूर व्यक्ती आणि माजी विद्यार्थ्यांनी पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले. शाळेने दिलेले संस्कार समाजासाठी उपयोगी ठरविणे, हीच माजी विद्यार्थ्यांची खरी सामाजिक बांधिलकी असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर P0505716 वरील माझे SYED NATIQUE ALI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व बँक पासबुक वरील NATIQUE SADIQUE ALI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-पुलगाव ता देवळी जिल्हा वर्धा 442302**

**नावात बदल**

माझे नाव MUJIBUR RAHEMAN MAHEBOOB KHAN असे आहे. आधार कार्ड व पॅन कार्ड वर हेच नाव आहे, पण पासपोर्ट मध्ये MUJEBUR RAHEMAN KHAN MAHEBOOB KHAN आहे.पण मला MUJIBUR RAHEMAN MAHEBOOB KHAN या नावाने ओळखले जाते,

**पत्ता: महात्मा फुले वार्ड हिंगणघाट**

**नावात बदल**

माझे पूर्वी NALU GORKHANATH NAGRALE असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील NALINI DNYANDEV CHIMURKARनाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-मास्टर कॉलनी पेटकर लेआऊट सावंगी मेघे वर्धा ४४२००१**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २५९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३८८/२०२६ ने.ता.२८.०९.२०२६

**अर्जदार :**
1. **खुर्शिदाबानो कलिम खान,** वय ५८ वर्षे, व्यवसाय - घरकाम रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
2. **मजिद नायक अजीज नायक,** वय ४८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
3. **जमीर नायक अजीत नायक,** वय ४७ वर्षे, व्यवसाय - मजुरी
अर्जदार क्र.२ व ३ रा.शिरजगाव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक अजीत नायक शन्नु नायक** यांचा **मृत्यू दि.०५/०५/२०२६** रोजी रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक बिस्मील्ला बी अजीज नायक** यांचा मृत्यू **दि.०४/०४/२०१०** रोजी रा. शिरजगांव कसबा,ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक शानु बी शन्नु नायक** ही खुप वर्षापूर्वी मृत्यू पावलेली आहे.

त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३८८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि.१३.०८.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.बी.कळदाते सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज क्र.१४५२/२०२६**
**दिपक व इतर विरुध्द निरंक**
**पुढील ता.१८.०८.२०२६**

**अर्जदार :**
1. **Dipak Madhukarrao Ayade**, Age 75 Yrs. Occu.: Nil R/o. Balaji Plot, Amravati
2. **Aditya Kiran Ayade**, Aged 32 Yrs. Occu.: Labour
3. **Prutha Kiran Ayade**, Age 33 Yrs. Occu.: Labour
2 to 3 R/o. Near Sitarambada Mandir, Balaji Plot, Amravati

**विरुध्द**
**NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सावित्रीबाई प्रल्हाद आयदे** हे दिनांक **१२.०२.१९८०** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार दिपक व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **दिपक व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज क्र.१६०५/२०२६**
**गणेश विरुध्द निरंक**
**पुढील ता.१५.०९.२०२६**

**अर्जदार :**
1. **Ganesh Madhukarrao Anasane**
Age 60 Yrs. Occu.: Labour,
R/o. Near Gopalkrushna Mangal Karyalaya,
Deshpande Plot, Badnera Road, Rukhmini Nagar,
Amravati, Tq. & Dist. Amravati

**विरुध्द**
**NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मधुकरराव शंकरराव अनासाने** हे दिनांक ०८.०७.२००४ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे आणि वच्छलाबाई मधुकरराव अनासाने हया दि. २३.०९.२०२० रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **गणेश विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **गणेश विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज क्र.१५४५/२०२६**
**Vinod Krushnrao Yawale+2 Versus NIL**
**पुढील ता.०७.०९.२०२६**

**अर्जदार :**
1. **Vinod Krushanrao Yawale**, Age 61 Yrs. Occu.: Agri.
2. **Bhavesh Vinodrao Yawale**, Aged 30 Yrs. Occu.: Private Job
3. **Rinkesh Vinodrao Yawale**, Age 24 Yrs. Occu.: Student
1 to 3 R/o. Yawali Shahid, Tq. & Dist. Amravati

--VERSUS --

**Non- Applicant - NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Ranjani Vinodrao Yawale,** हया दिनांक २३.०३.२०२६ रोजी **Amravati** येथे मयत झाल्या. अर्जदार **Vinod Krushanrao Yawale + others** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Vinod Krushanrao Yawale + others** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---


## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**


## CHANGE IN NAME

(Given name) - Md Muzammil Md Shamim
(Old name) TO
Mohammad Muzammil Mohammad Shameem
(New Name)
I will be known by my new name **Mohammad Muzammil Mohammad Shameem** for all purpose in future

**Adress -** Dharmaal pura, chandur Bazar, TQ Chandur Bazar, Amravati rural
444704 Maharashtra India

---

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्री किरण विठ्ठलराव ढोकणे, रा. कल्याण नगर, राजापेठ अमरावती हे खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मालमत्ता श्रीमती निता राजेश पटेल (केवट) व इतर रा. कल्याण नगर, राजापेठ अमरावती यांच्याकडून खरेदी / कराराद्वारे प्राप्त करण्याचे ठरविले असून, उभयतांमध्ये सदर मालमत्तेच्या व्यवहार (इसार) झाला आहे.

मालमत्तेचा तपशील

जिल्हा अमरावती, तालुका अमरावती, मौजे राजापेठ येथील सर्व्हे नंबर ११ ,प्लॉट नंबर ७२, क्षेत्रफळ ६०० चौ. फू, मालमत्ता. सदर नमूद मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, वारसा हक्क, दान, गहाण, लीज, अन्नवस्त्र, बक्षीसपत्र, अथवा कोर्टाचा स्टे/ वाद किंवा कोणत्याही बँकेचा/संस्थेचा बोजा किंवा इतर कोणताही प्रभार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर माझ्याशी लेखी स्वरूपात, आवश्यक त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह संपर्क साधावा. मुदतीमध्ये कोणाचाही कोणताही आक्षेप किंवा हरकत न आल्यास, सदर मालमत्ता ही सर्व प्रकारच्या बोजांपासून, वादांपासून व प्रभारांपासून मुक्त आहे असे समजून माझे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेला कोणताही आक्षेप किंवा दावा माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण: अमरावती

**ॲडव्होकेट: एस. आर. देशमुख**
**पत्ता: १०४ साईप्रसाद, साई हेरिटेज, साई नगर अमरावती, मोबाईल नंबर :८४०८०८१८३७**

---

# अमरावती जिल्हा सहकारी बोर्ड लि., अमरावती
## कॅम्प रोड, अमरावती

**जावक क्र.९/२०२६-२७** **दिनांक १४.०८.२०२६**

## वार्षिक साधारण सभेची नोटीस

अमरावती जिल्हा सहकारी बोर्डाच्या सर्व सह.संस्था व वैयक्तिक सभासदांना कळविण्यात येते की, बोर्डाची वार्षिक सर्वसाधारण सभा अमरावती येथे मंगळवार दिनांक ३१.०८.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता स्व.बापुसाहेब काळबांडे स्मृति सभागृह (जिल्हा मध्य.सह.बॅंक परिसर) कॅम्प रोड, अमरावती सह बोर्डाच्या कार्यालयात होणार आहे. तरी सभेला आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेची विषय सुची-**

१. मागील वार्षिक साधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे
२. सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल वाचून मंजूर करणे
३. सन २०२५-२६ चे वार्षिक हिशोब पत्रकास मंजूरी देणे
४. सन २०२५-२६ चे अंकेक्षण अहवालाची नोंद घेवून दोष दुरुस्ती अहवालास मंजूरी देणे
५. बोर्डाचे सन २०२६-२७ चे लेख परिक्षण करण्याकरीता लेखा परिक्षकाची नियुक्ती करणेबाबत विचार करणे
६. सन २०२५-२६ मध्ये पार पाडलेले सह.शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाचा आढावा घेणे
७. बोर्डाच्या उपस्थितीमध्ये संचालक मंडळाने शिफारस केलेल्या किरकोळ दुरुस्ती व मानद सचिव पद निर्माण करण्याकरीता मंजुरात देणेबाबत.
८. मा.अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे

**संजय प्र.वानखडे (मार्डीकर)**
**अध्यक्ष**
**अम.जिल्हा सहकारी बोर्ड लि.अमरावती**

**टिप -** कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ही सभा त्याच ठिकाणी व त्याच दिवशी अर्ध्या तासाने घेतली जाईल. या सभेला गणपुतीची गरज राहणार नाही.

**सुचना-**
१) बोर्डाचे सभासद संस्थंना वार्षिक साधारण सभेस एक प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार आहे. सभेला उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधीला मतदानाचा अधिकार देणाऱ्या संस्थेच्या ठरावाची प्रत दि.२२.०८.२०२६ रोजी पर्यंत मिळेल अशा रितीने बोर्डाकडे पाठवावी.
२) सभेस येणाऱ्या कोणत्याही सभासदास प्रवास भत्ता व ईतर भत्ता बोर्डाकडून मिळणार नाही.
३) बोर्डाचा वार्षिक अहवाल बोर्डाचे नोटीस बोर्डावर लावण्यात आला आहे.

**आजीव वैयक्तिक सभासदांची सभेची नोटीस**

महाराष्ट्र सह.संस्था नियम क्र.**२२** प्रमाणे आजीव वैयक्तिक सभासदास त्याचे प्रतिनिधी निवडावे लागतात. त्यांची निवड यादी असेल अशा प्रतिनिधीना वार्षिक साधारण सभेत मतदानाचा अधिकार राहील. ईतर वैयक्तिक सभासदांना सभेला हजरराहून चर्चा करु शकतात. मात्र ते मत देऊ शकणार नाहीत. आजीव सभासदांतर्फे या सभेसाठी प्रतिनिधी निवडायचे आहे.

बोर्डाचे आजीव सभासदांना विनंती की त्यांनी प्रतिनिधी निवडण्यासाठी मंगळवार दि.३१.०८.२०२६ रोजी ११.०० वाजता होणाऱ्या सभेसाठी बापुसाहेब काळबांडे स्मृति सभागृह, जिल्हासह.बोर्ड लि., अमरावती, कॅम्प रोड, अमरावती येथे उपस्थित रहावे.

**संजय प्र.वानखडे (मार्डीकर)**
**अध्यक्ष**
**अम.जिल्हा सहकारी बोर्ड लि.अमरावती**

**उपविधी दुरुस्ती**

| उपविधीतील शब्दरचना | दुरुस्ती येणारी शब्दरचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|
| **३ व्याख्या** | **३ व्याख्या** | |
| ११ - पदाधिकारी - पदाधिकारी म्हणजे उपविधी क्र.९ अनुसार निवडून आलेले बोर्डाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष | ११ - पदाधिकारी - पदाधिकारी म्हणजे उपविधा क्र.९ अनुसार निवडून आलेले बोर्डाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, मानद सचिव | मानद सचिवाचे मार्फत दैनंदिन व्यवहार करणे सोईचे होईल |
| ९ - संचालक समिती बोर्डाची संचालक समिती खालीलप्रमाणे राहील ९-अ निवडून आलेले प्रतिनिधी | ९ - संचालक समिती बोर्डाची संचालन समिती खालीलप्रमाणे राहील ९-अ निवडून आलेले प्रतिनिधी | जिल्हास्तरीय संस्था अल्प प्रमाणात सभासद असल्या मुळे प्रतिनिधीत्वाकरीता |

| अ.क्र. | संस्था प्रकार | प्रतिनिधी संस्था |
|---|---|---|
| २ | जिल्हास्तरीय, ईतर वैयक्तिक (प्रत्येकी एक) | ३ |

| अ.क्र. | संस्था प्रकार | प्रतिनिधी संस्था |
|---|---|---|
| २ | जिल्हास्तरीय, ईतर वैयक्तिक (प्रत्येकी एक) | ३ |

**संजय प्र.वानखडे (मार्डीकर)**
**अध्यक्ष**
**अम.जिल्हा सहकारी बोर्ड लि.अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**जाहीरनामा/सायटेशन**

**किरकोळ अर्ज क्र.१६०२/२०२६**
**रुपाली अधिक दोन विरुध्द निरंक**
**पुढील ता.१५.०९.२०२६**

**अर्जदार :**
1. **Rupali Subhash Marodkar**, Age 42 Yrs. Occu.: Household
2. **Kunal Subhash Marodkar**, Age 22 Yrs. Occu.: Student
3. **Aaradhya Subhash Marodkar** (Minor), Age 14 Yrs. Occu.: Student **(Through its Legal Guardian Mother, Rupali Subhash Marodkar)** All 1 to 3 R/o. Near Bhante Maharaj Temple, Amba Vihar, H.V. Nagar, Amravati, Tq. & dist. Amravati

**विरुध्द** - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सुभाष रामभाऊ मरोडकर** हे दिनांक ०३.०४.२०२६ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **रुपाली अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रुपाली अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## उद्यान विभाग

जा.क्र.अमनपा/उ.वि./२६/२०२६ दिनांक १४.०८.२०२६

## जाहीर सूचना

अमरावती महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संरक्षण व संवर्धन अधिनियम १९७५ व त्यातील सुधारणा अंतर्गत एक वृक्ष प्राधिकरण समिती असणे बंधनकारक आहे. त्यानुसार या क्षेत्रातील खालील पात्रता असणाऱ्या नागरिकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पात्रता**

१) अर्जदार अमरावती शहराचा रहिवासी असावा
२) B.Sc.(Agri.) B.Sc.Horticulture/B.Sc.Forestry/B.Sc.Botony Environmental Science किंवा संबंधित विषयातील पदवी/प्रशिक्षण असणाऱ्यास प्राधान्य
३) वृक्ष संवर्धन, उद्यान विद्या, पर्यावरण किंवा सामाजिक उपक्रमाचा अनुभव असल्यास प्राधान्य
४) वृक्ष संवर्धन विषयात प्रत्यक्ष काम करण्याची ईच्छा व अनुभव असावा
५) अर्जदाराने महानगर पालिकेच्या वृक्ष प्राधिकरणासोबत स्वयंसेवी स्वरुपात कार्य करण्यास सहमती दर्शविणे आवश्यक राहील.

अशा पात्र नागरिकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर अर्जाची छानणी करुन निवड करण्यात येईल. निवड झालेल्या सदस्यांना मनपा तर्फे मानधन किंवा मिटींग भत्ता व तत्सम शुल्क मिळणार नाही. सामाजिक कार्य करण्याची आवड असणाऱ्या नागरिकांनी अर्ज दिनांक २५.०८.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उद्यान विभाग कार्यालय महानगरपालिका, अमरावती येथे सादर करावेत असे आवाहन महानगर पालिका प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

**स्वा/-**
**अतिरिक्त आयुक्त-II**
**महानगरपालिका, अमरावती**

---

## जाहीर सुचना

**श्री बाळासाहेब संस्थान, रिध्दपुर, ता.मोर्शी, जि.अमरावती,र.नं.ए-२८०/अमरावती या संस्थानच्या मंदिर इमारतीचे नविन बांधकाम करावयाचे असल्याने इमारतीतील जुने सागवान लाकुड, टिनपत्रे, इतर साहित्य म्हणजेच इमारतीतील जिर्ण इमला विक्री करावयाचा आहे. तरी ईच्छुक व्यक्ती/फर्म यांनी खालील पत्त्यावर दि. १९.०८.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत संपर्क साधावा.**

**दिनांक : १४.०८.२०२६**
**रिध्दपुर**

**सही/-**
**रमेश नारायणदास मुरके**
**अध्यक्ष**

**संपर्कासाठी पत्ता :-**
**रमेश नारायणदास मुरके**
**रा.मुधोळकर पेठ, अमरावती**
**ता.जि.अमरावती**
**मो.नं. ८१४९९४२२११**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५५३/२०२६
**सलीमाबी+३ -वि- निरंक**
पुढील ता.०१.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Salima Bee Rahim Khan, Age about 70 Yrs. Occu.: Housewife
2. Kalim Khan Rahim Khan, Age about 50 Yrs. Occu.: Labour
3. Kadar Khan Rahim Khan, Age about 40 Yrs. Occu.: Labour
4. Aman Khan Rahim Khan, Age about 38 Yrs. Occu.: Labour
All R/o Near Miskin Shaha Masjid, Hati Pura, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Rahim Khan Ismail Khan हे दिनांक 17.07.2025 रोजी Amravati, Tq.Dist.Amravati येथे मयत झाले. अर्जदार Salima Bee Rahim Khan + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Salima Bee Rahim Khan + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१०.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 91/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **वि.वि.मॉ दर्गा चॅरिटेबल ट्रस्ट इमामवाडा वार्ड नं.६ चांदूर बाजार जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.सैय्यद युसूफ सैय्यद करीम**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **११.०८.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 124/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.लक्ष्मी व्यंकटेश विश्वसेवा चॅरिटेबल ॲण्ड रिलिजीयस ट्रस्ट २३-२४, कृष्णकुंज योगीराज नगर, तपोवन, अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.प्रविण कृष्णराव चावजी**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **०३.०८.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**(डी.बी.गायकवाड)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५९७/२०२६
**संतोष अधिक पाच -वि- निरंक**
पुढील ता.१९.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Santosh Digambarrao Khare, Age 65 Yrs. Occu.: Labour R/o Civil Line, Daryapur, Tq. Daryapur, Dist. Amravati.
2. Raju Digambarrao Khare, Age 64 Yrs. Occu.: Labour R/o Walgaon, Tq. Dist. Amravati.
3. Sanjay Digambarrao Khare, Age 57 Yrs. Occu.: Labour R/o Brahmin Wadi, Bhaji Bazar, Mahajan Galli, Amravati.
4. Meena Sureshrao Khare, Age 61 Yrs. Occu.: Household R/o Ward No.3, Sharad Pawar Colony, Walgaon, Amravati.
5. Gaurav Sureshrao Khare, Age 33 Yrs. Occu.: Labour R/o Chandur Bazar Road, Walgaon, Tq.Dist.Amravati.
6. Sudha Rameshrao Bhuyar, Age 70 Yrs. Occu.: Household R/o At Kotha Fattepur, Po.Pimpalkhuta, Tq.Dist.Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत डिगांबर नरसाजी खरे** हे दिनांक 27.01.1994 रोजी व मयत **यमुनाबाई डिगांबर खरे** ही दिनांक **०४.०१.२०१९** रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **संतोष** + 5 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संतोष** + 5 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१५७१/२०२६
**प्रणिता सुनिल चिद्दरवार+३ -वि- निरंक**
पुढील ता.०३.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Pranita Sunil Chiddarwar (Wife) Age 59 Yrs. Occu.: Housewife R/o Prabhat Colony, Near Gajanan Maharaj Mandir, Amravati.
2. Sneha Manoj Muttepawar (Married Daughter) Age 40 Yrs. Occu.: Housewife R/o Flat No.G-101, Sr.No.28/29 Green Lands Society Rahatani, Near SNBP School, Rahatani, Pune City, Dist Pune
3. Manjiri Sunil Chiddarwar (Daughter), Age 33 Yrs. Occu.: Service R/o A-403, Shree Ganesh Imperia Apartments, Datta Mandir Road, Near Omega Paradise Wakad Dist.Pune

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sunil Gopalrao Chiddarwar हे दिनांक 12.05.2026 रोजी Shilangan Road, Ganesh Colony, Amravati, Tq.Dist.Amravati येथे मयत झाले. अर्जदार Pranita Sunil Chiddarwar (Wife) + Others यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Pranita Sunil Chiddarwar (Wife) + Others वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०८४/२०२६
**ममता व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२३.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Mamta Nagorao Kokate, Age 44 Yrs. Occu.: Household
2. Jay Nagorao Kokate, Age 20 Yrs. Occu.: Other
3. Harsh Nagorao Kokate, Age 18 Yrs. Occu.: Other
All R/o Galli No.2, Varun Nagar, Mahadev Khori, Rukhmini Nagar, S.O.Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **नागोराव नथ्थुजी कोकाटे** हे दिनांक 18.04.2024 रोजी Amravati, Tq.Dist.Amravati येथे मयत झाले. अर्जदार **ममता व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ममता व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१८.०६.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४६०/२०२६
**सीमा+२ -वि- निरंक**
पुढील ता.२५.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Seema Narendra Borkar, Age 38 Yrs. Occu.: Household R/o Near Nalanda Buddha Vihar, New Bypass Road, Mahadeo Khori, Amravati
2. Anushka Narendra Borkar, Age 17 Yrs. (Minor), Occu.: Student
3. Naitik Narendra Borkar, Age 13 Yrs. (Minor), Occu.: Student
Appli.No.2 & 3 being minors through their natural guardian mother i.e. Appli.No.1 Seema Narendra Borkar
Appli.No.2 & 3 R/o Street No.2, Near Waghmare Kirana Daroga Plot Rukhmini Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Narendra Shankarrao Borkar हे दिनांक 28.12.2025 रोजी Amravati, Tq.Dist.Amravati येथे मयत झाले. अर्जदार Seema Narendra Borkar + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Seema Narendra Borkar + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३३८**
**आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025**

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# अमरावती महानगरपालिका : जनतेच्या विश्वासाची आणि विकासाची ४३ वर्षे काल, आज आणि उद्या...



**अमरावती महानगरपालिकेच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त आजपर्यंत झालेला विकास, महापालिकेकडून पुरविण्यात येणाऱ्या सोई सुविधा, आणि वाढते शहरीकरण लक्षात घेता मनपाची आजपर्यंतची वाटचाल असा आढावा घेणारा हा विशेष लेख आहे.**

## अमरावती महानगरपालिकेचा प्रेरणादायी प्रवास

संजय पाखोडे, अमरावती
मो. ९८२३०२३८७५

विदर्भाची कुलस्वामिनी श्री अंबादेवी आणि श्री एकविरा देवीच्या या नगरीत नगरपरिषदेनंतर १५ ऑगस्ट १९८३ ला अमरावती महानगरपालिकेची स्थापना झाली.सुरवातीला उदुंबरावती, नंतर उमरावती नावानं ओळख असलेल्या या शहराचं कालांतराने अमरावती असं नांव झालं.संत गाडगेबाबांचा स्वच्छतेचा संदेश,राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामविकासाची संकल्पना,भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील वीर वामनराव जोशीं, दादासाहेब खापर्डे यांची राष्ट्रभक्ती, आणि स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुखांचा शेक्षेणीक दृष्टीकोन.अशा या महापुरुषांच्या प्रेरणेने अमरावती महानगरपालिकेच्या विकासाचा प्रवास अधिक समृद्ध झाला.

**स्वच्छ अमरावती :सुंदर अमरावती**

नागरिकांच्या जीवनाशी थेट जोडलेला विषय म्हणजे पाणीपुरवठा आणि स्वच्छता.नियमित आणि शाश्वत पाणीपुरवठ्यासाठी जलवाहिन्यांचे जाळे मजबूत करण्यात आले.गळती नियंत्रणावर भर देण्यात आला,आणि जलस्त्रोत व्यवस्थापनासाठी विविध उपाययोजना राबविण्यात आल्या. 'स्वच्छ अमरावती, सुंदर अमरावती' या संकल्पनेतून घराघरांतून कचरा संकलन, घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता मोहिमा आणि जनजागृती उपक्रम प्रभावीपणे आजही राबविले जात आहेत.

नागरिकांच्या पायाभूत सुविधे सोबतच शहरातील दैनंदिन साफसफाई, स्वच्छता, सांडपाणी व्यवस्था, पक्क्या नाल्या, नालेसफाई, भुयारी गटार योजना, मलनिस्सारण केन्द्र,नागरी स्वच्छतागृह, पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पिण्याचे पाणी, जलनिस्सारण व्यवस्था मजबूत करण्यात आल्या. आधुनिक तंत्रज्ञानासह शिक्षण या उपक्रमातून महापालिका शिक्षणाचा दर्जा उंचावला.नागरी आरोग्य सेवा, सुसज्ज दवाखाने,महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांद्वारे लसीकरण, प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा आणि जनजागृती कार्यक्रम राबविले जात आहेत. कोरोना च्या जिवघेण्या साथी मध्ये महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने केलेल्या उपाययोजना अमरावती कर नागरीक कधीच विसरू शकत नाही.बेघरांकरिता बडनेरा येथे निवासाची व्यवस्था, गोरगरीब गरजु रहिवाशांकरिता रमाई,शबरी,आणि प्रधानमंत्री आवास योजनेत हजारो घरकुलांचे बांधकाम करण्यात आले.विधवा एकल महिलांना रोजगराच्या अनेक संधी उपलब्ध करून देण्यात आल्या.

पंतप्रधान स्वनिधी अंतर्गत अनेक लहान व्यावसायिकांना सक्षम रोजगार निर्मितीसाठी मोठे अर्थ सहाय्य देण्यात आले.शहरातील प्रमुख चौकांचे सौंदर्यीकरण, छत्री तलाव आणि वडाळी तलावाचे सुशोभीकरण करण्यात आले. विकास म्हणजे पर्यावरणाशी मैत्री करून उद्यानांचे नूतनीकरण, वृक्षारोपण मोहिमा, हरित पट्ट्यांची निर्मिती आणि सार्वजनिक ठिकाणांचे सुशोभीकरण यामुळे शहर अधिक हिरवेगार झाले. पर्यावरण संतूलन राखण्याकरिता वृक्षलागवड, नागरिकांकरिता हिरवीगार उद्याने उभारण्यात आली.या करिता अमरावती महानगरपालिकेला राष्ट्रीय स्तरावरच्या स्वच्छ वायु सर्वेक्षण पुरस्काराने सलग दोन वेळा गौरविण्यात आलं. याचबरोबर एकात्मिक रस्ते विकास योजना, आकर्षक पथदिवे, सिमेंट आणि डांबरी रस्त्याचे विकसीत जाळे, पादचारी मार्ग, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थे अंतर्गत शहरी बससेवा,स्थानिक भाजीबाजारात दैनंदिन नागरी सुविधा, बाजारपेठेतील पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आल्या.खेळाडूंचा विकास करण्यासाठी अत्याधुनिक क्रिडासंकुलांची उभारणी, खेळांच्या मैदानांचे जतन.,विविध स्पर्धा परिक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता सुसज्ज अभ्यासिका,वाचनालयाच्या माध्यमातून ग्रंथभांडार,विविध कला,नाट्य आणि सांस्कृतिक कार्यक्रमांकरिता संत ज्ञानेश्वर भवनाची निर्मिती, इत्यादी सेवा सुविधा मागील ४३ वर्षात महानगरपालिकेने अमरावतीकर नागरिकांकरिता उपलब्ध करवून दिल्या.ऐतिहासिक महत्व असलेल्या परकोटाचे जतन, शिवटेकडी आणि भिमटेकडी येथे विकासकामे करण्यात आली. शिवटेकडी येथे शिवसृष्टी साकारण्याचे काम सद्यस्थितीत सुरू आहे. शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या टाऊन हॉल आणि नेहरू मैदानातील ऐतिहासिक लाल शाळेचा विकास प्रस्तावित करण्यात आला आहे. अमरावती शहराला एकत्रीत करणारा राजकमल चौकातील रेल्वे उड्डाणपूल आणि इतवारी येथील उड्डाणपूलाचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. त्याचप्रमाणे कुथे स्टॉप ते इर्विन चौक उड्डाणपुल, गाडगेनगर ते इर्विन चौक उड्डाण पुल, राजापेठ चौकातील उड्डाण पुल आणि आण त्याखाली तयार करण्यात आलेल्या 'अंडरपास रस्त्याने' शहराची वाहतूक सुरळीत होण्यास मदतच झाली.

**डिजीटल महानगरपालिकेचा उदय**

डिजिटल तंत्रज्ञानाचा वाढता वापर यामुळे महानगरपालिकेत नागरिक सेवांमध्ये पारदर्शकता आणि गती निर्माण झाली.ऑनलाइन सेवा, तक्रार निवारण प्रणाली आणि लोकाभिमुख प्रशासन ही आधुनिक अमरावती महानगरपालिकेची नवी ओळख निर्माण झाली. अमरावती महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर गेल्या ४३ वर्षात प्रशासकीय सेवा सुविधेमधील आधुनिकीकरणामुळे नागरिकांना खऱ्या अर्थानं गतिमान प्रशासनाचा फायदा झाला. महापालिका स्थापने पूर्वीची अमरावती, आणि नंतरची नविन अमरावती., या मधील फरक स्पष्टपणे जाणवू लागला. महानगरपालिका कार्यालयात उपलब्ध असलेल्या सर्व प्रकारच्या ऑनलाईन सेवा, अग्निशमन आणि बाजार परवाना ऑनलाईन सेवां.,अत्याधुनिक मोबाईल एप, जन्म मृत्यू प्रमाण पत्रासाठी ट्रैकिंग सुविधा, एक खिडकी योजना, मालमत्तांचे उपग्रहाच्या माध्यमातून सर्वेक्षण आणि नियंत्रण, डिजीटल करभरणा सुविधा, तक्रार निवारण, मराठी आणि इंग्रजी भाषेतील अद्ययावत संकेत स्थळाच्या माध्यमातून उपलब्ध असलेली शहराची आवश्यक माहिती ,यामुळे प्रशासनातील पारदर्शकता दिसायला लागली. नागरी प्रश्नांना जलद प्रतिसाद देणाऱ्या व्यवस्थेमुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यातील संवाद अधिक गतिमान झाला. सीटी ई-गव्हर्नन्स इंडेक्स मध्ये अमरावती महानगरपालिकेने महाराष्ट्रात सातवा क्रमांक पटकाविला. महानगरपालिकेचा हा प्रवास आतापर्यंत झालेले सर्व लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांनी घडला.

**लोकप्रतिनिधीची भुमिका महत्वाची**

शहराचा विकास केवळ शासन करीत नाही; तर तो नागरिकांच्या सहभागातून घडतो. स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, सामाजिक उपक्रम, महिला बचत गट, युवकांचा सहभाग आणि विविध स्वयंसेवी संस्थांचे योगदान. या सर्वांनी अमरावती महानगरपालिकेच्या विकासाला लोकचळवळीचे स्वरूप दिले आहे.

१९९२ पासून आतापर्यंत महापौर पद भूषविलेले प्रथम महापौर डॉ देविसिंह शेखावत, प्रभाकर सव्वालाखे, गोविंद अग्रवाल, श्रीमती विद्याताई देशपांडे, श्रीमती किरणताई महल्ले, प्रविण आप्पा काशिकर, नितीन वानखडे, विलास इंगोले, सौ.दिपालीताई गवळी, मिलिंद चिमोटे, अशोक डोंगरे, एड. किशोर शेळके, सौ.वंदनाताई कंगाले, सौ.चरणजीत कौर नंदा, संजय नरवणे, चेतन गावंडे आणि आताचे सतरावे महापौर श्रीचंद तेजवाणी यांच्या संकल्पनेतून महानगरपालिके अतंर्गत होणारे विकासकामे वेगवान गतीने सुरू आहेत. या सर्व महापौरांच्या नेतृत्वात 'माझे शहर, माझी जबाबदारी' ही भावना आज अधिक बळकट होत आहे. महापौरांसोबतच, उपमहापौर, स्थायी समितीचे सभापती आणि आतापर्यंत झालेले नगरसेवक यांचा विकासाच्या प्रक्रियेत महत्वाचे योगदान आहे. भारताच्या माजी राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या कार्यकाळात अमरावती महानगरपालिके अंतर्गत झालेला विकास नागरीक विसरूच शकणार नाही. ताईंच्या कार्यकाळात अमरावती शहरात मॉडेल रेल्वे स्थानक उभारण्यात आले. तसेच जिल्हा आणि सत्र न्यायालयाची भव्य वास्तू उभारण्यात आली. माजी राज्यपाल आणि माजी खासदार दिवंगत रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई, माजी खासदार अनंतराव गुढे, आनंदराव अडसूळ, सौ. नवनित रवी राणा, विद्यमान खासदार बळवंत वानखडे आणि राज्यसभेचे खासदार डॉ अनिल बोंडे यांनी केन्द्र सरकारच्या निधीमधून महापालिकेत विकास कामांचे योगदान दिले. त्याचप्रमाणे अमरावती आणि बडनेरा विधानसभा मतदारसंघ आणि स्थानिक स्वराज्य मतदारसंघातून महापालिका स्थापनेनंतर निवडून आलेल्या आमदारांचे महापालिका विकासात महत्त्वाचे स्थान आहे. यात माजी आमदार श्रीमती वसुधा ताई देशमुख, जगदिश गुप्ता, डॉ सुनिल देशमुख, रावसाहेब शेखावत, सौ.सुलभा संजय खोडके, प्रदिप वडनेरे, ज्ञानेश्वर धाने पाटील, आणि विद्यमान आमदार रवी राणा, प्रविण पोटे पाटील, संजय खोडके यांचा महापालिकेच्या अंतर्गत शहरातील विकास प्रकल्पांमध्ये महत्वाचा वाटा आहे. भविष्याकडे महापालिकेची वाटचाल जोमाने सुरू आहे. स्मार्ट तंत्रज्ञान, शाश्वत विकास, पर्यावरणपूरक उपक्रम, आधुनिक वाहतूक व्यवस्था, डिजिटल प्रशासन आणि गुणवत्तापूर्ण नागरी सुविधा.,या दिशेने अमरावती महापालिका नवी झेप घेत आहे. येणाऱ्या पिढ्यांसाठी अधिक सक्षम, स्वच्छ, हरित आणि समृद्ध शहर घडविण्याचा संकल्प महानगरपालिका आणि नागरिकांनी मिळून करायचा आहे.४३ वर्षांचा हा प्रवास केवळ विकासकामांचा लेखाजोखा नाही. तर हा आहे विश्वासाचा प्रवास, सेवाभावाचा प्रवास आणि जनतेसोबत चालण्याचा प्रवास. प्रत्येक रस्ता, प्रत्येक दिवा, प्रत्येक जलवाहिनी, प्रत्येक स्वच्छ परिसर आणि प्रत्येक हसरा चेहरा, अमरावतीच्या प्रगतीची साक्ष देत आहे.अमरावती महानगरपालिकेच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त, आपण सर्वजण एकच संकल्प करूया स्वच्छ, सुंदर, हरित, सुरक्षित आणि प्रगत अमरावती घडविण्याचा.अमरावती महानगरपालिकेच्या वर्धापन दिनाच्या खुप खुप शुभेच्छा.

## हर घर तिरंगा' अभियानांतर्गत महाविद्यालयात विविध उपक्रम

**परतवाडा :** भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'हर घर तिरंगा' अभियान उत्साहात राबविण्यात आला. या अभियानांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांकडून विविध जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



अभियानाच्या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविले. स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत महाविद्यालय परिसराची स्वच्छता केली. स्वच्छता, पर्यावरण संवर्धन तसेच सामाजिक बांधिलकीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. 'हर घर तिरंगा' अभियानाच्या अनुषंगाने विशेष व्याख्यानाचे आयोजन तसेच स्वातंत्र्य सैनिकांना आदरांजली इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सन्माननीय डॉ. अनिल खांडेकर होते, तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रमोद गारोडे उपस्थित होते.यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. प्रमोद गारोडे यांनी 'हर घर तिरंगा' अभियानाचे महत्त्व विशद केले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्यागातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना मनात रुजवावी, असे आवाहन त्यांनी केले.तिरंगा हा केवळ राष्ट्रध्वज नसून तो देशाचा स्वाभिमान, एकता, शौर्य आणि बलिदानाचे प्रतीक आहे. प्रत्येक नागरिकाने राष्ट्रध्वजाचा सन्मान राखत देशाप्रती आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडावीत, असेही त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर यांनी राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासोबतच त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी व राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते, असे प्रतिपादन केले.संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. दयाश्री कोकाटे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्रा. प्रीती नवरे, डॉ. प्रिया सगणे, डॉ. स्वाती वानखडे, प्रा. जोत्स्ना भोयर,प्रियंका देवतळे,प्रमोद मेटकर तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,स्वयंसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, राष्ट्रप्रेम आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाबद्दल कृतज्ञतेची भावना जागृत करण्याचा हा उपक्रम प्रेरणादायी ठरला.

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात डॉ.एस.आर.रंगनाथन जयंती साजरी

**अमरावती**-अस्मिता शिक्षण मंडळ,अमरावती द्वारा संचालित स्थानिक महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाद्वारा ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.मीनल भोंडे, प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे IQAC समन्वयक इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.जगदीश बावणे



तसेच विचारमंचावर महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ.अतुल वानखडे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये डॉ.अतुल वानखडे यांनी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवन चरित्रावर विस्तृतपणे प्रकाश टाकला. प्रमुख अतिथी डॉ.जगदीश बावणे यांनी पुस्तके ही मित्रांप्रमाणे असून विद्यार्थ्यांनी पुस्तके ही डिजिटल माध्यमावर न वाचता प्रत्यक्षपणे वाचावीत असे विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.मीनल भोंडे यांनी पुस्तके ही मानवी जीवनाला आकार देणारी असून मानवी जीवनामध्ये जेवढे महत्व पुस्तकांना आहे तेवढेच महत्व ग्रंथालय शास्त्रामध्ये डॉ.रंगनाथन यांना असल्याचे सांगितले.आज राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने विद्यार्थ्याला सर्वसमावेशक दृष्टिकोन दिल्याने परिपुर्ण व्यक्तिमत्त्व घडवण्यासाठी वाचनसंस्कृती जपून कृतीशील शिक्षणही आत्मसात केले पाहिजे हे सांगितले.या कार्यक्रमाचे संचालन ग्रंथपाल डॉ.अतुल वानखडे यांनी तर आभार ग्रंथालय सहायक उज्वला चव्हाण यांनी मानले.कार्यक्रमाला महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी बांधव तसेच बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## २०२२ नंतरची 'हर घर तिरंगा' रॅली

**अंजनगाव बारी** - 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत अंजनगाव बारी येथे तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. २०२२ नंतर अंजनगाव बारी परिसरातील सर्वात मोठी तिरंगा रॅली म्हणून या रॅलीची विशेष चर्चा झाली. रॅलीमध्ये विद्यार्थी, नागरिक, महिला तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेश टारपे होते. तसेच महादेवराव



चकुले, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, तसेच शंकरगिरी महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विलास राठोड, तालुकाध्यक्ष भातकुली तथा अमरावती ग्रामीण, सोपान मुळे,सरचिटणीस, निखिल पोकळे,विशेष दंडाधिकारी, शैलेश पोकळे,सोशल मीडिया प्रमुख, दिपाली मलवार, महिला मोर्चा अध्यक्षा, पुष्पा पोकळे, पूजा रडके, कुसुम इंगोले, उज्वला येवतकर, कविता घोडमारे, विजय गाडे, गौरव चव्हाण, झनकार नवखारे (शाखाप्रमुख), सुरेश कडव, स्वप्नील डकरे, प्रमोद गोरे, उमेश मुळे, पवन पवार, सतीश येवतकर, नावेद अहमद, बाळासाहेब घावडे, गुणवंत शेलोकार आणि सतीश वाढणकर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## लक्ष्मीबाई माहुरे यांचे निधन

**टाकरखेडा संभू**- येथील रहिवासी लक्ष्मीबाई महादेवराव माहुरे वय ९५ यांचे १३ ऑगस्ट रोजी पहाटे चार वाजता वृद्धापकाळमुळे निधन झाले त्यांच्या पश्चात तीन मुले विवाहित, सुना, नातवंड याचा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर टाकरखेडा संभू येथील हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



# स्वातंत्र्यदिनानिमित्त BSNL ची विशेष ऑफर

## केवळ रु.१ मध्ये SIM, दररोज १ GB डेटा आणि अमर्यादित व्हॉइस कॉलिंग

**अमरावती/का.प्र.**

१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) ने नवीन ग्राहक तसेच मोबाईल नंबर पोर्टेबिलिटी (MNP) द्वारे BSNL शी जोडल्या जाणाऱ्या ग्राहकांसाठी विशेष ऑफर जाहीर केला आहे. १२ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत उपलब्ध असलेल्या या विशेष योजनेअंतर्गत ग्राहकांना केवळ २१ मध्ये BSNL SIM प्राप्त करता येणार आहे.

या विशेष ऑफर अंतर्गत ग्राहकांना दररोज १ GB डेटा, अमर्यादित व्हॉइस कॉलिंग आणि दररोज १०० SMS ची सुविधा देण्यात येणार आहे. या विशेष योजनेची वैधता २४ दिवसांची असेल. ही सुविधा विशेषतः नवीन BSNL ग्राहक तसेच इतर दूरसंचार नेटवर्कमधून BSNL मध्ये आपला मोबाईल क्रमांक पोर्ट करणाऱ्या ग्राहकांसाठी उपलब्ध आहे.

3G वरून 4G कडे-BSNL 4G SIM मध्ये विनामूल्य अपग्रेड BSNL कडून जुन्या 3G SIM चे 4G SIM मध्ये विनामूल्य अपग्रेड करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. ग्राहकांनी आपल्या नजीकच्या BSNL Customer Service Centre (CSC) अथवा अधिकृत रिटेलरशी संपर्क साधून 4G SIM प्राप्त करावा आणि वेगवान 4G कनेक्टिव्हिटीचा लाभ घ्यावा.

**BSNL eSIM द्वारे स्मार्ट आणि सुरक्षित कनेक्टिव्हिटी**

BSNL च्या eSIM सेवेच्या माध्यमातून ग्राहकांना प्रत्यक्ष SIM कार्डशिवाय मोबाईल कनेक्टिव्हिटीचा लाभ घेता येतो. eSIM मुळे डिजिटल सुविधा, सुरक्षितता तसेच डिव्हाइस बदलताना कनेक्शन सहजपणे स्विच करण्याची सुविधा उपलब्ध होते.दुर्गम भागांसाठी Satellite Phone सेवा ज्या ठिकाणी पारंपरिक मोबाईल नेटवर्क पोहोचत नाही, अशा दुर्गम भागांमध्ये BSNL ची Satellite Phone Service महत्त्वपूर्ण संचार माध्यम म्हणून कार्य करते.संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन, सागरी क्षेत्र, खाणकाम, दुर्गम कार्यक्षेत्रे, तीर्थयात्रा तसेच साहसी पर्यटन यांसारख्या क्षेत्रांमध्ये ही सेवा विशेषतः उपयुक्त आहे.

**विशेष ऑफर**

भारत संचार निगम लिमिटेड (BSNL) ने स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आपल्या Fibre Basic Plan अंतर्गत ग्राहकांसाठी विशेष ऑफर उपलब्ध करून दिला आहे. १४९९ प्रतिमाह असलेल्या या प्लॅनमध्ये ग्राहकांना 60 Mbps पर्यंत इंटरनेट स्पीड आणि 3300 GB पर्यंत हाय-स्पीड डेटा उपलब्ध करून देण्यात येत आहे. या प्लॅनसोबत अनलिमिटेड व्हॉइस कॉलिंग, मोफत थळ-ऋछ तसेच ४०० हून अधिक टीव्ही चॅनेल्सची सुविधा देण्यात येत आहे. विशेष स्वातंत्र्यदिन ऑफर अंतर्गत पहिल्या महिन्याची सेवा निःशुल्क असून, त्यानंतरच्या तीन महिन्यांसाठी २१०० प्रतिमाह सवलत देण्यात येत आहे.

**सॅटेलाइट फोनची किंमतः**
रु.११,३४,१६६/- (जीएसटीसह)
मासिक योजना: रु. १४,५०३/- (जीएसटीसह)
वार्षिक योजना: रु.१४९,५३२/- (जीएसटीसह)
Incoming Call: रु.१८ प्रति मिनिट
Outgoing Call: रु.१८ प्रति मिनिट
BSNL चा २४९९ Fibre Basic Plan- स्वातंत्र्यदिनानिमित्त ग्राहकांसाठी!

BSNL चा नवीन Fiber Super Plus OTT Plan-200 Mbps स्पीडसह 12 OTT प्लॅटफॉर्म स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने BSNL ने ग्राहकांसाठी नवीन Fiber Super Plus OTT Plan उपलब्ध करून दिला आहे. या प्लॅनमध्ये ग्राहकांना हाय-स्पीड इंटरनेटसह विविध मनोरंजनाच्या सुविधा एकाच कनेक्शनवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत.या प्लॅन अंतर्गत 200 Mbps पर्यंत हाय स्पीड इंटरनेट, 5000 GB डेटा तसेच भारतातील कोणत्याही नेटवर्कवर २४७ अमर्यादित व्हॉइस कॉलिंगची सुविधा देण्यात येत आहे. यासोबत Dual Band Wi-Fi ONT देखील समाविष्ट आहे.

या प्लॅनचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे एकाच कनेक्शनवर 12 OTT प्लॅटफॉर्म उपलब्ध होणे. यामध्ये Jio Hotstar, Sony LIV, ZEE5, Lionsgate Play, ShemarooMe, Hungama, EpicON, Chaupal, Hoichoi, FanCode, ManoramaMAX, NammaFlix आणि Dolly Wood Play यांसह इतर OTT सेवा उपलब्ध आहेत.

या प्लॅनची नियमित किंमत रु.११,१९९ प्रतिमाह असून, लॉन्च ऑफर अंतर्गत तो रु.१,१११ प्रतिमाह या दराने उपलब्ध आहे. तसेच लॉन्च ऑफर अंतर्गत ६ महिन्यांपर्यंत दरमहा २८८ ची सवलत देण्यात येत आहे.BSNL च्या या ऑफरमुळे नवीन ग्राहकांना किफायतशीर दरात हाय-स्पीड फायबर इंटरनेटसोबत मनोरंजन आणि व्हॉइस कॉलिंगच्या सुविधा एकाच कनेक्शनवर उपलब्ध होणार आहेत. ग्राहकांनी सध्याच्या ऑफर तसेच पात्रतेबाबतची माहिती आपल्या नजीकच्या BSNL कार्यालयातून किंवा अधिकृत प्रतिनिधीकडून प्राप्त करावी.

BSNL Selfcare App मुळे सेवा होणार अधिक सुलभ BSNL Selfcare App च्या माध्यमातून ग्राहकांना आपले बिल, पेमेंट, रिचार्ज तसेच डेटा वापराची माहिती सहजपणे प्राप्त करता येते. ग्राहकांना विविध BSNL सेवांचे व्यवस्थापन डिजिटल माध्यमातून सुलभपणे करता येते.हरिसालमध्ये BSNL ची 4G




सेवा सुरू-आता खऱ्या अर्थाने डिजिटल गावाच्या दिशेने वाटचाल महाराष्ट्र शासनाने हरिसालचा देशातील डिजिटल गाव म्हणून उल्लेख केला होता. मात्र, सुरुवातीच्या काही कालावधीनंतर हरिसालमध्ये कोणत्याही ऑपरेटरचे मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्यामुळे येथील नागरिकांना मोबाईल आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटीसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

ही परिस्थिती लक्षात घेऊन BSNL अमरावतीने हरिसाल येथे ४० मीटर उंचीचा टॉवर उभारून 4G मोबाईल सेवा सुरू केली आहे. यामुळे हरिसाल तसेच आसपासच्या परिसरातील नागरिकांना आता अधिक चांगली मोबाईल आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटी उपलब्ध होत आहे.BSNL च्या या उपक्रमामुळे हरिसालला आता खऱ्या अर्थाने डिजिटल गाव म्हणून विकसित करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.मेलघाटातील दुर्गम व आदिवासी भागात 4G कनेक्टिव्हिटीचा विस्तार मेलघाटातील दुर्गम व आदिवासी भागात 4G कनेक्टिव्हिटीच्या विस्ताराअंतर्गत ऍूदिब-१ ते Category-4 मधील ७० गावांमध्ये काम पूर्ण करून सेवा सुरू करण्यात आली आहे. तसेच हरिसाल आणि सेमाडोह येथेही 4G सेवा सुरू करण्यात आली आहे, तर आणखी ९ टॉवरचे काम प्रगतीपथावर आहे.

याशिवाय Category-5 आणि Cat-egory-6 अंतर्गत ५४ टॉवर प्रस्तावित असून, त्यांच्या कामाची प्रक्रिया सुरू झाली आहे.BSNL अमरावतीचा हा उपक्रम मेलघाटातील दुर्गम व आदिवासी भागांना डिजिटल कनेक्टिव्हिटीशी जोडण्याबरोबरच शिक्षण, आरोग्य, प्रशासन, रोजगार आणि विविध डिजिटल सेवांपर्यंत नागरिकांची पोहोच अधिक सुलभ करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण उपलब्धी ठरत आहे.स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने BSNL अमरावतीतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, मजबूत, सुरक्षित आणि आत्मनिर्भर डिजिटल भारताच्या निर्मितीत सहभागी व्हावे तसेच BSNL च्या आधुनिक, विश्वासार्ह आणि किफायतशीर दूरसंचार सेवांचा लाभ घ्यावा.

# दर्यापूरात काँग्रेसला मोठा राजकीय धक्का

## नगराध्यक्षांसह १७ नगरसेवकांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

**खल्लार/प्रतिनिधीः-**
दर्यापूरात आज काँग्रेसला मोठा राजकीय हादरा बसला आहे. दर्यापूर नगरपरिषदेवर काँग्रेसचे स्पष्ट बहुमत असतानांही काँग्रेसच्या नगराध्यक्षांसह तब्बल १७ नगरसेवकांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्याने दर्यापूरच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. या राजकीय भूकंपामुळे काँग्रेसच्या गोटात खळबळ उडाली असून, शिवसेना शिंदे गटाची ताकद दर्यापूरमध्ये अचानक वाढली आहे.



उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला. या संपूर्ण राजकीय घडामोडीत आमदार बच्चू कडू यांची भूमिका आणि राजकीय करिष्मा चर्चेचा विषय ठरला आहे. काँग्रेसच्या ताब्यात असलेल्या नगरपरिषदेतील एवढ्या मोठ्या संख्येने नगरसेवकांनी एकाचवेळी पक्षांतर केल्याने आगामी स्थानिक राजकारणाची समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली आहे.


शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणाऱ्यांमध्ये नगराध्यक्षा मंदाकिनी सुधाकर भारसाकळे, अहमद खा हबीब खान, असुद्दुल्ला खान, वर्षा विनोद बोरकर, रामेश्वर शंकरराव चव्हाण, जुलैरखाबाई घाणीवाले, वंदना सोळंकी, मुनिफा आयुष्य, कविता दिलीप गवई, रेखाताई दिलीप चव्हाण, समिना परविन सय्यद, नदिन शेख, नशीब शेख, वसिम उद्धव नळकांडे, स्नेहा शिवाजी देशमुख आणि सुनिता संजय चव्हाण यांचा समावेश आहे.

याशिवाय स्वीकृत सदस्य रामेश्वर जगन्नाथ मालपाणी आणि ईश्वर बुंदिले यांनीही शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. (पान २ वर)

### सारंगपुर ग्रामपंचायतीच्या कामकाजाविरोधात वीरू गिरी

# बुलढाणाच्या यशवंत सेनेचा पदाधिकारी अमरावतीत चढला टॉवरवर

### -सातुर्णा परिसरात गोंधळ





**अमरावती/प्रतिनिधीः-**
बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यातील सारंगपूर ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार आणि प्रलंबित मागण्यांच्या विरोधात एका युवकाने शहरातील सातुर्णा परिसरातील मोबाईल टॉवरवर चढून (दि.१४) आंदोलन केले.यामुळे परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता.गजानन माधव बोरकर असे टॉवरवर चढणाऱ्या युवकाचे नाव आहे.

माहितीनुसार तो यशवंत सेनेचा बुलढाणा जिल्हा संपर्क प्रमुख आहे.गजानन बोरकर यांनी आरोप केला की, सारंगपुर ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या जलपूर्ती योजना आणि शेत तळे यांसारख्या कामांमध्ये मोठा भ्रष्टाचार झाला आहे. या भ्रष्टाचारामुळे गावाला पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक आणि इतर अधिकारी गावाच्या विविध प्रलंबित कामांकडे दुर्लक्ष करत आहेत. वारंवार तक्रार करूनही लक्ष देण्यात नाही आले. यामुळे आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी बोरकर यांनी (पान २ वर)




# घरगुती गॅस सिलेंडर चोरी करणारे दोघे ताब्यात

### राजापेठ पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-**
घरगुती गॅस सिलिंडर चोरी करणाऱ्या व ते चोरीचे सिलिंडर विक्री करणाऱ्या दोघांच्या टोळीचा राजापेठ पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन जणांना अटक केली असून त्यांच्याकडून तब्बल १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्रेम श्याम ढिलके (वय २१ वर्षे, रा. चिंचफैल) व श्रवण उर्फ डॉन राजेश बनारसे (वय १९ वर्षे, रा. महादेव खोरी) अशी अटक आरोपींची नावे आहेत. विशेष (पान २ वर)




# सीआरएस पोर्टलवर प्रलंबित जन्ममृत्यू प्रमाणपत्रांना मंजूर द्या!

### -अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन छेडणार!

**मोर्शी/प्रतिनिधीः-**
सीआरएस पोर्टलवर मोर्शी नगरपरिषदेतील प्रलंबित जन्ममृत्यू प्रमाणपत्रांच्या नोंदींना तात्काळ मंजुरी देण्यात येऊन प्रमाणपत्रे उपलब्ध करून देण्यात यावे.अन्यथा नागरिक व विद्यार्थ्यांना (पान २ वर)



























जाहीरात संकलन सुभाष कोटेचा

# सारांश

शनिवार १५ ऑगस्ट, २०२६ ❐ E-paper-www.janmadhyam.com

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय


# रणवीर सिंगच्या ‘प्रलय’चे शूटिंग मुंबईत

अभिनेता रणवीर सिंगच्या आगामी ‘प्रलय’ या महत्त्वाकांक्षी चित्रपटाबाबत नवी माहिती समोर आली आहे. जय मेहता दिग्दर्शित हा सर्वनाश करणारा झोम्बी थ्रिलर असून, चित्रपटाचा मोठा भाग ऑस्ट्रेलियात शूट करण्याचे नियोजन यापूर्वी करण्यात आले होते. मात्र, आता या शूटिंग शेड्यूलमध्ये बदल करून काही भाग मुंबईत हलवण्याची तयारी सुरू असल्याचे वृत्त आहे. या बदलामागे रणवीर सिंगची वैयक्तिक परिस्थितीही एक महत्त्वाचे कारण असल्याचे सांगितले जात आहे.

रिपोर्टनुसार, रणवीर सिंग पत्नी दीपिका पदुकोण आणि त्यांच्या वाढत्या कुटुंबाच्या जवळ राहू इच्छितो. रणवीर आणि दीपिका आपल्या दुस–या अपत्याच्या स्वागताची तयारी करत आहेत. त्यामुळे शूटिंगसाठी दीर्घकाळ ऑस्ट्रेलियात राहण्याऐवजी मुंबईत राहून काम करण्याचा पर्याय अधिक सोयीचा ठरू शकतो. मात्र, या बदलाबाबत निर्माते किंवा रणवीरकडून अद्याप अधिकृत घोषणा झालेली नाही. दरम्यान, केवळ वैयक्तिक कारणामुळेच शूटिंगचे ठिकाण बदलले जात असल्याचे निश्चित झालेले नाही. काही रिपोर्ट्समध्ये ऑस्ट्रेलियातील विशिष्ट लोकेशन्ससाठी आवश्यक परवानग्या मिळवण्याशी संबंधित अडचणीही असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे वैयक्तिक आणि प्रॉडक्शनशी संबंधित दोन्ही कारणांचा विचार करून मुंबईला पर्याय म्हणून निवडले जात असल्याची चर्चा आहे.

‘प्रलय’ हा रणवीरच्या कारकिर्दीतील महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जात आहे. सुमारे ३०० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये हा चित्रपट तयार होत असल्याचे रिपोर्ट्स आहेत. पोस्ट–अपोकॅलिप्टिक मुंबईच्या पार्श्वभूमीवर एका विवाहित जोडप्याच्या अस्तित्वाच्या संघर्षाची कथा या चित्रपटातून मांडली जाणार असल्याचे सांगितले जाते. झोम्बी थ्रिलरच्या माध्यमातून रणवीर पहिल्यांदाच या प्रकारच्या भूमिकेत दिसणार आहे. चित्रपटात रणवीरसोबत कल्याणी प्रियदर्शन दिसणार असल्याचेही रिपोर्ट्स आहेत. हा न्र्ईं–प्रधान प्रकल्प असून, त्यासाठी रणवीरकडून विशेष शारीरिक आणि भावनिक तयारी केली जात असल्याची माहिती यापूर्वी समोर आली होती. जुलैमध्ये रणवीरने मुंबईतील हंसल मेहता यांच्या कार्यालयात जाताना आपला नवा लूक पापाराझींपासून लपवला होता, त्यामुळे ‘प्रलय’मधील त्याच्या भूमिकेबाबत उत्सुकता आणखी वाढली आहे.



बॉलिवूडचा सिंघम म्हणून ओळखला जाणारा अभिनेता ’अजय देवगण’ आता सूत्रसंचालकाच्या भूमिकेत दिसणार आहे. अजय देवगण सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजनच्या ’क्राईम पेट्रोल’ या सुप्रसिद्ध कार्यक्रमाच्या नव्या पर्वाचे सूत्रसंचालन करणार आहे. या मालिकेचा प्रीमियर ३१ ऑगस्ट रोजी होणार आहे. ’क्राईम पेट्रोल २०२६ – क्राईम का करंट सीझन’ हा कार्यक्रम सोनी एंटरटेनमेंट टेलिव्हिजनवर रात्री १०.३० वाजता प्रसारित होईल. त्याचबरोबर याचे लाईव्ह स्ट्रीमिंगसुद्धा सोनी लिव्ह केले जाईल.

याकडे सर्वांचंच लक्ष्य लागलंय. एका निवेदनात अजय देवगणने म्हटले आहे की, ’क्राईम पेट्रोल’ सारख्या शोमध्ये सामील होणे ही त्याची चाहत्यांप्रति आणि प्रेक्षकांप्रति असलेली जबाबदारी आहे.

’क्राईम पेट्रोल २०२६ – क्राईम का करंट सीझन’ या नव्या पर्वाचा प्रोमोदेखील अत्यंत रंजक आहे. प्रोमोत अजयने प्रेक्षकांना आपल्या विशेष



# बॉलिवूडचा सिंघम अजय देवगण लवकरच झळकणार सूत्रसंचालकाच्या भूमिकेत

अंदाजात गुन्हेगारीपासून सावध राहण्याचं आवाहन केलं आहे.’क्राईम पेट्रोल’ चा पहिला भाग २००३ मध्ये प्रसारित झाला. पुढे ’क्राईम पेट्रोल सतर्क’, ’क्राईम पेट्रोल दस्तक’, ’क्राईम पेट्रोल डायल १००’ आणि ’क्राईम पेट्रोल २.०’ यांसारख्या अनेक आवृत्त्यांमधून तो आणखी प्रसिद्ध होत गेला.

या मालिकेचं सूत्रसंचालन आजवर अनेक सुप्रसिद्ध अभिनेते व अभिनेत्रींनी केलं आहे

. गेल्या अनेक वर्षांत अनुप सोनी, साक्षी तंवर, सोनाली कुलकर्णी, दिव्यांका त्रिपाठी, आशुतोष राणा, रेणुका शहाणे आणि नकुल मेहता यांनी अतिशय रंजकपणे या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आहे.

# साखरपुडा होऊनही केले नाही लग्न

अभिनेत्री पूजा बेदी सध्या तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत आहे. तिने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिचे खासगी आयुष्य, रिलेशनशिप यांबद्दलही वक्तव्य केले आहे. तसेच, भविष्यात तिला लग्न करायचे आहे की नाही, याबद्दलही ती बोलली आहे. ती नेमके काय म्हणालीय, याबद्दल जाणून घेऊ. पूजा बेदीचे पहिले लग्न १९९४ मध्ये फरहान फर्निचरवालाबरोबर झाले होते. २००३ मध्ये त्यांचा घटस्फोट झाला. त्यानंतर पूजाचा लग्नव्यवस्थेवरून विश्वास उडाला. घटस्फोटानंतर ती पुन्हा प्रेमात पडली आहे; मात्र आता लग्नाबद्दल तिचे वेगळे मत आहे. ती आठ वर्षांपासून उद्योगपती मानेक कॉन्ट्रॅक्टरबरोबर रिलेशनशिपमध्ये आहे. २०१९ मध्ये तिने त्याच्याबरोबर साखरपुडाही केला आहे. मात्र, तरीही तिने लग्नाचा निर्णय घेतला नाही.



## ‘मला जे अनुभव आले’

पूजा बेदीने नुकतीच विकी लालवानीला मुलाखत दिली. त्या मुलाखतीत ती म्हणाली की, एक काळ होता, जेव्हा मी लग्नाचा विचार करीत होते. या परंपरांवर माझा विश्वास होता. मात्र, मला जे अनुभव आले, त्यानंतर माझा दृष्टिकोन बदलला आहे. आज मी मानेकबरोबर रिलेशनशिपमध्ये आहे. माझ्या साखरपुड्याला आठ वर्षं झाली आहेत. लोक मला विचारतात की, तू लग्न कधी कर:रणार? मी त्यांना उत्तर देते की, मी लग्न करणार नाही.

पुढे ती म्हणाली, ‘साखरपुडा म्हणजे तो क्षण जेव्हा कोणीतरी तुमच्या बोटात अंगठी घालतं आणि म्हणतं की, मला तुझ्याशी लग्न करायचं आहे. ज्याचा अर्थ असतो की, मला माझं उरलेलं सगळं आयुष्य तुझ्याबरोबर, तुझा जोडीदार म्हणून, तुझं प्रेम म्हणून, तुझा पती म्हणून आणि तुझ्या मुलांचा बाप म्हणून घालवायचं आहे. केवळ तेवढी वचनबद्धता पुरेशी आहे. त्यानंतर कागदावर तुम्ही सही करता आणि या सगळ्या गोष्टीत सरकारला सामील करून घेता.’मानेक यांचेही पहिले लग्न झाले होते आणि त्यांना दोन मुले आहेत; तर पूजालाही दोन मुले आहेत. त्याबद्दल ती म्हणाली की, हे खूप सोपं आहे. माझं लग्न झालं, घटस्फोट झाला आणि मला दोन मुलं आहेत. त्याचंही लग्न झाले, घटस्फोट झाला आणि त्यालाही मुलं आहेत. माझी मालमत्ता माझ्या मुलांना मिळेल, त्याची मालमत्ता त्याच्या मुलांना मिळेल. मी कमावते, तो कमावतो. मला सुरक्षेसाठी त्याची गरज नाही. त्यालाही सुरक्षित वाटण्यासाठी माझी गरज नाही. मला आता लग्न करायचं नाही. माझ्या मते, प्रत्येकानं लग्न केलं पाहिजे. मला वाटतं की, लग्न ही खूप चांगली गोष्ट आहे. मी आधी एकदा लग्न केलं होतं. आता पुन्हा लग्न करावं असं मला वाटत नाही. मानेक व माझ्या कुटुंबाला एकमेकांबद्दल आपुलकी आहे. माझ्या मुलांना तो आवडतो. मला त्याचं कुटुंब आवडतं. त्यामुळे माझ्यासाठी आम्ही जवळजवळ कायमचे एकत्र आहोत’, असे म्हणत अभिनेत्रीने पुन्हा लग्न करणार नाही, असे स्पष्ट केले.

# मला वाटत होतं की, आता मी मरणार आहे- मनीषा कोईराला

अभिनेत्री मनीषा कोईराला यांना २०१२ मध्ये गर्भाशयाच्या अंडाशयाचा चौथ्या स्टेजच्या कॅन्सरचे निदान झाले होते. त्यांनी न्यूयॉर्कमध्ये उपचार घेतले. एप्रिल २०१३ मध्ये त्या पूर्णपणे ब–या झाल्या. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत मनीषा कोईराला यांनी जेव्हा त्यांना कॅन्सरचे निदान झाले होते, त्यावेळी त्यांना एकटेपणा वाटला होता, तसेच भीती वाटली होती, असे वक्तव्य केले आहे.

मनीषा कोईराला यांनी सुशांत प्रधान यांना नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीत त्या म्हणाल्या, ‘मी दवाखान्यात होते आणि मला कॅन्सर झाल्याचे सांगितले गेले. ती रात्र माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठी रात्र होती. मला खूप एकटेपणा वाटत होता. सगळीकडे अंधार दिसत होता. मला वाटत होते की, आता मी मरणार आहे. त्या क्षणी मला प्रचंड भीती वाटत होती आणि तो माझ्या आयुष्यातील सर्वांत भयानक काळ होता.’



त्या म्हणाल्या, ‘अनेक वेळा मला एकटेपणाचा अनुभव आला आहे. मला कॅन्सर झाला तेव्हा जाणीव झाली की, एका रुग्णाला किती एकटे वाटते. तो काळ माझ्यासाठी अत्यंत भयानक आणि त्रासदायक होता. आयुष्यात असे काही क्षण येतात, जेव्हा तुम्हाला एकटेपणा जाणवतो आणि हेच आयुष्याचं सत्य आहे. काही वेळा या एकटेपणाबरोबर आपण राहायला शिकतो. आयुष्य हे वेगवेगळ्या पैलूंनी बनलेलं असतं. कधी कधी गर्दीत असूनही तुम्हाला एकटं वाटतं. मी जेव्हा काही बॉलीवूडच्या पार्ट्यांना जाते, तेव्हा तिथल्या लोकांमध्ये मिसळण्याचा प्रयत्न करते; पण कधी कधी ते जमत नाही. तुम्हाला एखाद्या ठिकाणी हजर राहावंसं वाटतं; पण तरीही आतून एकटेपणा जाणवतो.’

कर्करोगाचं निदान झाल्यानंतर आयुष्यात कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत आणि कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या नाहीत, याची जाणीव झाली, असेही मनीषा कोईराला म्हणाल्या. त्या म्हणाल्या, ‘मला आयुष्यानं दुसरी संधी दिली. त्यामुळे जे काही अनावश्यक होतं, ते सगळं मी बाजूला केलं. तुमच्या अस्तित्वाचा पाया तुमच्या मूल्यांशी जुळत नाही, अशा सगळ्या गोष्टी मी बाजूला केल्या.’

मनीषा असेही म्हणाल्या, ‘पूर्वी माझ्याबरोबर मित्रांचा:मोठा ग्रुप आणि बरंच मोठं सर्कल असायचं. आता मला माझ्या आयुष्यात खूप लोक नको आहेत. आयुष्यात कमी, पण अर्थपूर्ण लोकांचा सहवास हवा आहे. माझ्या कुटुंबातील लोक एकमेकांशी घट्ट जोडलेले असावेत, असं मला वाटतं. मी माझ्या आरोग्याची अजिबात काळजी घेत नव्हते; पण मला दुसरी संधी मिळाली आहे आणि त्यामुळे आता माझ्या आरोग्याला प्राधान्य देईन. माझ्या आयुष्यात आता चार–पाच गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

# स्पायडर–मॅन’ने हिंदुस्थानात रचला इतिहास

लहानांपासून मोठ्यांना भुरळ घालणारा ‘स्पायडर मॅन’ सिनेमा बॉक्स ऑफिसवर चांगलाच धुमाकुळ घालतोय. या सिनेमाने हिंदुस्थानात रेकॉर्ड ब्रेक कामगिरी केली असून इतिहास रचला आहे. या सिनेमाने अवघ्या काही दिवसात ५०० कोटीचा आकडा गाठला असून तो हिंदुस्थानात एवढी कमाई करणारा पहिला हॉलिवूड चित्रपट ठरला आहे.‘स्पायडर मॅन’ या सिनेमाने हिंदुस्थानात पहिल्या दिवशी ६०.६० कोटी रुपयांची कमाई करून सुरुवात केली. या सिनेमाला १७ हजार शो मिळाले. दुर्स ?या दिवशी ४९.३५, तिस–या दिवशी ७०.२५ कोटी, चौथ्या दिवशी ७७.७५ कोटी, पाचव्या दिवशी २३.८० कोटी, सहाव्या दिवशी २१.७५कोटी, सातव्या दिवशी १७ कोटी, आठव्या दिवशी १४.२५ कोटी रुपयांची कमाई केली. पहिल्या आठवड्यात चित्रपटाने ३३४.७५ कोटी रुपये कमावले.नवव्या दिवशी या सिनेमाने १५ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. १०व्या दिवशी सिनेमाने ३१ कोटी, ११व्या दिवशी ३४.७० कोटी, १२व्या दिवशी ७.६० कोटीचे कलेक्शन केले. या सिनेमाने एकूण ५०५.९३ कोटी रुपये कमावले असून ४२३.०५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळवला आहे. यामुळे, हा चित्रपट हिंदुस्थानात ५०० कोटींची कमाई करणारा पहिला हॉलीवूड चित्रपट ठरला.

# सोनाक्षीला रात्रीच्या वेळेस घरी आला विचित्र अनुभव



अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा ही बॉलिवूड मधली लोकप्रिय अभिनेत्री. सोनाक्षी सध्या ओटीटीवरील काही सिनेमांमध्ये झळकत आहे. अशातच सोनाक्षीची एक जुनी मुलाखत व्हायरल होत आहे. या मुलाखतीत सोनाक्षीने तिच्या घरी घडलेल्या विचित्र घटनेची (झरीरपीरश्र) माहिती सांगितली होती. ही घटना इतकी भयावह होती की, डोळे उघडायचीही तिच्यात हिंमत नव्हती. काय झालं होतं नेमकं ?सोनाक्षी सिन्हाने ’बॉलिवूड हंगामा’ला दिलेल्या मुलाखतीत तिच्या घरात घडलेल्या एका विचित्र घटनेची आठवण सांगितली होती. ती म्हणाली, ‘माझा आधी या गोष्टींवर विश्वास नव्हता, पण एक दिवस माझ्यासोबत माझ्याच घरात काहीतरी विचित्र घटना घडली, ज्यामुळे माझ्या विश्वासाला थोडा धक्का बसला. पण त्या दिवसानंतर मात्र असं काहीही घडलेलं नाही. मला वाटतं कदाचित ते एक स्वप्न असावं.’

त्या रात्रीबद्दल सांगताना सोनाक्षी सिन्हाने सांगितलं की, ती झोपली होती. पहाटेचे साधारण ४ वाजले होते. अभिनेत्री म्हणाली, ‘ते स्वप्न होतं की खरंच असं घडलं हे मला माहित नाही. कोणीतरी माझ्यावर वजन टाकतंय आणि मला उचलून घेत आहे, असं जाणवलं. मी इतकी घाबरले होते की माझे डोळे मी बंद केले. तिथे कोणी आहे की नाही हे पाहण्यासाठी डोळे उघडण्याची हिंमतही झाली नाही. सकाळ होईपर्यंत आणि उजेड दिसेपर्यंत मी डोळे उघडलेच नाहीत.’

# माझ्या होणा–या नव–यामध्ये हवाय असा गुण....



भारतीय क्रिकेटचा देव मानले जाणारे सचिन तेंडुलकर यांची लाडकी लेक सारा तेंडुलकर ही नेहमीच चाहत्यांच्या आणि सोशल मीडियाच्या चर्चेचा विषय ठरत असते. तिची फॅन फॉलोइंग एखाद्या बॉलिवूड अभिनेत्रीपेक्षा कमी नाही. ब ?याचदा तिचे नाव भारतीय क्रिकेटपटू शुभमन गिलसोबत जोडले जात असले, तरी तिने यावर कधीही थेट भाष्य केलेले नाही. मात्र, नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सारा तेंडुलकरने पहिल्यांदाच तिच्या आयुष्यातील नातेसंबंध, लग्न आणि होणा–या पतीबाबतचे विचार मनमोकळेपणाने मांडले आहेत. –आई–वडिलांचे नाते म्हणजे माझ्यासाठी आदर्श ’व्होग इंडिया’ला दिलेल्या मुलाखतीत सारा तेंडुलकरने आपल्या कुटुंबाबद्दल आणि लग्नाबद्दल मोठे खुलासे केले.

**इतिहासकार व्ही. के. राजवाडे यांच्या संशोधनानुसार, शहाजीराजांनी आपल्या मुत्सद्दी रणनीतीने आणि गनिमी काव्याने मोगल बादशाह शहाजहानच्या प्रचंड सैन्याचा डाव उधळून लावला.'कोंडीत सापडलेल्या मूर्तिजाची कीव करीत त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनी तहाच्या माध्यमातून त्याला आणि पर्यायाने निजामशाहीलाही जीवदान दिले खरे, परंतु मोंगलांचे सैन्य चाल करून येत असल्याची बातमी कळताच गर्भगळित झालेल्या मूर्तिजाने जुन्या अंतस्थ शत्रूला म्हणजे फतेखानाला तुरुंगातून सोडले, एवढेच नव्हे तर त्याला पुन्हा वजिरीदेखील बहाल केली.**

# शहाजहानला शह देणारा शहाजीराजा



इतिहासकार व्ही. के. राजवाडे यांच्या संशोधनानुसार, शहाजीराजांनी आपल्या मुत्सद्दी रणनीतीने आणि गनिमी काव्याने मोगल बादशाह शहाजहानच्या प्रचंड सैन्याचा डाव उधळून लावला.'कोंडीत सापडलेल्या मूर्तिजाची कीव करीत त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनी तहाच्या माध्यमातून त्याला आणि पर्यायाने निजामशाहीलाही जीवदान दिले खरे, परंतु मोंगलांचे सैन्य चाल करून येत असल्याची बातमी कळताच गर्भगळित झालेल्या मूर्तिजाने जुन्या अंतस्थ शत्रूला म्हणजे फतेखानाला तुरुंगातून सोडले, एवढेच नव्हे तर त्याला पुन्हा वजिरीदेखील बहाल केली. क्षणात तह मोडण्याची मूर्तिजाची ही कसरत पाहून आदिलशाही मुत्सद्दी थःझाले. फतेखानाचे त्या मुत्सद्द्यांशी वाकडे होते, त्यामुळे त्याने वजीर झाल्याबरोबर शहाजहानाशी संधान बांधले आणि थेट कारवाईच सुरू केली. त्याने मूर्तिजाला वेडा ठरवून तुरुंगात टाकले, त्या वेड्याच्या विश्वासातील पंचवीस वजनदार सरदार एका दिवसात ठार केले आणि सा–यावर कळस म्हणून दोनचार महिन्यांनी खुद्द बु–हाणशहाचा ऊर्फ मूर्तिजाचाही प्राण घेतलाष्ठ नंतर स्थिरस्थावर झालीशी वाटून फतेखान शहाजहानाशी उरमटपणाने वागू लागला. शहाजहानाने लगेच सैन्य पाठवून त्याला नरम केले, आठ लाख रुपये नजर घेऊन व दरसाल खंडणी ठरवून निजामशहाला आपला मांडलिक बनवले'ष्ठ

शहाजीशी थेट निगडित असा पुढचा टप्पाही त्यांनी लगेच सांगून टाकला. त्यांनी लिहिले, 'निजामशाही अंकित झाल्यावर व शहाजीला मनसबदार बनविल्यावर एकट्या आदिल शाहीचा आपण केव्हाही फडशा पाडू, असा शहाजहानाचा मतलब होता; परंतु तो शहाजीने फिसकटून टाकिला. मनसबेवर लाथ मारून व तह धाब्यावर बसवून तो आदिलशाही मुत्सद्द्यांस मिळाला.'

शहाजीराजाच्या नेतृत्वगुणांचे दर्शन घडवीत त्यांनी जे सविस्तर वर्णन केले, त्यातला आणखी एकच नमुनेदार उल्लेख पाहून नंतर आपल्याला त्यांच्या मुख्य भाष्याची दखल घ्यायची आहे. एक बेडूकउडी मारून शहाजहान व शहाजी या दोघांशीही संबंधित अशा थोड्या पुढच्या टप्प्याची राजवाड्यांनी केलेली मांडणी वाचकांसमोर ठेवावीशी वाटते. त्यांनी लिहिले, 'शहाजहानाने आपल्या प्रचंड सेनासमुद्राचे चार भाग केले. पैकी एक भाग कुतुबशहाला अडविण्याकरिता व एक भाग आादिलशहाच्या व शहाजीच्या मध्ये घालण्याकरिता पाठवून दोन भाग शहाजीला जमीनदोस्त करण्याकडे त्याने योजिले.आड पडण्याऐवजी कुतुबशहा ताबडतोब शरण आला, कारण आदिलशहाच्या जुलमापासून मुक्त करणारा कोणी तरी प्रबल वाली त्याला हवाच होता. तेव्हा त्याच्यावर पाठविलेले सैन्य आदिलशहावर धाडिलेल्या सैन्याच्या मदतीला गेले. आदिलशहावर जे सैन्य पाठविले होते, त्याचा मुख्य रोख आदिलशहाला चीत करण्याचा नसून शहाजीला दक्षिणदिशेने कोंडण्याचा होता. तात्पर्य, उत्तरेकडून, पूर्वेकडून व दक्षिणेकडून शहाजीचा कोंडमारा करण्याचा ह्या मोंगली सैन्याच्या चारहि तुकड्यांचा बेत होता. उघडच आहे, लढाईचा मुख्य विषय शहाजी होता!'ष्ठ

शहाजहानाच्या या योजनेला शहाजीराजाने कसा शह दिला, ते सांगताना राजवाड्यांनी पुढे लिहिले, 'होता होईल तो सर्व मोहीम पावसाळा सुरू होण्यापूर्वी चार महिन्यांत खलास व्हावी, अशी शहाजहानाची योजना आहे, विजापूरकरांना व आपल्याला शहाजहान विभक्त करणार, हे ओळखून शहाजीने प्रथम लढाईचे तोंड आंगावर उत्तरेकडून नगर, चांभारगोंदे, बारामती, नीरथड या दिशेने दक्षिणेकडे घेत घेत आदिलशाहीच्या कोल्हापूर, मिरज व रायबाग प्रांतांपर्यंत नेले आणि चांदवडच्या डोंगराजवळच्या सरहद्दीवरील सुमारे पंचवीस किल्ले आस्ते आस्ते विशेष हातघाईवर न येता बरसात लागेतोपर्यंत एकेक करून सोडून दिले. इकडे आदिलशहाने शहापूरचे धरण फोडून विजापुरा भोवती वीसपंचवीस मैल पाणीच पाणी करून देऊन शत्रूला कुंठित केले. आदिलशाही प्रांताच्या आश्रयाने हुलकावण्या दाखवीत दाखवीत शहाजीने शहाजहानाच्या सरदारांना दौड करावयाला लावून सडकून घुमविले आणि दमविले. शहाजीचे अर्धेअधिक किल्ले आणि सबंध कोकणप्रांत दोनअडीच महिने लढूनहि शहाजहानाच्या हाती लागले नाहीत व पुढील दीड महिन्यात हाती लागतील, अशीहि खात्री पटेना.

# अशनी-लघुग्रहांचा धांडोळा!

सूर्यापासून आपली पृथ्वी सुमारे १५ कोटी किलोमीटर अंतरावर आहे, असं आपण जाणतो आणि याच अंतराला एक खगोलीय युनिट किंवा 'एकक' म्हटलं जातं. तंतोतंत गणितात ते १४ कोटी ६० लाख किलोमीटर आहे. याच 'एकका'चा वापर करून, सूर्यापासून सर्व ग्रहांची अंतरं किती असावीत याची एक पद्धत 'टायटिअसबोड लॉ' या नावाने प्रसिद्ध आहे. त्याला नुसतं 'बोड लॉ'सुद्धा म्हटलं जातं, परंतु त्याची मांडणी जोहान टायटिअस आणि जौहान बोड यांनी केली आहे.

सौरमालेतील ग्रहांची परस्परातील अंतरं या अनुमानावर आधारित आहेत. त्याद्वारेच मंगळ आणि गुरू यांच्यामध्ये असलेला अशनींचा पट्टा आणि त्यातील 'सेरेस'चं अंतर यथायोग्य ठरलं. हा थोडा 'अनुमानात्मक' किंवा इम्पिरिकल सिद्धांत आहे असं म्हणण्याचं कारण म्हणजे, त्यानुसार गुरूपलीकडच्या सर्वच ग्रहांची अंतरे या निरीक्षणात बसत नाहीत. मात्र मंगळ आणि गुरूमध्ये असलेला एखादा ग्रह सौरमालेच्या आरंभीच फुटून त्याचे तुकडे अशनी पट्ट्याच्या स्वरूपात सूर्यापासून विशिष्ट अंतरावरून फिरतात हे खरं ठरलं.

काय आहे हा फॉर्म्युला? सोपं करून सांगायचं तर ०,३,६,१२,२४,४८ अशा क्रमाने एकेका ग्रहाची 'कक्षा' ठरवली तर त्यामध्ये ४ मिळवून त्या संख्येला १० ने भागलं तर जो ग्रह सूर्यापासून किती खगोलीय एकक (१५ कोटीच्या तुलनेत आहे ते लक्षात येतं. यानुसार बुध सूर्यापासून ०.४ खगोलीय एकक, शुक्र ०.७ एकक, पृथ्वी १ एकक, मंगळ १.६ खगोलीय एकक (ए. यू.) अशनींचा पट्टा २.८ एकक, गुरू ५.२ एकक आणि शनी १० एकक (किंवा सूर्य–पृथ्वी अंतराच्या १० पट



अंतरावर) आहे हे सिद्ध झालं. मात्र त्यापुढच्या युरेनिअस आणि नेपच्युन या ग्रहांबाबतीत हे गणिती अनुमान यशस्वी ठरलं नाही.या सिद्धांत म्हणण्यापेक्षा सूत्रानुसार मंगळ आणि गुरूच्या मध्यभागी असलेला अशनी पट्टा निश्चित झाला हे महत्त्वाचं. असे अनेक छोटे–मोठे अशनी अवकाशात इतस्ततः फिरत असतात. 'निअर अर्थ' म्हणजे पृथ्वीनिकट असणा?या आणि कदाचित कधीकाळी पृथ्वीवर आदळू शकणा?या अशनींची संख्याही मोठी आहे.

यापेक्षा आणखी कुतूहलाची गोष्ट म्हणजे लघुग्रह हे अशनींपेक्षा थोडे मोठे असतात. त्यांचं स्वरूप जवळून जाणून घेण्यासाठीही काही शोधमोहिमा कार्यान्वित झाल्या. यातील पहिल्या मोहिमेत 'इरॉस' या अशनीभोवती फेरी मारून त्यावर उतरले ते निअर शूमेकर. त्यानंतर जपानने हायाबुसा–१ आणि २ अशी यानं इटोकावा आणि रुग्यु लघुग्रहांकडे धाडली.

ओसिरिस शोधयानाने बेन्नू नावाच्या महापाषाणावरून काही दगड–मातीचे नमुने गोळा केले आणि पुढे ते 'अ?पोफिस'कडे रवाना झाले. मंगळ–गुरू यांच्या मधल्या पट्ट्यातील व्हेस्टा आणि सेरेस या लघुग्रहांना 'डॉन' यानाने फेरी मारली आणि त्यांचे बारकाईने निरीक्षण केले. ल्युसी नावाचे शोधयान अनेक ट्रोजन म्हणजे विशिष्ट बिंदूंवर अडकलेल्या लघुग्रहांचा शोध घेत फिरले. सायचे नावाचे यान केवळ धातुजन्य अशनी आणि लघुग्रहांचा शोध घेण्याच्या कामगिरीवर निघाले.२०२२ मध्ये नासाच्या 'डार्ट' या नावाने डिमॉर्फोस या डायडिमॉस या लघुग्रहाभोवती फिरणा?या लहान लघुग्रहाला मुद्दाम धडक देऊन (ताशी २२००० कि.मी. वेगाने) त्याची कक्षा यशस्वीरीत्या बदलली. हा प्रयोग एवढ्यासाठी केला गेला की, भविष्यात एखादा लघुग्रह, अशनी पिंवा धूमकेतू यांचा धोका पृथ्वीला निर्माण होणार असेल तर त्याची कक्षा एखादी 'धडक' देऊन बदलता येऊ शकेल. २००५ मध्ये 'डीप' यानाने अशाच प्रकारे टेम्पल – १ या धूमकेतूला धडक दिली होती.

लघुग्रह किंवा अशनींचा शोध आणि निरीक्षण केवळ ते पृथ्वीला धोकादायक ठरतील का, एवढ्याच मर्यादित उद्दिष्टाने केले जात नाही. कित्येक अशनी पृथ्वीच्या दिशेने कधीच येणार नाहीत याची खात्री असूनही त्यांचे जवळून निरीक्षण, इतर अनेक कारणांसाठी महत्त्वाचे ठरते.

यामध्ये जपानच्या अंतराळ संशोधन संस्थेने 'इटोकावा' या लघुग्रहांवर हायाबुसा – : – २ ही मोहीम आखली. डॉ. हिडेओ इटाकावा यांचे नाव या लघुग्रहाला देण्यात आले. जपानी भाषेत हायाबुसा म्हणजे वेगाने उडणारा ससाणा. तो ताशी ३०० कि.मी. वेगाने उडतो. त्याच्या नावाच्या वेगवान यानाचे उड्डाण ९ मे २०२३ रोजी झाले होते. त्याने तब्बल सात वर्षे अंतराळात प्रवास करून २५१४३ इटोकावा या लघुग्रहावर उतरून आणि तेथील दगड–मातीचे नमुने पृथ्वीवर आणून अंतराळी वस्तूंच्या संशोधनाचे नवे दालन खुले केले.अशा प्रकारच्या शोध–मोहिमांमधून अंतराळाचा अधिक चांगला परिचय आपल्याला होऊ शकतो.

# मणिपूर नंतर अरुणाचल प्रदेश

आधीच ईशान्येकडील मणिपूर हे राज्य वांशिक मुद्द्यावर गेली तीन वर्षे धगधगत असताना आसाम – अरुणाचल प्रदेशच्या सीमेवर गेले चार दिवस सुरू असलेला संघर्ष चिघळणार नाही याची खबरदारी दोन्ही राज्यांना तसेच केंद्राला वेळीच घ्यावी लागणार आहे. या दोन राज्यांच्या सीमेवर आसामी विद्यार्थी संघटनांनी आर्थिक कोंडी केली असून, ठिकठिकाणी राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला. परिणामी अरुणाचल प्रदेशमध्ये जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ लागला. चार दिवसांपूर्वी दोन्ही राज्यांच्या सीमेवर अतिक्रमणावरून हिंसक संघर्ष झाला. अरुणाचल प्रदेशमधील नागरिकांकडून सीमेवरील प्रदेशात जमीन बळकावण्याचा प्रयत्नांना आसामी नागरिकांनी आक्षेप घेतला होता. या वादाला हिंसक वळण लागले. अरुणाचल प्रदेशच्या हद्दीतून सीमेवरील आसामी नागरिकांवर गोळीबार करण्यात आला व त्यात ११ जण जखमी झाले. यापैकी चौघांची प्रकृती चिंताजनक होती. आता सर्वांची प्रकृती सुधारत आहे हे नक्कीच दिलासजनक. या गोळीबाराच्या निषेधार्थ आसाममधील विद्यार्थी तसेच स्थानिक संघटनांनी अरुणाचल प्रदेशची आर्थिक कोंडी सुरू केली. या कोंडीच्या दुर्स?या दिवशी पुन्हा हिंसाचार झाला. आसामी संघटनांवर अरुणाचल प्रदेशाच्या हद्दीतून दगडफेक करण्यात आली. शेवटी हिंसक जमावाला पांगविण्यासाठी अरुणाचल प्रदेश पोलिसांना गुरुवारी हवेत गोळीबार करावा लागला. यामुळे आसामच्या बाजूच्या धेमाजी जिल्ह्यातील परिस्थिती कमालीची तणावपूर्ण बनली आहे. या दोन्ही राज्यांमध्ये भाजपची सत्ता असल्याने या संघर्षावर शांततापूर्ण मार्ग काढण्याचे आव्हान दोन्ही मुख्यमंत्र्यांसमोर आहे.



ईशान्येकडील सात राज्यांचा उल्लेख 'सात बहिणी' (सेव्हन सिस्टर्स) असा केला जातो. त्यांच्यामध्ये आसाम ही मोठी बहीण मानली जाते. कारण भौगोलिक, आर्थिकदृष्ट्या आसाम हे मोठे राज्य. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिसवा सरमा हे भाजप्रणीत ईशान्य लोकशाही आघाडीचे समन्वयक. काँग्रेसमधून भाजपवासी झालेल्या सरमा यांनी ईशान्य भारतात भाजपला ताकद मिळवून दिली. सध्या मिझोरामचा अपवाद वगळता सातपैकी सहा राज्यांमध्ये भाजपप्रणीत रालोआची सत्ता सरमा यांना आसामच्या मुख्यमंत्रीपदाच्या रूपाने त्याचे बक्षीस मिळाले. खरे तर ईशान्येकडील राज्यांचे नेतृत्व आसामकडे असताना मुख्यमंत्री सरमा यांनी संयमी भूमिका घेऊन राज्याराज्यांमधील संबंध सुधारण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. सध्या आसाम – अरुणाचल प्रदेशची सीमा धुमसत आहे. गेल्याच महिन्यात आसाम – मेघालय सीमेवर हिंसक संघर्ष झाला. तसेही आसामचा मेघालय, अरुणाचल प्रदेश, मिझोराम आणि नागालॅण्ड या चार राज्यांशी जुनाच सीमा वाद आहे. वास्तविक, मोठी बहीण म्हणून आसामच्या नेतृत्वाने थोडी नमती भूमिका घेऊन समझोता घडवून आणणे आवश्यक होते. तसा मेघालयबरोबर सरमा यांनी करार केला, तरीही दोन्ही राज्यांमधील कटुता कायम आहे.

अरुणाचल प्रदेशच्या सीमेवर नव्याने संघर्ष निर्माण झाला असला तरी या दोन राज्यांमध्ये गेली अनेक वर्षे वाद कायम आहे. १९७२ पर्यंत अरुणाचल प्रदेश हा आसामचाच भाग होता. १९७२ मध्ये या राज्याला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आला तर १९८७ मध्ये राज्याचा दर्जा मिळाला. ही राज्ये स्वतंत्र झाली, पण तरीही तेव्हापासून या दोन राज्यांमध्ये सीमावाद अजूनही सुरूच आहे. या दोन राज्यांची मिळून सुमारे ८०० कि.मी. अंतराची सीमा आहे. त्यात आसामधील आठ तर अरुणाचल प्रदेशमधील १२ जिल्ह्यांचा समावेश होतो. अरुणाचल प्रदेशने सुमारे १६ हजार हेक्टर्स जागेवर अतिक्रमण केल्याचा आसाम सरकारचा दावा आहे. ही आकडेवारी अरुणाचल प्रदेश सरकारला माःमान्य नाही. या दोन राज्यांमधील सीमावाद सोडविण्यासाठी जुलै २०२२ मध्ये करार करण्यात आला असला तरी अजूनही सीमावाद सुटू शकलेला नाही. आसाममधील १२३ गावांवर अरुणाचल प्रदेशने केलेला दावा हा कळीचा मुद्दा ठरला होता. आसाम व आजूबाजूच्या राज्यांमध्ये भाजप किंवा रालोआची सत्ता असताना एकत्र बसून तोडगा काढणे शक्य आहे. मणिपूरबाबत केंद्रातील भाजपचे धोरण पूर्णपणे फसले. तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाला तरी मणिपूरमधील परिस्थिती अजूनही आटोक्यात येऊ शकलेली नाही. आतापर्यंत मैतेई – कुकी– झू असा वांशिक संघर्ष होता. आता हा संघर्ष कुकी–झू विरुद्ध नागा असे त्याला वळण लागले. ईशान्येकडील राज्ये कायम धगधगत राहणे हे देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने हितकारक नाही.

# 'इस्लामी नेटो'च्या शक्यतेचे आव्हान!

पाकिस्तान, तुर्किये आणि सौदी अरेबिया यांनी एकत्र येत 'मक्का संयुक्त संरक्षण करार' केल्याने पश्चिम आशियात 'इस्लामी नेटो' अस्तित्वात आल्याची चर्चा रंगली आहे. एका देशावरील हल्ला हा तिन्ही देशांवरील हल्ला मानण्याच्या या कराराचा भारताच्या सुरक्षेवर आणि राजनैतिक समीकरणांवर काय परिणाम होणार, याचा हा विश्लेषणात्मक आढावा.

पाकिस्तान, तुर्किये आणि सौदी अरेबिया या तीन राष्ट्रांनी एकत्र येऊन केलेल्या 'मक्का संयुक्त संरक्षण करारा'मुळे सध्या अशांत असलेल्या पश्चिम अशियाई टापूत इस्लामी राष्ट्रांचा 'नेटो' अस्तित्वात आल्याचे निरीक्षण नोंदवण्यात येत आहे. या तीन राष्ट्रांपैकी एका राष्ट्रावर हल्ला झाला तरी तिन्ही देशांवर हल्ला आहे, असे मानले जाईल, अशी 'नेटो' संघटनेच्या करारासारखी मुख्य तरतूद या करारात असल्याचे या देशांच्या नेत्यांनी जाहीर केले आहे.

कराराचे तपशील अद्याप जाहीर झाले नाहीत, तसेच इस्लामी देशांचा 'नेटो'सारखा सुरक्षा–संघ उभारण्याची कल्पनाही सध्या बाल्यावस्थेत आहे; तरीदेखील भारतावर या कराराचे काय परिणाम होऊ शकतात याची चर्चा आतापासून सुरू होणे रास्तच. पण 'या कराराने तिघाही राष्ट्रांची संयुक्त जरब (डिटरन्स) वाढेल' असा आशावाद तीन्ही देश व्यक्त करतात, ती जरब कुणावर आणि कशासाठी? याचे सध्याचे उत्तर 'इराण' हेच आहे.

इराणने, तसेच इराणचा पाठिंबा असलेल्या हूथी बंडखोरांनी सौदी अरेबियातल्या आर्थिक महत्त्वाच्या लक्ष्यांवर मार्चपासून क्षेपणास्त्र हल्ले केलेले आहेत. तसेच सौदी अरेबियातून इंधन घेऊन जाणा?या जहाजांची कोंडी केली जात आहे. पण त्यावर हा करार तातडीने उपयोगी पडेल अशी शक्यता कमी. इराणच्या वाढत्या हल्ल्यांमुळे अन्य देशही संभाव्य 'इस्लामी नेटो'मध्ये सहभागी होतील, ही अटकळ चुकीची नसली तरी ती प्रक्रिया वेळखाऊ असू शकते. त्यामुळे इराण हे या कराराचे तात्कालिक कारण मानले तरी, पुढल्या काळात हा करार भारताची डोकेदुखी कितपत वाढवणार, या प्रश्नाकडे येणे अधिक बरे.

यात भारताला खरा धक्का आहे तो सौदीच्या वाढत्या पाकिस्तान–सौहार्दाचा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कुठल्याही देशातील सर्वोच्च मानला जाणारा सन्मान मिळाल्यावर, 'ही या देशाशी मैत्रीच्या नव्या पर्वाची सुरुवात' असे म्हणतात, तसा नव–मैत्रीप्रसंग सौदीबाबत दहा वर्षांपूर्वीच (एप्रिल २०१६ मध्ये) घडून गेलेला होता. मात्र गेल्या वर्षी 'ऑपरेशन सिंदूर'नंतर सौदी अरेबिया आणि पाकिस्तान यांच्यात 'दोहोंपैकी एका देशावरील हल्ला हा दोघाही देशांवर हल्ला मानला जाईल आणि तसाच प्रतिसाद दिला जाईल' असा करार केला. यात तुर्कियेची भर आता पडली आणि हा करार तिघांचा झाला. त्यात आणखीही देशांची भर पडेल असे तुर्कियेचे परराष्ट्रमंत्री म्हणतात.



तुर्किये हा आजघडीला १० अब्ज डॉलरहून अधिक किमतीच्या संरक्षण–उत्पादनांची (शस्त्रास्त्रे व ड्रोन आदींची) र्निःनिर्यात करणारा देश असल्याने त्यास संरक्षण–सहकारी हवे असणे साहजिक. त्याने तुर्कियेतील सध्याच्या चार हजारांहून अधिक लहानमोठ्या संरक्षण उत्पादन कंपन्या अधिक वाढू शकतील. अमेरिकेनेही संरक्षण–सहकार्यातून हेच केले. पण याच तुर्कियेची ड्रोन 'ऑपरेशन सिंदूर'च्या प्रतिकारासाठी पाकिस्तानने वापरली. मशीनगनसह उडणारी 'अ?सिगार्ड सोन्गर' ड्रोनही त्यात होती आणि ती भारताने पाडली, असा दावा त्या वेळी भारतीय प्रवक्तभ्यांनी केला होता.

यानंतर तुर्कियेशी आपले संबंध ताणले जाणे एकवेळ ठीक. पण सौदी? ज्या देशात २७ लाखांहून अधिक भारतीय कामधंद्यानिमित्त राहातात, आपले पंतप्रधान ज्या देशाशी दशकभरापूर्वीच सहकार्याचे पर्व सुरू करतात, त्याने पाकिस्तानवरील हल्ला हा स्वत:वरचा हल्ला मानणारा करार करून, तो आणखी वाढवावा याची कोणतीही राजनैतिक जबाबदारी न घेता खापर फक्त सौदी राजपुत्र मोहम्मद बिन सलमान आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर फोडायचे असेल, तर मग ठीकच! अमेरिकेची तळी उचलणारे तीन देश एकत्र आले म्हणावे, तरी धोके स्पष्ट आहेत. पाकिस्तान गेली अनेक वर्षे भारतात अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे.गेले काही महिने अफगाणि स्तानशीही सीमेवर संघर्ष सुरू आहे. सौदीवर सध्या हल्ले सुरू आहेत. तुर्कियेचा कुर्दिश बंडखोरांशी वर्षानुवर्षे हिंसक संघर्ष सुरूच आहे, तसेच इस्त्रायलशीही तणावपूर्णच संबंध आहेत. या तिघांना भारत मित्र वाटत नाही, हे उघड आहे. पण या तिघांनी आणखी काही इस्लामी सहकायांचे स्वागत करण्याची भूमिका घेतली आहे. अशी स्थिती येणार, हे गृहीत धरून भारत आता आर्मेनिया ते ग्रीस अशा पश्चिम आशियाच्या परिघाबाहेरच्या – देशांशी सहकार्य वाढवण्याची आगळीवेगळी नीती आखतो आहे, असे काही कथित तज्ज्ञांचे म्हणणे. ते खरे मानले तरी 'इस्लामी नेटो'च्या संभाव्य आव्हानापुढे भारताची केवळ संरक्षणविषयक नव्हे तर राजनैतिक भूमिकाही कसाला लागणार आहे.

# भारताला १५ ऑगस्टलाच स्वातंत्र्य का मिळाले?

दरवर्षी १५ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहात स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा केला जातो. शाळा, महाविद्यालये, कार्यालये आणि विविध संस्थांमध्ये ध्वजारोहण, देशभक्तीपर गीते, भाषणे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र, १५ ऑगस्ट हा केवळ उत्सवाचा दिवस नाही, तर भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी असंख्य स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या संघर्षाची आणि त्यागाची आठवण करून देणारा दिवस आहे.

**१५ ऑगस्टलाच का मिळाले स्वातंत्र्य?**

भारताला सुमारे २०० वर्षांच्या ब्रिटिश राजवटीनंतर १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आपला प्रभाव वाढवला आणि पुढे ब्रिटिश सरकारचे भारतावर थेट राज्य सुरू झाले. ब्रिटिश राजवटीदरम्यान भारतीयांना अनेक प्रकारच्या अन्यायाला सामोरे जावे लागले.

या राजवटीविरोधात देशभरात हळूहळू असंतोष वाढत गेला. १८५७ च्या उठावापासून स्वातंत्र्याच्या अंतिम लढ्यापर्यंत अनेक आंदोलने झाली. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली असहकार आंदोलन, सविनय कायदेभंग आंदोलन आणि भारत छोडो आंदोलन यांसारख्या चळवळींनी स्वातंत्र्यलढ्याला मोठी ताकद दिली.

**अनेक स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान**

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक नेत्यांनी आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. महात्मा गांधींनी सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने ब्रिटिश सत्तेविरोधात मोठा लढा उभारला. पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलाम आझाद यांच्यासह अनेक नेत्यांनी स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली.

याशिवाय भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, राजगुरू, सुखदेव आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांसारख्या क्रांतिकारकांनीही देशाच्या स्वातंत्र्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महिलांचाही स्वातंत्र्यलढ्यात मोठा सहभाग होता. सरोजिनी नायडू, अरुणा आसफ अली, कस्तुरबा गांधी यांसारख्या महिलांनी आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेतला.



स्वातंत्र्य मिळवण्याचा हा प्रवास एका व्यक्तीचा किंवा एका चळवळीचा परिणाम नव्हता. देशातील विविध भागांतील असंख्य लोकांच्या संघर्षामुळे स्वातंत्र्याची पहाट उगवली.

**१५ ऑगस्ट १९४७ रोजी काय घडले?**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून दिल्लीतील लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित केले. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्याचा ऐतिहासिक क्षण देशवासीयांसोबत साजरा केला.तेव्हापासून दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावर पंतप्रधानांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. त्यानंतर देशाला संबोधित करताना पंतप्रधान सरकारच्या कामांचा आढावा आणि भविष्यातील योजनांबाबत देशवासीयांशी संवाद साधतात.

**स्वातंत्र्यदिनाचे महत्त्व काय?**

स्वातंत्र्यदिन आपल्याला केवळ भूतकाळाची आठवण करून देत नाही, तर देशाप्रती असलेल्या आपल्या जबाबदारीची जाणीवही करून देतो. स्वातंत्र्याचा अर्थ केवळ परकीय सत्तेपासून मुक्त होणे नाही, तर देशाला अधिक चांगले बनवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी पार पाडणेही आहे.

प्रामाणिकपणा, स्वच्छता, पर्यावरणाचे संरक्षण, कायद्याचा आदर, शिक्षणाला महत्त्व देणे आणि इतर नागरिकांचा सन्मान करणे, या छोट्या गोष्टींमधूनही आपण देशाच्या प्रगतीत योगदान देऊ शकतो.

**तिरंग्याला विशेष महत्त्व**

१५ ऑगस्टच्या दिवशी तिरंगा सर्वांचे लक्ष वेधून घेतो. केशरी रंग शौर्य आणि त्यागाचे, पांढरा रंग शांतता आणि सत्याचे, तर हिरवा रंग समृद्धी आणि प्रगतीचे प्रतीक मानला जातो. तिरंग्याच्या मध्यभागी असलेले अशोकचक्र सतत पुढे जाण्याचा संदेश देते.म्हणूनच १५ ऑगस्ट हा फक्त सुट्टीचा दिवस न मानता, स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण, देशाच्या इतिहासाचा अभिमान आणि आपल्या जबाबदा–यांची जाणीव करून देणारा दिवस म्हणून साजरा केला पाहिजे. स्वातंत्र्याची ही अमूल्य देणगी पुढच्या पिढ्यांसाठी जपणे हीच प्रत्येक भारतीयाची खरी जबाबदारी आहे.

**१५ ऑगस्ट २०२६ ला ७९ वर्षे पूर्ण की ८० वा स्वातंत्र्यदिन?**

येत्या १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारत आपला स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी सज्ज होत आहे. मात्र, दरवर्षीप्रमाणे यंदाही एक प्रश्न नागरिकांच्या मनात उपस्थित होत आहे, तो म्हणजे २०२६ चा स्वातंत्र्यदिन हा ७९ वा आहे की ८० वा? या प्रश्नाचे उत्तर आपण 'स्वातंत्र्याची वर्षे' मोजतोय की 'सोहळ्यांची संख्या', यावर अवलंबून आहे.

७९ वर्षे की ८० वा सोहळा? समजून घ्या फरक

या गोंधळाचे मुख्य कारण म्हणजे 'वर्धापन दिन' आणि 'क्रमांकानुसार साजरा होणारा सोहळा' यांमधील फरक. १५ ऑगस्ट १९४७ रोजी जेव्हा भारत स्वतंत्र झाला, तो देशाचा १ ला स्वातंत्र्यदिन होता. १५ ऑगस्ट १९४८ रोजी स्वातंत्र्याला १ वर्ष पूर्ण झाले, पण तो २ रा स्वातंत्र्यदिन सोहळा होता.

१५ ऑगस्ट २०२६ रोजी भारत कितवा स्वातंत्र्यदिन साजरा करणार, यावरून नागरिकांमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही गोंधळ निर्माण झाला आहे. या प्रश्नाचे सोपे गणित असे की, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचा पहिला स्वातंत्र्यदिन साजरा झाला होता. या हिशोबाने १५ ऑगस्ट २०२६ रोजी भारताच्या स्वातंत्र्याला ७९ वर्षे पूर्ण होत असली, तरी हा देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन सोहळा असेल. वर्धापन दिन आणि सोहळ्याची संख्या यातील हा सोपा फरक असून लाल किल्ल्यावर मुख्य शासकीय सोहळा पार पडणार आहे

.स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभरात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि ध्वजारोह समारंभांचे आयोजन केले जाते. या राष्ट्रीय उत्सवाचा मुख्य शासकीय समारंभ राजधानी नवी दिल्लीतील ऐतिहासिक लाल किल्ल्यावर पार पडेल. या प्रसंगी माननीय पंतप्रधान लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकवतील आणि देशवासीयांना उद्देशून पारंपरिक भाषण करतील.

# स्वातंत्र्य दिन

स्वातंत्र्य दिन हा भारताचा सर्वात महत्त्वाचा आणि अभिमानास्पद राष्ट्रीय सण आहे. दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी संपूर्ण भारतात स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७रोजी आपल्या देशाला ब्रिटिशांच्या सुमारे १५० वर्षांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, नेताजी सुभाषचंद्र बोस आणि लोकमान्य टिळक यांच्यासारख्या अनेक महान देशभक्तांनी आणि क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि त्यागामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात श्वास घेत आहोत. भारताला सोन्याचा पक्षी म्हणायचे त्या दिवसांची गोष्ट आहे. १७ व्या शतकात मुघलांचे राज्य असताना ब्रिटीश भारतात व्यापारासाठी आले. हळूहळू व्यापाराच्या बहाण्याने इंग्रजांनी आपले लष्करी सामर्थ्य वाढवले आणि युद्धात अनेक राजांना फसवून त्यांचे प्रदेश जिंकले. १८ व्या शतकापर्यंत, ईस्ट इंडिया कंपनीच्या नावाखाली आपले वर्चस्व प्रस्थापित करून, त्याने आपल्या सभोवतालचे क्षेत्र आपल्या अधीन केले.



आपण गुलाम झालो आहोत याची जाणीव झाली होती. आता आम्ही थेट ब्रिटीश राजवटीत होतो. सुरुवातीला इंग्रजांनी आपल्याला शिक्षण देऊन किंवा आपल्या विकासाच्या जोरावर आपल्या गोष्टी लादायला सुरुवात केली की नंतर हळूहळू तो त्यांच्या वागण्यात गुंतला आणि ते आपल्यावर राज्य करू लागले. इंग्रजांनी आमचा शारीरिक आणि मानसिक छळ केला. या काळात अनेक युद्धेही झाली, त्यातील सर्वात प्रमुख म्हणजे दुसरे महायुद्ध, ज्यासाठी भारतीय सैन्यात मोठ्या प्रमाणात भरती करण्यात आली. भारतीयांचे स्वतःच्या देशात अस्तित्वच नव्हते, इंग्रजांनी जालियनवाला बाग सारखे हत्याकांडही केले आणि भारतीय फक्त त्यांचे गुलाम म्हणून राहिले.

**राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थापना**

या विरोधाभासी वातावरणात २८ डिसेंबर १८८५ रोजी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थापना ६४ जणांनी केली. ज्यामध्ये दादाभाई नौरोजी आणि ए.ओ.ह्यूम यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आणि हळूहळू क्रांतिकारी उपक्रम राबवले जाऊ लागले, लोक पक्षात सहभागी होऊ लागले.

याच क्रमाने इंडियन मुस्लिम लीगची स्थापनाही झाली. असे अनेक पक्ष पुढे आले आणि त्यांच्या अतुलनीय योगदानामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. ज्यासाठी अनेक वीरांना गोळ्या घातल्या आणि अनेकांना फासावर लटकवले गेले, अनेक मातांनी संतान गमावली तर काही तरुणवयात विधवा झाल्या.

स्वातंत्र्य आणि फाळणीनंतर दरवर्षी आपण आपल्या अमर शूर सैनिकांचे आणि दंगलीत मारल्या गेलेल्या निष्पाप लोकांचे स्मरण करून स्वातंत्र्यदिन साजरा करतो. अमर जवानांची निश्चित संख्या नाही, कारण त्यात लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सर्वांचा समावेश होता.

जेव्हा संपूर्ण देश एकत्र आला, तेव्हा हे स्वप्न पूर्ण झाले. होय, काही प्रमुख देशभक्त होते ज्यांना दुर्लक्षित करता येत नाही जसे की फाशी देण्यात आलेले भगतसिंग, सुखदेव, राज गुरू, तसेच लाला लजपत राय, बाळ गंगाधर टिळक, सुभाषचंद्र बोस इ. ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू आणि इतर अनेक स्त्रियाही या कामात मागे नव्हत्या.

स्वातंत्र्य दिनाच्या उत्सवाची तयारी मोठ्या उत्साहात केली जाते, दरवर्षी आपले माननीय पंतप्रधान लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून तिरंगा फडकवतात. त्यानंतर राष्ट्रगीत आणि त्यांच्या भाषणासोबत काही देशभक्तीपर कार्यक्रम सादर केले जातात, ज्याचा आनंद आपण तिथे सादर करून किंवा तिथल्या थेट प्रक्षेपणातून घरी बसून घेऊ शकतो.

दरवर्षी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दुस–या देशातून बोलावले जातात. स्वातंत्र्यदिन हा आपला राष्ट्रीय सण असून त्यानिमित्त सर्व शाळा, महाविद्यालये, कार्यालये सर्व बंद असतात. हा असा सण आहे की संपूर्ण देश एकजुटीने साजरा करतो, फक्त प्रत्येकाची शैली वेगळी आहे. कोणी नवीन कपडे घालतात तर कोणी देशभक्तीपर गाणी ऐकून हा दिवस साजरा करतात.

**स्वातंत्र्याने सर्वांना समान हक्क दिले आहेत; पण अद्यापही अनेक ठिकाणी अनेकांच्या वाट्याला सोयी–सुविधांची समानता लाभलेली नाही. अलीकडचेच उदाहरण घ्या, पूरपाण्याने होता नव्हता तो संसार सोडून विस्थापित व्हावे लागलेले कोणते स्वातंत्र्य अनुभवत असतील?**

# स्वातंत्र्य; अपेक्षा व कर्तव्य!

जिकडे तिकडे स्वातंत्र्याचा जयघोष होणे स्वाभाविक आहे. पारतंत्र्यातून मुक्ततेसाठी ज्यांनी बलिदान दिले त्यांच्या शौर्याला, समर्पणाला सलाम करीत हे स्वातंत्र्य चिरायू राखण्यासाठी शपथबद्ध होण्याचा हा दिवस; पण तो साजरा करताना अजूनही ज्या घटकापर्यंत या स्वातंत्र्याची फळे पोहोचवता आली नाहीत, त्यांचा विचार दुर्लक्षिता येऊ नये. विशेषतः स्वातंत्र्य उपभोगताना कर्तव्याचा जो विसर पडताना दिसून येतो, त्याबाबत गांभीर्याने जनजागरण होणे गरजेचे ठरावे, अर्थात कायद्याने ते होणारे नाही; त्यासाठी मानसिक परिवर्तन घडून येणे व सामाजिकतेच्या दृष्टीने संवेदनशीलतेने मनाची कवाडे उघडली जाणे अपेक्षित आहे.

स्वातंत्र्याने लाभलेल्या लोकशाही व्यवस्थेत आज आपण जो मोकळा श्वास घेऊ शकतो त्यामागे अनेकांचे बलिदान व त्याग आहेत. ७३ वर्षांच्या या वाटचालीत विविध पातळ्यांवर प्रगतीचे नव–नवे टप्पे गाठले गेलेत, त्यासाठी त्या त्यावेळची सरकारे व त्यातील नेतृत्वकर्त्यांची दूरदृष्टी–ध्येय, धोरणे कारणीभूत ठरली आहेत हे कुणालाही नाकारता येऊ नये:आज आपण चंद्रावर पाऊल ठेवण्यापर्यंत प्रगतीचा टप्पा गाठला आहे. 'मेट्रो'च्या वेगाने हे मार्गक्रमण सुरू असून, दूरसंचार क्रांतीने हर एक व्यक्तीच्या हाती जणू जग एकवटले आहे. त्यातून प्रत्येक जण 'सोशल' झाला आहे. पण, या सोशल नेटवर्किंगच्या जंजाळात अडकून त्यावर उमटर्णा ?या अंगठ्यांवर तो समाधान मानू लागल्याने खरी



सामाजिकता काहीशी दूर होत चालल्याचेच दिसून यावे. तंत्रज्ञानातील प्रगतीने मनुष्याला जवळ आणले हे खरे; पण त्यातल्या गुरफटलेपणातून तो जवळ येऊनही दूरच राहत असतो. स्वातंत्र्यातले हे असले 'सोशल' शहाणपण आपल्याला कोठे नेणार हा यातील खरा प्रश्न आहे.

स्वातंत्र्याने सर्वांना समान हक्क दिले आहेत; पण अद्यापही अनेक ठिकाणी अनेकांच्या वाट्याला सोयी–सुविधांची समानता लाभलेली नाही. अलीकडचेच उदाहरण घ्या, पूरपाण्याने होता नव्हता तो संसार सोडून विस्थापित व्हावे लागलेले कोणते स्वातंत्र्य अनुभवत असतील?

गाव–खेड्यापर्यंत मोबाइल पोहोचला. संवादाची साधने सशक्त बनली; परंतु नदीच्या पुरामुळे संपर्काची, दळणवळणाची साधनेच खुंटलेल्यांचे काय? पुराच्या पाण्यात जीव मुठीत घेऊन नदी ओलांडणारे शाळकरी विद्यार्थी जागोजागी पाहावयास मिळतात, तेव्हा स्वातंत्र्याचा सूर्य त्यांच्या माथ्यावर उगवलाच नाही की काय, असा प्रश्न पडून गेल्याखेरीज राहात नाही.

आदिवासी वाड्या–पाड्यावर अत्यवस्थ झालेल्या रुग्णाला आजही झोळी किंवा डोली करून लगतच्या गावात न्यावे लागते यावरून प्रसूतीसाठी अडलेल्या माता–भगिनींचे काय हाल होत असावेत याची कल्पना करता यावी. अनेक मुलांच्या डोक्यावर वीटभट्टीवरील विटांच्या पाट्या किंवा त्यांच्या हातातले टपरीवरचे चहाचे ग्लास पाहता, शिक्षणाचा हक्क त्यांना कसा मिळवता येत असेल?

शाळेतल्या त्यांच्या खिचडीत कधी कधी जीव–जंतू शिजताना आढळून येतात. हे अपवाद या प्रकारात मोडणारे असले तरी स्वातंत्र्याला इतका कालखंड लोटूनही जर मूलभूत बाबींत अनास्था व उपेक्षाच दिसून येणार असेल तर प्रश्न उपस्थित होणारच.

महत्त्वाचे म्हणजे, स्वराज्याकडून सुराज्याकडे वाटचाल करताना आपण स्वातंत्र्य पुरेपूर उपभोगतो; परंतु कर्तव्याचा तितकासा विचारच करताना दिसत नाहीत. परदेशातील स्वच्छता अगर शिस्तीचे तोंडभरून गोडवे गाताना आपल्याकडे मात्र साधा वाहतुकीचा नियम पाळून सिग्नल न तोडण्याचे भान बाळगले जात नाही. रस्त्याने चालताना कुठेही व कसाही कचरा फेकून देण्यात कुणालाही वावगे वाटत नाही. पूरपाण्याने अनेकांचे संसार वाहून जात असताना अनेकजण पुरासोबतचे 'सेल्फी' घेण्यात दंग दिसतात, अखेर पोलिसांना जमावबंदी घोषित करून कायद्याचा बडगा उगारण्याची वेळ येते. म्हणजे, आपल्याला कर्तव्य कळत नाही, दंडुक्याचीच भाषा कळते. तेव्हा स्वातंत्र्यातल्या या स्वैरपणाला आटोक्यात आणणे म्हणूनच गरजेचे आहे.

त्यासाठी मानसिक मशागतच कामी येणारी आहे. स्वातंत्र्यदिन साजरा करीत असताना यंत्रणांकडूनच्या अपेक्षा घडीभर बाजूस ठेवून, व्यक्तिगत पातळीवर आपल्याला काय देता येईल व कसे वागता येईल जेणेकरून देशाच्या उन्नयनात, प्रगतीत व सुराज्याला मूर्त रूप देण्यात ते उपयोगी ठरेल याचा विचारही प्राधान्याचा ठरावा इतकेच यानिमित्त.

# २१ तोफांची सलामी आणि जन गण मन...

भारताचा ७९ वा स्वातंत्र्यदिन १५ ऑगस्ट २०२५ रोजी साजरा होणार आहे. १९४७ मध्ये याच दिवशी भारताने ब्रिटिश वसाहतवादी राजवटीतून स्वातंत्र्य मिळवले. त्यामुळे एका सार्वभौम, लोकशाही राष्ट्राचा उदय झाला. १५ ऑगस्ट हा दिवस केवळ एक राष्ट्रीय सण नाही. हा स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाची, त्यागाची आणि देशभक्तीची आठवण करून देतो. १५ ऑगस्ट हा १५० वर्षांच्या परकीय राजवटीचा शेवट होता. याच दिवशी स्वराज्याच्या स्वप्नाची पूर्ती झाली. या दिवशी शाळा, महाविद्यालये, सरकारी आणि खासगी संस्था विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. विद्यार्थी देशभक्तीपर गाणी, भाषणे, निबंध लेखन आणि सांस्कृतिक उपक्रमांद्वारे आपली कला सादर करतात. या दिवशी विद्यार्थ्यांना निबंध लिहावा लागतो. त्या निबंधाची तयारी कशी करायची ते जाणून घेऊया. तसेच काही छोटे निबंधही देण्यात आले आहेत जे सर्वांना उपयोगाचे ठरतील.

१. प्रस्तावना– योग्य आणि सुटसुटीत प्रस्तावना मांडली पाहिजे. यातून निघणारा अर्थ विषयाला सुरुवात करणारा पाहिजे.

२. मुख्य परिच्छेद – निबंधाचा मुख्य भाग यामध्ये असला पाहिजे. जास्तीत जास्त माहिती या भागात देण्याचा प्रयत्न करावा.

३. निष्कर्ष – संपूर्ण निबंधाचा निष्कर्ष येथे लिहावा.

. केवळ चांगले संशोधनच तुम्हाला एक चांगला लेख लिहिण्यास मदत करेल.२. एक अशी रूपरेषा तयार करा की कोणतेही महत्त्वाचे मुद्दे चुकणार नाहीत.३. तुमची प्रस्तावना प्रभावी असावी.

४. तुमच्या निबंधाच्या परिच्छेदांमध्ये कोणतीची चुकीची




माहिती नसावी.

५. तुमचा निबंध योग्य निष्कर्षाने संपवा.

–१५ ऑगस्ट २०२५ रोजी भारताच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त ५ ओळींचा निबंध

१९४७ मध्ये ब्रिटिश राजवटीपासून देशाला मिळालेल्या स्वातंत्र्याच्या स्मरणार्थ १५ ऑगस्ट रोजी भारतातील स्वातंत्र्य दिन साजरा केला जातो. हा दिवस मोठ्या अभिमानाचा आणि देशभक्तीचा असतो, जिथे नागरिक स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करतात. देशाचे पंतप्रधान लाल किल्ल्यावर राष्ट्रध्वज फडकवतात आणि त्यानंतर राष्ट्राला उद्देशून भाषण देतात. देशभरांतील शाळांमध्ये, कॉलेज, विद्यापीठे, सरकारी कार्यालये तसेच खासगी कार्यालये आणि संस्थांमध्ये हा दिवस साजरा करण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम, परेड आणि देशभक्तीपर गाणी आयोजित करतात. स्वातंत्र्य दिन भारतीयांना त्यांच्या एकतेची आणि समृद्ध राष्ट्र निर्माण करण्याच्या सततच्या जबाबदारी ची आठवण करून देतो.

१९४७ मध्ये ब्रिटिश वसाहतवादी राजवटीपासून देशाला मिळालेल्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून भारतात दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन साजरा केला जातो. हा दिवस देशाच्या मुक्तीसाठी संघर्ष करणा ?या स्वातंत्र्यसैनिकांनी दिलेल्या अपार बलिदानाचे प्रतीक आहे. प्राथमिक समारंभ नवी दिल्लीतील लाल किल्ल्यावर होतो, जिथे पंतप्रधान राष्ट्रध्वज फडकवतात. २१ तोफांची सलामी आणि राष्ट्रगीत, जन गण मन यांचे गायन या निमित्ताने हा कार्यक्रम साःसाजरा केला जातो. भारताची एकता आणि विविधता दर्शविणारी परेड, सांस्कृतिक सादरीकरणे आणि देशभक्तीपर कार्यक्रम देशभरात आयोजित केले जातात. या दिवशी पतंग उडवणे ही एक लोकप्रिय परंपरा आहे, जी स्वातंत्र्य आणि आनंदाच्या भावनेचे प्रतीक आहे. स्वातंत्र्य लढ्याचा सन्मान करण्यासाठी मीडिया विशेष कार्यक्रम, माहितीपट आणि देशभक्तीपर चित्रपटांसह प्रसारित करते. स्वातंत्र्य दिन हा भारताच्या प्रगती आणि चालू आव्हानांवर चिंतन करण्याचा काळ म्हणून देखील काम करतो. हा उत्सव नागरिकांना देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी आणि लोकशाही मूल्यांचे रक्षण करण्यासाठी प्रेरित करतो. भारत आपल्या स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करत असताना, अधिक समृद्ध आणि समावेशक समाज निर्माण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेची पुष्टी करतो.स्वातंत्र्यदिनाच्या सर्वांना शुभेच्छा!

–स्वातंत्र्यदिनावर लघु निबंध

देशाचा स्वातंत्र्य दिन दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. १९४७ मध्ये जेव्हा भारताने ब्रिटीश वसाहतवादी राजवटीपासून स्वातंत्र्य मिळवले तेव्हाचा तो एक ऐतिहासिक क्षण आहे. आपण २०२५ चा स्वातंत्र्य दिन साजरा करत असताना, हा काळ देशाच्या गेल्या काही वर्षांच्या उल्लेखनीय प्रवासावर चिंतन करण्याचा आहे. हा दिवस सार्वभौम भारताची कल्पना करणा–या असंख्य स्वातंत्र्यसैनिकांच्या अथक संघर्ष आणि बलिदानांना श्रद्धांजली म्हणून साजरा केला जातो. नवी दिल्लीतील लाल किल्ल्यावर केंद्रीय उत्सव साजरा केला जातो. जिथे पंतप्रधान राष्ट्रीय ध्वज फडकावतात आणि वर्षातील कामगिरी आणि आव्हानांवर प्रतिबिंबित करणारे भाषण देतात.

देशभरात, ध्वजारोहण समारंभ, देशभक्तीपर परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात, जे भारताच्या विविधतेतील एकता आणि स्वातंत्र्याच्या भावनेवर भर देतात. २०२५ मध्ये, भारत नवीन जागतिक आव्हाने आणि संधींना तोंड देत असताना, स्वातंत्र्य दिन आत्मपरीक्षणाचा क्षण म्हणून देखील काम करतो. सामाजिक समता, आर्थिक विकास आणि पर्यावरणीय शाश्वतता यासारख्या क्षेत्रात सतत प्रयत्न करण्याची आवश्यकता मान्य करताना विविध क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा उत्सव साजरा करण्याचा हा दिवस आहे. स्वातंत्र्य दिन प्रत्येक नागरिकाला देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी आणि भारताच्या स्वातंत्र्याला आधार देणा–या लोकशाही मूल्यांचे समर्थन करण्यासाठी प्रेरित करतो. हा दिवस स्वातंत्र्याच्या शाश्वत वारशाची आणि सर्वांसाठी उज्ज्वल भविष्य घडवण्याच्या सामूहिक जबाबदारीची आठवण करून देतो.

# चला, शांततेचा डीजे वाजवूया

एका उत्सवी दिवशी डीजेच्या सुमधूर आवाजाने आमच्या एका तरुण वरिष्ठनागरिकांच्या कानांनी अर्धवट प्राण त्यागला. या गोष्टीस आता काही महिने लोटले. गेलेल्या गोष्टीचे दुःख हळूहळू विस्मरणात जाते. त्याप्रमाणे ते दुःख हलकं होत असतानाच काल मध्यरात्री आसमंत आवाजाने दुमदुमायला लागला. आता पुढील काही महिने वेगवेगळे सण, उत्सव, महापुरुषांचे जन्मदिवस या कारणांनी डीजेची भेट होतच राहणार आहे.



कुठल्याही जाती धर्म पंथावर टीका करणे हा या प्रस्तुत लेखाचा विषय नाही. डीजेयुक्त मिरवणुका, परिणामी होणारे असह्य ध्वनिप्रदूषण तदब अनुषंगाने होणारे हे मुक्त आत्मचिंतन आहे.

डीजे व त्यामुळे होणारे ध्वनीप्रदूषण यावर आजपर्यत प्रचंड उहापोह झालेला आहे. वेगवेगळ्या न्यायालयांनी यावर अनेक आदेश सुद्धा दिलेले आहेत. परंतु प्रत्यक्षात या आदेशांना केराची टोपली दाखवली जाते. पोलिसांच्या डोळ्यासमोर हे डीजे वाजविले जातात. लेसर प्रकाश झोत डागले जातात. परंतु त्या बिर्चा ?यांना काही दिसत नाही , काही ऐकू येत नाही व म्हणून ते काही बोलत नाहीत. एखाद्या नतद्रष्ट डीजेद्वेषी य:कश्चित 'झुरळा'ने तक्रार केलीच तर अत्यंत नाइलाजाने ते गुन्हा दाखल करतात. फारच झालं तर डीजे जप्त करतात आणि ही केलेली कारवाई न चुकता दुर्स ?या दिवशीच्या वर्तमान पत्रात छापून आणतात. एवढे केलं की त्यांना व त्या नतद्रष्ट डीजेद्वेषी य:कश्चित तक्रारदाराला धन्य वाटते. त्या तक्रारींचे व त्या जप्त केलेल्या डीजेचे पुढे काय झाले याचे कोणालाही देणेघेणे नसते.

मध्यंतरी अशीच एक बावळट तक्रार घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात गेलो असता तेथे एक नवीन ज्ञान मिळाले . त्यांनी आम्हांस असे शिकविले की हे मंडळ फक्त औद्योगिक ध्वनिप्रदुषणाच्या तक्रारी घेते. डीजेमुळे होणारे प्रदूषण हे 'औद्योगिक' सदरात मोडत नसल्याने असल्या (निरर्थक) तक्रारींसाठी तुम्ही पोलीस किंवा महापालिकेत जा. हे ऐकून आमचे कर्ण डीजेच्या आवाजाने बधिर होण्यापूर्वी एकदा धन्य झाले !!!

डीजेमुळे कान कामातून जाऊ शकतात, हृदय बंद पडू शकते, रक्तदाब वाढू शकतो, लेसर झोतांमुळे डोळे जातात. हे सगळं माहित असूनसुद्धा आपल्यातीलच काही उत्साही मानव डीजेसमोर उभं राहून नाचण्याचं धाडस ( की मूर्खपणा) अंगी कसं बाळगू शकतात ? त्यांचे पालक/ पत्नी/मुले / बहिणी / भाऊ यांना या गोष्टीची कशी भीती वाटत नाही? का यांचे कान आणि हृदय स्टेनलेस स्टीलचे असतात?

# नियमन हवे; जाच नको



परकीय योगदान सुधारणा विधेयक २०२६ (एफसीआरए) संयुक्त संस दीय समिती कडे (जेपीसी) पाठवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय समंजसपणाचे निदर्शक आहे. विरोधी पक्षांचा तीव्र विरोध, मित्रपक्षांसह काही राज्यांच्या मुख्य मंत्र्यांनी समोर आणलेल्या त्रुटी आणि अमेरिका–युरोपीय संघाने व्यक्त केलेल्या चिंता, या पार्श्वभूमीवर या विधेयकावर सर्वांगीण साधकबाधक चर्चा होऊन एकमत घडावे, ही सरकारची भूमिका स्वागतार्ह आहे.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनातील गदारोळात सभागृहाचे कामकाज होतच नव्हते. हे विधेयकसुद्धा पूर्णपणे मागे घ्यावे, अशी विरोधी पक्षांची मागणी होती. मात्र, पुरेसे बहुमत असतानाही ते 'जेपीसी'कडे पाठवून सरकारने सध्यापुरता सुवर्णमध्य काढलेला दिसतो. विविध सेवाकार्यांसाठी परदेशातून येणारा निधी योग्य मार्गाने खर्च होतो की नाही आणि त्यातून देशविघातक कारवायांना बळ मिळत नाही ना, हे पाहण्यासह त्याला कायद्याची बंधने घालण्याच्या उद्देशाने या सुधारणा प्रस्तावित करण्यात आल्या. मात्र, यातील काही तरतुदींबाबत विविध समाजघटकांना गंभीर शंका आहेत.

विरोधी पक्षांनी हे विधेयक 'अल्पसंख्याकविरोधी' असल्याचा आरोप केला होता; तसेच दक्षिण भारत आणि ईशान्येकडील काही राज्यांमधूनही या तरतुदींना विरोध होत आहे.

मानवकल्याणासाठी उभारलेल्या सेवाकार्यांना देश–विदेशातून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होतो. गेल्या वर्षी देशातील हजारो संस्थांना सुमारे २३ हजार कोटी रुपयांचा निधी मिळाला असून, त्यातून शिक्षण, आरोग्य, सामाजिक कल्याण, नैसर्गिक आपत्तीमध्ये साह्य, पर्यावरण, महिला–बालकल्याण किंवा आदिवासी विकास या क्षेत्रांमध्ये ही कामे सुरू आहेत. अशा निधीचे योग्य नियमन व्हावे, या उद्देशाने सन १९७६ मध्ये आणीबाणीच्या काळात 'एफसीआरए' कायदा लागू झाला. त्यामध्ये दुरुस्ती करून स्वयंसेवी संस्थांची नोंदणी, त्यांच्या प्रशासकीय खर्चावर मर्यादा आणि निधीचे लेखापरीक्षण अशा तरतुदी वेळोवेळी लागू करण्यात आल्या आहेत. मात्र, या परदेशी निधीतून देशविरोधी कारवायांना पैसे पुरवले जातात, कुडनकुलम अणुप्रकल्पासारख्या विकासकामांना विरोध करणा ?या आंदोलनांना बळ देऊन विकासात बाधा आणली जाते; तसेच निवडणुकीवर प्रभाव टाकण्यासाठी या निधीचा वापर होतो आणि काही संस्थांकडून धर्मांतरासारखी कामे या निधीतून केली जातात, असे आरोप करण्यात येतात.

काही स्वयंसेवी संस्थांमध्ये मूळ उद्देशाऐवजी प्रशासकीय खर्चाच्या नावाखाली त्या निधीची उधळपट्टी होते, अशाही तक्रारी होत्या. त्या पार्श्वभूमीवर नवे विधेयक आणण्यात आले. मात्र, यातील काही तरतुदी अस्पष्ट आणि नोकरशाहीला अवाजवी अधिकार देणा–या असल्याची टीका करण्यात येते. विशेषत: परवाना नूतनीकरण लांबण्यासारख्या क्षुल्लक–तांत्रिक मुद्द्यांवर संबंधित संस्थेची आधी उभारलेली मालमत्ताही थेट सरकारच्या ताब्यात देण्यासारख्या मुद्द्यांवर अधिक विरोध आहे.

'ख्रिस्ती मिशनरींकडून चालवण्यात येणा–या शाळा–महाविद्यालये किंवा रुग्णालये ताब्यात घेण्याचा हा डाव आहे,' अशी टीका सुरू झाली. त्याबरोबरच नव्या मसुद्यात ' राष्ट्रीय हितास हानिकारक' किंवा 'राजकीय उद्देश' हे उल्लेख संदिग्ध असून, नेमकी व्याख्या न केल्यास 'इन्स्पेक्टर राज' सुरू होण्याची भीतीही व्यक्त होत आहे. अमेरिकेच्या एका खासदाराने 'हा ख्रिस्ती धर्मावरील हल्ला आहे,' असे सांगून द्विपक्षीय संबंधांवरही परिणाम होऊ शकतो, अशी टीका केली; तर युरोपीय संघानेही हे मानवी अधिकारांचे उल्लंघन असल्याचे मत मांडले. अर्थात, भारताने 'ही पूर्णपणे अंतर्गत आणि संसदेच्या अधिकारक्षेत्रातील बाब आहे,' असे ठणकावले.

या विधेयकाबाबत राजकीय पक्षांनी मांडलेल्या भूमिकांमागे आपापली मतपेढी सुरक्षित ठेवण्याचाही सुप्त–उघड हेतू आहेच.

मात्र, दिल्लीसह महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, कर्नाटक आणि ईशान्येकडील बहुतांश राज्यांमध्ये परदेशी निधीतून अनेक सेवाकार्ये सुरू आहेत. या विधेयकातील तरतुदींमुळे त्या कार्यात अडसर निर्माण होऊ नये, ही तेथील सरकारांची चिंता रास्त आहे. राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वभौमत्व यांचे रक्षण प्राधान्याने झालेच पाहिजे;

मात्र या कार्यांचे लाभार्थी असलेल्या वंचित समूहांना त्यांचा फटका बसू नये आणि नागरी समाजाची स्वायत्तताही अबाधित राहावी, यासाठी स्पष्ट तरतुदी करणे आणि अवाजवी दमन टाळण्यासाठी सर्व घटकांशी चर्चा करून पारदर्शक कायदा आणणेच योग्य ठरेल.

# जेथे जाऊ तेथे...

तुकाराम मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. मुंढेंनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडर्णा ?या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच.

सध्या बहुचर्चित असलेल्या 'जेन झी'च्या आंदोलनाचं नेतृत्व करणारा अभिजीत दीपके हा तरुण महाराष्ट्राचा असल्याने देशातील माध्यमं महाराष्ट्राची वेगळ्या पद्धतीने नोंद घेत असताना महाराष्ट्राचे डोळे सध्या दिपले आहेत, ते मात्र तुकाराम मुंढे या सनदी अधिकार्‍ ?याच्या कामगिरीने. मुंढे यांची २१ वर्षांची संपूर्ण कारकीर्द वादळी आहे. त्यांना ज्या विभागात पाठवलं जातं, तिथे ते शांत बसतच नाहीत. काही ना काही कारणाने चर्चेत येतातच. मुंढे यांची महाराष्ट्रात पहिली प्रसिद्धी आहे, ती त्यांच्या वारंवार होर्णा ?या बदल्यांनी. राज्यात सरकार कुणाचंही असो, मुख्यमंत्री कोणीही असो, मुंडेंना कधीच कुठल्या विभागात वर्षभर ठेवता येत नाही! त्यांच्यावर भ्रष्टाचार, अनियमिततेचे आरोप होत नाहीत. नियमबाह्य कामाबाबत त्यांच्यावर कुठे ठपका नाही. ठपका असलाच, तर काळवेळ न पाहता प्रत्येक गोष्ट नियमातील शब्दांनुसार घेण्याबाबत आहे. नियमावली आणि कायदा ते फक्त शब्दार्थाने जाणतात. भावार्थ समजून घेण्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळे, त्यांचा कारभार अनेकदा आततायी होतो. लोकप्रतिनिधी, संबंधित विभागाला त्याचीच अडचण होऊ लागते. परिस्थितीनुरूप कायदे लवचिकपणे वाकवण्याची सवय झालेल्या सगळ्यांनाच त्याचा त्रास होतो.



मुंढे यांच्या विरोधातल्या तक्रारींना तिथून सुरुवात होते. मुंढे डावं–उजवं करण्याच्या फंदात पडत नाहीत. समोर आलेली फाईल कोणाशी, कशाशी संबंधित आहे, याचाही विचार करत नाहीत. त्यामुळे, त्यांच्यावर आप–परभावाचा आरोपही करता येत नाही. लोकशाहीत प्रशासन जनतेला जबाबदार असतं. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यांच्या भूमिका, त्यांची बाजू समजून घेण्याची गरज मुंडे यांना वाटत नाही. ते कोणाला भेटत नाहीत. बहुतेक वेळा कोणाचे फोन घेत नाहीत; कोणाला उलट फोन करत नाहीत, अशी त्यांच्या वर्तणुकीबाबतच्या तक्रारींची बरीच मोठी यादी आहे. ती सहसा बातम्यांत येत नाही. सर्वसामान्य माणसाला प्रशासनाचा जो अनुभव येतो, त्या तुलनेत मुंढेंची शैली त्याला फार भारी वाटते. मुंढेंसारखा नि:स्पृह अधिकारी नाही, अशीच त्यांची प्रतिमा झाली आहे. आषाढी वारीदरम्यान काहींनी त्यांच्या नांवाचा योग साधून त्यांना थेट 'आधुनिक संतश्रेष्ठ तुकाराम महाराजां'ची उपमा दिली. काहींनी त्यांच्या प्रतिमेला दुधाचा अभिषेक केला. त्यांच्यावर मराठीत येऊ घातलेल्या पुस्तकाच्या एक लाख प्रतींची नोंदणी प्रकाशनापूर्वीच झाली आहे, असं म्हणतात. एखाद्या अधिका–याच्या वाटेला क्वचितच येणारं हे स्तुतीगानही टोकाचंच म्हणावं लागेल.

मुंढे सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात आहेत. तिथे असलेल्या अधिकारांचा उपयोग करून त्यांनी महाराष्ट्रातील अनेक मातब्बर ब्रँड, आस्थापनांना काळ्या यादीत टाकलं आहे. विविध ठिकाणी धाडी टाकून उत्पादन थांबवणं, पूर्ण आस्थापना 'सील' करणं, निकष मोडणा–या बाबींवरून खटले दाखल करणं याचा त्यांनी सपाटाच लावला आहे. मुंबईतल्या जुन्या, प्रसिद्ध ब्रँडना टाळी ठोकल्याने, मोठमोठ्या–मातब्बर क्लबना नियम भंगांच्या आरोपाखाली खेचल्याने, अनेक सरकारी–न्यायालयीन इमारतींतील उपाहारगृहांनाही कायद्याचा बडगा दाखवल्याने अनेक प्रतिष्ठितांचे धाबे दणाणले आहेत. शाळांच्या आवारात आणि शाळांच्या आवारापासून ५० मीटरपर्यंतच्या परिसरात 'जंक फुड'ला बंदी केल्याने मुंढे आता मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या रडारवर आले असतील. 'जेथे जाऊ तेथे देऊ खळबळ उडवून' या बाण्याने मुंढेंचं काम सुरू असलं, तरी त्यामुळे प्रशासनाच्या वरिष्ठ वतुर्ळात नेहमीच नाराजी असते. राज्यातले बाकी सगळे अधिकारी तडजोडी आणि दबावाखाली सहज झुकणारे असून मुंडे तेवढे नि:स्पृह, निर्भय आणि निष्पक्ष असल्याचं चित्र निर्माण होतं, असा या वतुर्ळाचा आक्षेप असतो.

लिखित कायद्याव्यतिरिक्तही वस्तुस्थिती असते. अधिकारांचा वापर करताना तिचा सारासार विचार करावा लागतो. व्यवहार्यता लक्षात घ्यावी लागते. तरच कायद्याची विवेकी अंमलबजावणी शक्य होते, असं या अधिकार्‍ ?यांचं म्हणणं असतं.

मुंडे यांचा कामाचा वेग आणि धडाका यामुळे ते ज्या विभागात जातात, तिथे अचानक कामाचा ताण येतोच; पण त्याहीपेक्षा वेगळ्या कार्यशैलीने कर्मचारी, कनिष्ठअधिकारी वर्गात आहे बैचेनी पसरते.

# भक्ति तो कठिण...

उंच, अधिक उंच. वेग, अधिक वेग, अशी आस माणसाला आहे. आपण अधिकाधिक मोठं व्हावं, सा–यांनी आपलं कौतुक करावं, आपली वाहवा करावी, आपल्या भोवती आरत्या ओवाळाव्यात, आपली तारीफ करावी असं सगळ्यांनाच वाटत असतं. हे मोठेपण मिळवायचं, तर त्यासाठी कष्ट करावे लागतात, अभ्यास करावा लागतो, चिकाटीनं आणि न दमता सतत काम करावं लागतं, कल्पनाशक्ती सतेज ठेवावी लागते आणि हे सारं साधायचं तर मनाची एकाग्रता असावी लागते, पण उंच जाण्याच्या वेडाबरोबरच आपल्याला सगळंच काही पटकन व्हावं असंही वाटत असतं. याचं कारण आपल्याला वेगाचंही पिसं लागलेलं आहे,आाणि ते वाढतच चाललेलं आहे की काय असं वाटावं, अशी परिस्थिती आहे.

बहिणाबाई चौधरी म्हणतात, 'मन पाखरू पाखरू, त्याची काय सांगू मात? आता व्हतं भुईवर, गेलं गेलं आभायात।।' ते या क्षणी इथं आहे, तर दुस–या क्षणी कुठं जाईल याचा नेम नाही.

याचं कारण माणसाचं मन मोकाट, ओढाळ, चपळ, लहरी आहे आणि जहरीही आहे.

या मनाला आवर घालणं म्हणजे वार्‍ ?याची मोट बांधण्यासारखं आहे. आणि त्या आदिशक्तीला ज्या सगुण रूपात आपण बघत असतो, त्याची भक्ती करायची तर मनाची एकाग्रता साधावी लागते.



चित्त आवरावं लागतं. मोह दूर सारावे लागतात. तरच ईश्वराची भक्ती करणं शक्य होतं.

थोडक्यात, देवाची भक्ती करणं ही सोपी गोष्ट नाही. गंध–माळा–टिळे, आरत्या हे बाह्योपचार झाले. पूजा करणं हा देखावा झाला. पण मनाला त्या सगुणाशिवाय सा–या जगाचा विसर पडत नाही, सारं चित्त त्या मूर्तीवर केंद्रित होत नाही, अवघी नजर त्या चरणांवर खिळत नाही, तोवर सारं व्यर्थ आहे. तुकाराम महाराज सांगतात,

*'भक्ति तो कठिण शुळावरील पोळी।*
*निवडे तो बळी विरळा शूर।।*
*जेथें पाहें तेथों देखीचा पर्वत।*
*पायाविण भिंत तांतडीची।।*
*कामाविले तरि पाका ओज घडे।*
*रुचि आणि जोडे श्लाघ्यता हे।।*
*तुका म्हणे मना पाहिजे अंकुश।*
*नित्य नवा दिस जागृतीचा।।'*

**अनिरुद्ध शांडिल्य**

# युवकांची व्यसनाधीनता : देशासमोरील आव्हान

स्वामी विवेकानंदांनी तरुणांना 'ऊठ, जागा हो आणि ध्येय सिद्ध होईपर्यंत थांबू नकोस' असा संदेश दिला होता. आजच्या जागतिक युवा दिनाच्या निमित्ताने आपल्या देशातील तरुणांनी स्वतःला एक प्रश्न विचाराला हवा आहे की, आपण ध्येयाच्या दिशेने चाललो आहोत की व्यसनाच्या अंधार्‍ ?या खाईकडे? व्यसन हे सुखाचे साधन नसून विनाशाचे आमंत्रण आहे. तरुणांनी स्वतःच्या आंतरिक शक्तीला ओळखून व्यसनांना 'नाही' म्हणण्याचे धाडस दाखवले पाहिजे. जेव्हा देशाचा प्रत्येक तरुण व्यसनमुक्त, सुदृढ आणि ध्येयवादी बनेल, तेव्हाच आपला देश खर्‍ ?या अर्थाने प्रगती करेल.

तरुण पिढी हा देशाचा कणा आणि भविष्यातील प्रगतीचा आधारस्तंभ असतो, असे आपण अभिमानाने सांगतो. ज्या देशात तरुणांची संख्या जास्त तो देश सर्वात शक्तिशाली मानला जातो. देशाच्या प्रगतीचे सुकाणू युवकांच्या हाती आहे असे म्हटले जाते. युवा शक्तीचे खूप मोठे सामर्थ्य आहे. ते जर चांगल्या उद्देशाने एकत्र आले तर खूप काही चांगले घडू शकते. भारत हा जगातील सगळ्यात मोठा तरुणांचा–युवकांचा देश आहे.

मात्र याच बलशाली युवा शक्तीला 'व्यसनाधीनतेची' वाळवी पोखरत आहे. एकीकडे आपण तंत्रज्ञान, स्टार्टअप्स आणि जागतिक प्रगतीच्या गप्पा मारत असताना दुसरीकडे देशातील कोटय़वधी तरुण अमली पदार्थ, दारू, सिगारेट आणि डिजिटल स्क्रीनच्या विळख्यात अडकत आहेत. अडकले आहेत. युवकांची ही सद्यस्थिती केवळ एका व्यक्तीचे किंवा कुटुंबाचे नुकसान करणारी नसून संपूर्ण राष्ट्राच्या भविष्याला अंधारात ढकलणारी आहे. व्यसनाधीनतेचे स्वरूपही बदलले आहे. पूर्वी व्यसन म्हटले की केवळ तंबाखू, सिगारेट किंवा दारू डोळ्यांसमोर यायची. मात्र आजच्या आधुनिक युगात व्यसनांचे स्वरूप अत्यंत घातक झाले आहे.

आज महाविद्यालयीन तरुणांमध्ये एमडी, कोकेन, गांजा, चरस आणि विविध प्रकारच्या अमली गोळ्यांचे फॅड प्रचंड वाढले आहे. पार्टी संस्कृतीच्या नावाखाली ड्रग्जचे सेवन करणे ही एक 'फॅशन' किंवा 'स्टेटस सिम्बॉल' बनत चालले आहे. सिगारेट, हुक्का आणि ई–सिगारेटची तरुणांना भुरळ पाडली आहे. वीपेंड पार्टय़ा, पब्स आणि कौटुंबिक सोहळ्यांमध्येही मद्यपान उघडपणे केले जात आहे. रील्स पाहणे, ऑनलाइन गेमिंग (उदा. पबजी, रमी ), पॉर्नोग्राफी आणि सोशल मीडियावरील लाईक्स मिळवण्यासाठी तासन्तास मोबाईल स्क्रीनवर घालवणे, हे तरुणांच्या मानसिक आरोग्याला घातक ठरत आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या मोहापायी अनेक तरुण ऑनलाइन बेटिंग ॲप्सच्या आहारी जात आहेत. यामध्ये मोठी रक्कम गमावल्यामुळे अनेक तरुणांनी आत्महत्या केल्याच्या घटना घडत आहेत.

देशातील तरुण व्यसनाच्या आहारी का जात आहेत? तर तरुणांना व्यसनाच्या गर्तेत ढकलण्या साठःअनेक कौटुंबिक, सामाजिक आणि मानसिक घटक कारणीभूत आहेत. आजच्या जगात शिक्षणाची स्पर्धा, बेरोजगारीची भीती, करीअरचे दडपण आणि पालकांच्या अति अपेक्षांमुळे तरुण प्रचंड मानसिक तणावाखाली जगतात. या तणावातून तात्पुरती सुटका मिळवण्यासाठी ते व्यसनाचा मार्ग निवडतात. मित्रपरिवाराचा दबाव हेसुद्धा महत्त्वाचे कारण आहे. चमचमती जीवनशैली आणि चित्रपट–वेब सीरिज, चित्रपट आणि लोकप्रिय वेब सीरिजमध्ये अमली पदार्थांचे सेवन, मद्यपान ग्लॅमराईज करून दाखवले जाते. नायक किंवा नायिका पडद्यावर सिगारेट ओढताना पाहून तरुण त्यांचे अंधानुकरण करतात. कौटुंबिक वातावरण आणि संवादाचा अभाव असतो. ज्या कुटुंबात पालकांमध्ये सतत भांडणे असतात किंवा पालक स्वतः व्यसनी असतात, तिथली मुले सहज व्यसनांकडे वळतात. आजकाल पालक आणि मुलांमध्ये संवाद कमी झाला आहे. मुले डिप्रेशनमध्ये असताना त्यांच्याशी बोलणारे कोणी नसते. अमली पदार्थांची सहज उपलब्धता होत असल्याने आज शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात अगदी पान टर्प ?यांवर किंवा ऑनलाइन माध्यमातून ड्रग्ज आणि इतर व्यसनाधीन वस्तू सहज उपलब्ध होत आहेत. ड्रग्ज माफियांचे जाळे थेट शैक्षणिक संस्थांपर्यंत पोहोचले आहे.



व्यसनाधीनतेचे भयानक परिणाम व्यसनाधीनतेमुळे केवळ तरुणाचे शारीरिक नुकसानच होत नाही, तर त्यांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य उद्ध्वस्त होते. गुन्हेगारीत वाढ होते. व्यसनाची गरज भागवण्यासाठी पैशांची आवश्यकता असते. जेव्हा घरून पैसे मिळणे बंद होते, तेव्हा तरुण चोरी आणि अमली पदार्थांची तस्करी यांसारख्या गुन्हेगारी मार्गांकडे वळतात. व्यसनात बुडालेला तरुण अभ्यासावर लक्ष पेंद्रित करू शकत नाही. उच्च शिक्षण अर्धवट सुटते, नोकरी गमावली जाते आणि यामुळे संपूर्ण कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटते.कुटुंबाची वाताहत होते. या गंभीर समस्येवर प्रभावी उपाय युवकांना व्यसनाच्या या गर्तेतून बाहेर काढण्यासाठी केवळ कायदे करून चालणार नाही, तर सामूहिक पातळीवर प्रयत्न करावे लागतील.

शाळा–कॉलेजच्या १०० मीटर परिसरात तंबाखू आणि दारू विक्रीवर असणारी बंदी केवळ कागदावर न राहता तिची कडक अंमलबजावणी झाली पाहिजे. कठोर कायद्यांसोबत त्यांची अंमलबजावणी महत्त्वाची आहे. शैक्षणिक संस्था व संस्था चालक यांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

जे तरुण व्यसनाच्या जाळ्यात खोलवर रुतले आहेत, त्यांना सहानुभूतीपूर्वक बाहेर काढण्यासाठी आधुनिक व्यसनमुक्ती आणि पुनर्वसन पेंद्रांची मदत घेतली पाहिजे. तरुणांची ऊर्जा अफाट असते. जर या ऊर्जेला क्रीडा, कला, व्यायामशाळा किंवा सामाजिक,आध्यात्मिक कार्यात गुंतवले तर त्यांचे मन व्यसनाकडे वळणारच नाही. क्रीडा आणि कलागुणांना प्रोत्साहन द्यायला हवे.

रोजगार नसलेल्या युवकांचा राजकीय क्षेत्रात तात्पुरता वापर केला जातो. युवक त्यात आशेपोटी गुरफटला आहे. आंदोलन, मोर्चे या कामीच त्यांचा फक्त वापर वर्षानुवर्षे करून घेतला जातोय ही गंभीर बाब आहे.